# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ११/१०/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ११/१०/२००५ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. ०४/१०/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १२) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १३) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १४) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

प्रथमच स्थायी समितीचे आयोजन करण्यांत आलेले आहे आणि या पहिल्या सभेच्या प्रसंगी उपस्थित असलेले आपले स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती मा. श्री. तुळशिदास म्हात्रे साहेब, महानगरपालिकेचे स्थायी समितीचे सर्व सन्मा. नगरसेवक, महानगरपालिकेचे सचिव श्री. हरेश पाटील, महानगरपालिकेचे लेखा परिक्षक श्री. नाकाडी साहेब, महानगरपालिकेच्या विविध खात्याचे खातेप्रमुख या ठिकाणी आज या पहिल्या सभेचे आयोजन होत आहे. प्रशासनातर्फे भविष्यकाळामध्ये स्थायी समितीच्या कामकाजासाठी पुर्णपणे आपल्याला सहकार्य मिळेल अशी ग्वाही मी उपायुक्त म्हणून आपणांला देतो. संभाव्य कालखंडामध्ये घेण्यांत येणारे विविध निर्णय मा. सभापतींनी दिलेले निर्देश ह्यांचे पालन करण्यासाठी संपूर्ण प्रशासन त्यांच्याबरोबर राहील अशी ग्वाही मी त्यांना देतो आणि त्यांची संभाव्य कार्यकाल यशस्वी होवो हीच नम्र प्रार्थना परमेश्वर चरणी करतो आणि सभेचे कामकाज सुरु करण्याबद्दलची विनंती मा. सचिव साहेबांना मी करतो.

**मा. सभापती :-**

सन्मा. सर्व स्थायी समिती सदस्य व सदस्या आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उपायुक्त रणखांब साहेब, त्याचप्रमाणे निरनिराळ्या खात्याचे अधिकारी, लेखा परिक्षक आणि सभेचे सर्व कार्यभार सांभाळणारे सचिव या ठिकाणी आज माझी ही पहिलीच सभा आहे. ही सभा आपण सर्व मिळून एकमताने आणि एकदिलाने आणि एक विचाराने पार पाडू या. त्याचप्रमाणे आपण सर्वांनी ह्या शहराचा विकास करण्यासाठी आणि ह्याच्यापुढील आपल्यापुढील आयुष्याची वाटचाल करण्यासाठी आपण मला निश्चितपणे सहकार्य कराल, ह्याची मी वाट बघतो आणि आपण आतापर्यंत या मिरा भाईंदर शहराचा नेहमी सत्तेत काही जुनी लोक सन १९९१ पासून आहेत, काही १९९६ ला आले आहेत आणि आपण आत्तापर्यंत सगळ्यांनी ह्या शहराच्या विकासात चांगली भर पाडली आणि यापुढेही पाडाल आणि स्थायी समितीची सभा येत्या वर्षातून होणाऱ्या सभा ह्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी आशा बाळगतो आणि सचिवांनी पुढील सभा चालू करण्यासाठी निर्देश करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११८ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मी आपले सदर विषयावर लक्ष वेधतो, मिरा भाईंदर स्थायी समितीने २२/०१/२००४ रोजी एक ठराव केला होता. ठरावाचे पालन मा. महासभेने आणि इतर सदस्यांनी किती करावे याबद्दल तुम्ही सांगावे. महापालिकेचा ठराव क्र. १९२, महानगरपालिकेचे विकास कामाचे भुमिपूजन व उद्‌घाटन समारंभ, नामफलक बाबतचे धोरण निश्चित करणेबाबत ह्याच्यामध्ये असे ठरले होते, ज्याच्या प्रभागात तो काम करेल त्या प्रभागात ते नगरसेवकांचेच त्या फलकावर नाव आले पाहिजे आणि इतर मा. महापौर, मा. उपमहापौर, सभापती, स्थायी समिती, सभागृह नेता, विरोध पक्षनेता, प्रभागातील तीन चार नगरसेवक जे असतील ते आणि आयुक्त साहेब ह्यांचे नांव त्या फलकावर लावायचे. नऊ तारखेला प्रभाग क्र. ५ मध्ये आरोग्य केंद्राचे उद्‌घाटन झाले. त्या उद्‌घाटनामध्ये आपल्याला कार्डही आले असेल. त्या ५ नंबर प्रभागातील नगरसेवकांची नांवे आणि जोडील २१ नंबर प्रभागातील नगरसेवकांची नांवे अशी जोडीला होती आणि जे आरोग्य केंद्र होते ते ५ नंबरमध्ये होते. म्हणजे आपण हे ठराव करतो ते कशासाठी? ह्या ठरावाचे पालन जर आपल्याला करायचे नसेल तर स्थायी समिती सभेमध्ये बसून दोन दोन तास, तीन तीन तास फुकट कशाला घालवायचे? त्याच्यात एवढे काय तथ्य होते की, त्या बाजूच्या नगरसेवकांची त्याच्यात नांवे यायला पाहिजे होती. आता ती पार्टी अजुन बनलेली नाही. योग्य तो निर्णय घ्या. फलक लावण्या अगोदर, मार्बलचा फलक लावण्याचा त्याचा योग्य तो निर्णय घ्या असे मी आपणांला विनंती करतो.

**जयंत पाटील :-**

सभापती साहेब, याच विषयाला मी धरुन बोलतो, विषय जरी पटलावर नसला तरी महापालिकेने एखादे कार्य केले, मग ते हॉस्पीटल असे, उद्यान असो कि इतर गोष्टी असो. त्या ठिकाणी जो फलक लावला जातो आणि आपण संबंधित लोकांना कार्यकर्त्यांना निमंत्रण पाठवतो, महापालिका निमंत्रण पाठवते की, अमुक अमुक व्यक्ती उद्‌घाटन करणार आहेत, ते अध्यक्ष असतील, अमुक हे असतील आणि तशा तऱ्हेची पाटी आपण त्या ठिकाणी लावतो. ते आपल्याला महापालिकेच्या ग्राऊंण्डलाही दिसेल, अनेक ठिकाणी लावतो. परंतु, त्या ठिकाणी ज्यांची नांवे आपण पाटीवर लिहिलेली असतात, ते लोक येत नाही. जर ते लोक आलेले नसतील आणि उद्‌घाटक म्हणून त्यांचे नांव ठेवणे योग्य आहे का? ते लोक उद्‌घाटनाला आलेले नाहीत, हजर नाहीत, पाटीवर त्यांची नांवे आहेत. मग आपण काय करायचे? त्यांचे नांव कायमचे उद्‌घाटक म्हणून त्या ठिकाणी ठेवायचे का? याबद्दल आपले मत सांगा.

**गजानन भोईर :-**

त्यांना उत्तर द्यायच्या अगोदर मी सांगतोय, ज्या प्रभागाची नगरसेविका तिला आजपर्यंत आमंत्रण गेलेले नाही. सन्मा. नगरसेविका प्रियांका करंबेळे, त्यांच्या प्रभागात उद्‌घाटन असतांना आजपर्यंत त्यांना आमंत्रण मिळाले नाही आणि मला आमंत्रण बरोबर ९.३० वाजता त्याच दिवशी सकाळी बऱ्याच नगरसेवकांना मिळाले. म्हणजे उद्‌घाटन सकाळी ११.०० वाजता आणि कार्ड येतात सकाळी ९.३०-१०.०० वाजता म्हणजे नक्की पद्धत काय? एवढे कोण आजारी पडले होते? म्हणजे त्याला ताबडतोब त्याच दिवशी द्यायला पाहिजे होते. दोन दिवस सुट्टी होती, शनिवार आणि रविवारी. शनिवारी कार्ड छापले गेले. ही कशासाठी पद्धत पाहिजे? ह्याच्यात काय एवढं मोठं होतं? कोण तिथे आजारी पडले होते? ही पद्धत बिल्कुल चुकीची आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्या विषयी आपले मत रास्त आहे. पण हा विषय आपण सगळ्यांनी मिळून ठरवा.

**जयंत पाटील :-**

म्हणूनच स्थायी समितीसमोर विषय आला आहे. निर्णय सभापती साहेब देणार आहेत.

**रतन पाटील :-**

विषय आपण मांडला. ठराव घ्या आणि ठरावाचे पालन करा.

**गजानन भोईर :-**

ठरावाचे पालन करा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. जयंत पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला, त्या मुद्याबद्दल प्रशासनामार्फत मी एवढेच सांगू शकेन की, हा निर्णय जो आहे तो आपण सर्वांनी, म्हणजे स्थायी समितीने घ्यावा आणि स्थायी समितीचा घेतलेला निर्णय ह्याची अंमलबजावणी प्रशासन करेल.

**जयंत पाटील :-**

या विषयावर सभापती महोदयांनी आपले रुलिंग तरी द्यावे. ह्या विषयावर त्यांचे मत काय आहे?

**एस्. ए. खान :-**

सभापती साहेब, असेच आमच्या प्रभागामध्येही चालले आहे. आम्ही ह्याच्यामध्ये जो व्यवहार करतो. अंतिम टप्प्याला जे काम सुरुवात करायचे असेल तर दुसऱ्याच बाजूचा नगरसेवक येऊन तिथे पाटी लावतात, बोर्ड लावतात.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य खान साहेब, माझा विषय तो नाही. आपला विषय वेगळा आहे.

**एस्. ए. खान :-**

तसे पण होत आहे. आम्ही त्या कामासाठी प्रयत्न करायचे आणि शेवटी ते काम पुर्ण होते वेळी दुसरे येऊन त्यांच्या नावाची पाटी लावतात. ही पद्धत बरोबर नाही. प्रभागाचा एक नगरसेवक दोन ते तीन वर्षापासून प्रयत्न करुन ते काम आता पुर्ण होत आहे आणि नंतर शेवटी येऊन सांगायचे की, आम्ही तुम्हांला आता पुर्ण करुन देतो, ते असे का होते? ते असे येऊन आश्वासन का देऊन जातात? दुसरे प्रभागाचे नगरसेवक, ते थांबवायला पहिजे. जे नगरसेवक स्थानिक नगरसेवक आहेत ते पाठपुरावा करतात. ते पत्रव्यवहार करतात आणि त्या पत्राचे उत्तर त्याला मिळते. नंतर शेवटी ह्याच्यामध्ये सांगायचे की, आम्ही तुम्हांला करुन देतो. का होत नाही काम? आणि दुसऱ्या दिवशी महानगरपालिकेमध्ये येऊन काम करायचे. त्याच्यामध्ये अडचण जरी असली तरी ती दुर होते आणि ताबडतोब कामाची सुरुवात होते ही पद्धत बरोबर नाही.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, अशा पद्धतीने बऱ्याचशा प्रभागांमध्ये नगरसेवकांचे अतिक्रमण चालले आहे.

**जयंत पाटील :-**

मुळात तो विषय उपस्थित केला आहे, त्याचा तरी निर्णय होऊ द्या.

**रतन पाटील :-**

ठिक आहे सभापती साहेब, मा. नगरसेवक जयंत पाटील ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात आपण खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

कदाचित त्यावेळेस त्या अधिकाऱ्याने, ज्यांचे नांव त्या फलकावर टाकले गेले आहे त्यांना सांगितले असेल की, मी येणार आणि नंतर जर आले नसतील तर तो त्यांचा भाग आहे. दुसरी बाब अशी की, मागच्या वेळेला आपण ठरवलेले विषय आहेत. त्यावेळेस सभापती मोहन पाटील हे होते. त्यांच्या कारकिर्दीतला विषय आहे. ते असतांना आपण हा प्रश्न विचारला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

प्रश्न सभापतींचा नाही. तुमच्या लक्षात विषय आलेला नाही. महापालिकेने एखादी गोष्ट केली, मग तो तलाव असो, गार्डन असो, हॉस्पीटल असो, त्या ठिकाणी अमुक व्यक्ती उद्घाटक म्हणून येणार. आपण बोर्ड लावतो, बोर्ड बनवतो, चांगल्या ठळक सुवर्ण अक्षरात आणि त्या सभेला ते उद्घाटक म्हणून आले नाहीत. तरी त्यांचे नांव पाटीवर राहून जाते, मग ते नांव तुम्ही ठेवायचे का? त्या पाटीवर त्यांच्या नावाची आवश्यकता आहे का? जर ते उद्घाटक म्हणून आलेच नाहीत तर, हा विषय आहे.

**रतन पाटील :-**

म्हणजे निमंत्रण पत्रिकेवर त्यांचे नांव छापले जाते आणि उद्घाटक म्हणून जर ते येत नाहीत. तर उद्घाटनाच्या प्रसंगी न आल्याने त्यांचे नांव पाटीवर यायला पाहिजे की नाही यायला पाहिजे हा मुद्दा आहे.

**मा. सभापती :-**

आपला प्रश्न बरोबर आहे. तरीसुद्धा आता आपण सर्वमतानी या ठिकाणी ठरवू या की, ह्यापुढे असे होणार नाही.

**जयंत पाटील :-**

आता घडलं असेत तर तुम्ही काय कराल? त्यांनी उद्घाटनच केलेले नाही, आलेच नाही आणि त्यांचे नांव उद्घाटक म्हणून का ठेवायचे? तेथील स्थानिक जनता ती पाटी तोडून टाकेल. तर त्यांनी ती पाटी तोडायची का? आणि त्यांनी जर तोडले तर तुम्ही त्यांना दोष देऊ शकणार नाही. जयंत पाटील एखाद्या ठिकाणी उद्घाटक म्हणून जाणार आहे व बोर्डावर नांव लिहिलेले आहे आणि जर मी गेलो नाही तर माझे नांव त्या ठिकाणी कायमचे का ठेवावे?

**मा. सभापती :-**

आपण आत्ता ह्या विषयावर मघाशी सांगितल्याप्रमाणे सर्वांनी मिळून ह्या विषयावर आपले ठामपणे विचार करु या की, यापुढे असे होता कामा नये.

**जयंत पाटील :-**

मी विचारतो आत्तापर्यंत घडले कसे काय? लोकांनी बोर्ड का ठेवावे, ते सांगा. लोक तो बोर्ड काढणारच आहेत. त्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घ्यायची आवश्यकत नाही. तो बोर्ड लोक काढणार आहेत आणि तशा तऱ्हेचे पत्र मी महापलिकेला दिलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

विषयपटलावर विषय आणून आणि तसा विचार ऐकून तसा ठराव करुन घेऊ.

**गजानन भोईर :-**

आपण विषयपटलावर विषय आणा आणि मागे सांगितले त्याचाही विचार आपण करावा. आपण जे ठराव करतो त्या ठरावाला काय अर्थच राहत नाही. असे एक दोन ठराव असतील की, त्या ठरावाची अजुन पुर्तता झालेली नाही.

**मा. सभापती :-**

मागच्या वेळी जो ठराव झाला होता त्याची पुर्तताच होत नाही असे सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांचे म्हणणे आहे आणि आपणा सर्वांना माहिती असेल, पण त्याचप्रमाणे त्याच ठरावात आपण चर्चा करुन पुनःश्च त्या ठरावाचे अनुमोदन करतांना एकदा ठराव झालेला आहे. त्याच्यात काहीतरी बदल करता येईल असे करु या.

**जयंत पाटील :-**

ठराव काय आहे?

**मोहन पाटील :-**

कसला ठराव?

**गजानन भोईर :-**

सदर नगरसेविकांच्या वॉर्डामध्ये काम चालू आहे आणि तिला शेवटपर्यंत पत्र नाही, आमंत्रण नाही. समजा ७ नंबर आणि २४ नंबर आमचे प्रभाग आजुबाजूला आहेत. उद्या जर २४ नंबरमध्ये काही काम असेल तर आमच्या ५ नंबरचे नांवही त्याच्यावर लागली पाहिजे आणि ७ नंबरमध्ये असेल तर त्यांची नांवे आमच्या येथे लागली पाहिजे. तशी पद्धत कुठपर्यंत. जर माझ्या प्रभागामध्ये असेल तर ७ नंबर, ९ नंबर, २४ नंबरवाल्यांची नांवे लागली पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नांव कुठेच लागलेले नाही.

**गजानन भोईर :-**

त्याच्यावर सभापती साहेब रुलिंग देतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते तिथल्या सभापती साहेबांना कसे काय माहिती असेल?

**रतन पाटील :-**

सभापती साहेबांना प्रश्न विचारला आहे, उत्तर सभापती साहेबांनी द्यावे.

**मोहन पाटील :-**

प्रशासनाने यावर खुलासा करावा. त्याची सद्यस्थिती व वस्तुस्थिती काय होती? जे आरोगय केंद्राचे उद्‌घाटन झाले त्या आरोग्य केंद्राच्या उद्‌घाटनामध्ये ज्या पत्रिका छापतो त्या पत्रिका वाटपाचे काम सभापती किंवा पदाधिकारी करत नसतात, त्याचे काम प्रशासनाचे आपले अधिकारी, कर्मचारी वर्ग करतात. आपण ती पत्रिका पाठवली की नाही त्याची खात्री करुन घ्या. पोहोचली की नाही पोहचली.

**एस्. ए. खान :-**

असे नेहमीच चुका होतात. नेहमी नांव सुटून जाते. परत दोन-दोन, तीन-तीन वेळा ती पत्रिका छापली जाते. एकाच वेळी फायनल करा.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य माझा विषय वेगळा आहे.

**एस्. ए. खान :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, आपला विषय जरी वेगळा असला तरी ते एकमेकांशी निगडीत आहे.

**जयंत पाटील :-**

नाही, निगडीत नाही.

**गजानन भोईर :-**

खान साहेब, पहिले उनके प्रश्न का उत्तर देने दिजीए। फिर अपना प्रश्न पुछेंगे।

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सर्व सदस्यांना अशी विनंती करतो की, दोन विषयाची चर्चा झाली. पहिला जो विषय आहे, मा. जयंत पाटील साहेबांनी मांडला. दुसरा विषय मा. गजानन भोईर साहेबांनी मांडला. पहिल्या विषयामध्ये मा. जयंत पाटील ह्यांनी सांगितले की, कार्यक्रम झाल्यानंतर त्या पाटीवर नांवाबद्दलचा जो काही आहे.

**जयंत पाटील :-**

कार्यक्रम महापालिकाच ठरवते. महापालिका तशी कार्ड छापते. महापालिका संपूर्ण परिसरामध्ये ते कार्ड वाटते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

पाटील साहेब, जो स्थायी समितीचा ठराव झाला त्याप्रमाणे त्या कार्डावर नांव लिहिले जाते.

**जयंत पाटील :-**

ठराव काय झाला ते आम्हांला कळू द्या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २११ व ठराव क्र. १९२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

हा ठराव वेगळा आणि मी बोलतो ते वेगळे आहे.

**गजानन भोईर :-**

पत्रिका नगरसेविकेला पोहोचली नाही. त्याचे कारण काय होते?

**रतन पाटील :-**

ठराव बरोबर आहे. या ठरावाचे पालन व्हावे.

**मा. सभापती :-**

याप्रमाणे पुढच्या सभेच्या आधी आपण संबंधित अधिकाऱ्यांना आपण बोलवून हा प्रश्न विचारला आणि ह्यापुढे असे होणार नाही अशी त्यांना ताकीद देऊ द्या.

**रतन पाटील :-**

संबंधित एका नगरसेविकेला ह्या प्रभागामध्ये कार्यक्रम होता त्या प्रभागाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण पोहोचले नाही ही गंभीर बाब आहे. कारण ज्या प्रभागामध्ये राहतात त्या प्रभागामध्ये काम करतात. त्या प्रभागामध्ये जर कार्यक्रम आहे, त्याचे निमंत्रण त्यांना पोहोचले नाही. फायदा काय? अन्य तिथे दुसरे नगरसेवक येतात आणि त्या प्रभागाची नगरसेविका नसेल तर त्याला उपयोग काय? ह्याचा खुलासा करा की, काय आहे?

**प्रभात पाटील :-**

जर त्या वॉर्डाच्या नगरसेवकाला माहिती नाही, ही गोष्ट गंभीर आहे. तुम्ही आम्ही त्या ठिकाणी आहोत असा विचार करा.

**गजानन भोईर :-**

याबाबतची आपण विचारणा करा.

**प्रभात पाटील :-**

असे का झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, पत्र वाटायला जो गेला असेल तो सही घेतो. त्यााला बोलावून विचारा ना की, तो गेला होता की नाही. त्या कर्मचाऱ्याला सभागृहात बोलवा.

**मा. सभापती :-**

त्या खात्याचे जे अधिकारी आहेत, डॉक्टर साहेब, ते ठाण्याला कार्टामध्ये गेलेले आहेत. म्हणून आपण पुढच्या सभेला त्यांना बोलावून त्याप्रमाणे माहिती घेऊ या.

**जयंत पाटील :-**

डॉक्टर साहेब कोर्टात गेले आहेत हा विषय नाही. प्रश्न असा आहे की, त्यांनी सांगितले की, उद्घाटक म्हणून एवढे एवढे नांव टाका, मंजुर आहे. उदा. मा. महापौरांचे नांव लिहा उद्घाटक म्हणून आणि महापौर तिथे उद्घाटक म्हणून आले नाही, विदाऊट ॲनी ॲन्टीमेशन, कुठल्याही तऱ्हेचे त्यांनी सांगितले नाही की, आम्हांला येता येणार नाही, काही कळवलं नाही. तर तुम्ही काय करणार? उद्घाटक म्हणून नांव ठेवणार का?

**प्रभात पाटील :-**

त्यांच्या हस्ते उद्घाटन झाले नाही. उद्घाटन झाले मोहन पाटील यांच्या हस्ते. तर मोहन पाटील ह्यांचे नांव तिथे असले पाहिजे की, महापौरांचेच असले पाहिजे?

**जयंत पाटील :-**

त्यांचे नांव येऊ द्या. कोणीतरी उद्घाटन केले, उद्घाटन थांबलेले नाही. मग ज्याने उद्घाटन केले त्यांचे नांव येऊ द्या. नविन पाटी बनवा.

**प्रभात पाटील :-**

ते त्यांचे नांव द्या.

**मा. सभापती :-**

असे कसे होणार?

**जयंत पाटील :-**

उद्घाटक आलेच नाही, तर त्यांची नांवे कशाला शो ला लावायची.

**मोहन पाटील :-**

आपले म्हणणे आहे.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे मग चुकीचे आहे?

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, एखादा कार्यक्रम निघाल्यानंतर, महानगरपालिकेची कुठलीही वास्तु असू द्या किंवा कुठला शासकिय कार्यक्रम असतो, त्या कार्यक्रमाची पत्रिका आणि पाटी बनल्यानंतर त्या ठिकाणी सन्मा. मुख्यमंत्री साहेब, समजा आले नाही किंवा तिथले मंत्री महोदय आले नाही. त्यांचे नांव काढले जात नाही.

**जयंत पाटील :-**

मुख्यमंत्री येण्याचे कारण ते देतील ना की, ह्या विशिष्ट कारणांमुळे येऊ शकत नाही.

**मोहन पाटील :-**

एखाद्या वास्तुचा कार्यक्रम फिक्स झाल्यानंतर ते आले नाही म्हणून पाटी काढली जात नाही. ती पाटी तशीच राहते.

**जयंत पाटील :-**

का? कारण काय?

**मोहन पाटील :-**

तशी प्रथाच आहे. ती पाटी काढली जातच नाही. पाटी आपण लावली.

**जयंत पाटील :-**

मला मान्य आहे, पाटील प्रशासन काढणार नाही. पण तिथली स्थानिक जनता काढेल. त्याला तुम्ही काय करणार? म्हणजे जनतेच्या भावनेशी आपण खेळायचे? जनता तुम्ही येणार म्हणून तुमच्यासाठी तिथे थांबलेली आहे. तुमचे वक्तव्य ऐकायला वाट बघते. तुम्ही उद्‌घाटक म्हणून येणार, जनता वाट बघते आणि आपण यायचे नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, सभा सुरु करण्यापुर्वी मी आरोग्याचा एक विषय घेतो.

**जयंत पाटील :-**

सदर विषयावर निर्णय कोणी दिला तर माजी सभापती ह्यांनी दिला. ह्याचे रुलिंग कोणी द्यायचे?

**मा. सभापती :-**

मी मघाशीच सांगितले की, पुढच्या सभेला हा विषय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन.....

**जयंत पाटील :-**

येथे अधिकाऱ्यांचा प्रश्नच येत नाही. येथे सदस्यांना निर्णय घ्यायचा आहे.

**मा. सभापती :-**

सर्वांच्या मतांनी आपण ठरवायचे आहे. यापुढे असे होणार नाही.

**जयंत पाटील :-**

मग आत्ताच ठरवा, सगळे उपस्थित आहेत.

**कैलासबेन जानी :-**

पण विषयपत्रिकेवर विषय नाही आहे ना?

**गजानन भोईर :-**

अधिकाऱ्यांनी असे ठरवले की, स्थानिक नगरसेवकांना पत्रिका देऊच नये.

**कैलासबेन जानी :-**

विषयपत्रिकेवर विषय नाही. जेव्हा विषयपत्रिकेवर विषय आणणार तेव्हाच होणार.

**मा. सभापती :-**

चुकी ही त्या अधिकाऱ्यांचीच असेल. पत्रिका वाटप करणाऱ्याला कोण सांगु शकतो की, पत्रिका देऊ नका.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय त्या ठिकाणचे स्थानिक नगरसेवक आहेत. तर त्या प्रशासनाच्या अधिकाऱ्याने खरोखर पत्रिका दिली की नाही त्याची शहानिशा करा आणि शहानिशा करुन जर त्याच्याकडून पत्रिका दिली नसेल, तर ह्याच्यावर त्या पद्धतीची त्यांची कानउघडणी केली पाहिजे. कारण हे चालणार नाही. उद्या जर तुम्ही त्या ठिकाणी नगरसेवक असू किंवा आम्ही जर नगरसेवक त्या ठिकाणी असू आणि आम्हांला पत्रिका दिली नाही, ती गंभीर बाब असेल. त्यांच्या भागामध्ये जर कार्यक्रम होतो. तर तुम्ही तशा प्रकारचे निर्देश द्या अधिकाऱ्यांना की, तुम्ही अशा प्रकारचे केले असेल तर त्याची हयगय केली जाणार नाही. हे काम चुकीचे आहे.

**मा. सभापती :-**

त्याप्रमाणेच करण्यांत येणार आहे. त्याच्यावर कार्यवाही करावीच लागणार आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

जो वाटप करतो त्याची जबाबदारी आहे. त्या प्रभागाच्या त्या स्थानिक नगरसेविका आहेत. त्यांना बोलावले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

ज्या दिवशी उद्घाटन असेल त्या दिवशी पाटीवर नांव लिहा.

**प्रभात पाटील :-**

नांव पण त्याच दिवशी टाकायचे. जो उद्घाटक असेल त्याचे नांव त्या दिवशी टाकायचे. त्या आधीच पाट्या तयार करायच्या नाहीत.

**ज्युडी डिसोझा :-**

सभापती साहेब, मला असे सजेशन करायचे आहे की, पत्रिका वाटपाचे जे काम ते आपण कुणा एका व्यक्तीकडे द्या. प्रत्येक वेळेला वेगवेगळी माणसे येतात. कोणाला आमचे घर माहित नसते. ते विचारत असतात? ग्रिटा मॅडमचे घर कुठे अहे? स्टीवन शेठचे घर कुठे आहे? तर कुणा एका माहितीदार व्यक्तीला ते काम सोपवले तर तो बरोबर वाटप करेल आणि जर असा प्रश्न आला तर आपण त्या व्यक्तीला पकडू शकतो. आता आपण कोणाला शोधायला जाल? कोणी वाटले आहे ते कसे माहिती पडेल? तो जो स्थानिक आहे व त्याला सर्वांची घरे माहिती आहेत, अशाच व्यक्तीकडे तुम्ही ते काम द्या. बाहेरच्या लोकांना देता, कोण उल्हासनगरचे आहेत, कोण पालघरचे आहेत. त्यांना रात्री रात्री पाठवता. कधी दहा वाजता, कधी अकरा वाजता पत्रिका घेऊन येतात. त्यांच्यावर हा अन्याय होतो म्हणून तुम्ही स्थानिक व्यक्तीकडे पत्र वाटपाचे काम द्या आणि त्याला ह्या ठराविक कामासाठी नेमा.

**एस्. ए. खान :-**

ज्यांना सर्व नगरसेवकांच्या घराची माहिती झालेली आहे, त्यांनाच वाटपाचे काम द्यायचे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मला राजकुमार कांबळे ह्यांना आरोग्य विषयाबद्दल प्रश्न विचारायचे होते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपण अगोदर हा जो विषय विषयपत्रिकेवर आहे त्याला सुरुवात करु या.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा अति महत्त्वाचा विषय आहे. माझ्या प्रभागामध्ये डेंग्युची साथ आलेली आहे.

**मा. सभापती :-**

विषयपत्रिकेवरील विषय संपल्यानंतर आपण ह्या विषयावर चर्चा करु या. हा विषय नंतर घेऊ या आणि सध्या डॉक्टरही ह्या ठिकाणी नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

गेल्या पाच महिन्यापासून मशिन पाठवतात. पण अजुन मशिनचा ठिकाणा नाही.

**मा. सभापती :-**

हा विषय आपण नंतर घेऊ या.

**गजानन भोईर :-**

स्नेहा हॉस्पीटलमध्ये लेप्टोस्पायरासिसचा पेशन्ट ॲडमिट आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

डेंग्युचा पेशन्ट अजुन साईबाबा हॉस्पीटलमध्ये ॲडमिट आहे.

**प्रभात पाटील :-**

माझ्या प्रभागामध्येही एक डेंग्युचा पेशन्ट आहे.

**मा. सभापती :-**

सभा चालू करु या. डॉक्टर साहेब येणार आहेत, तेव्हा त्यांना आपण विचारु या.

**प्रेमनाथ पाटील :-**

राजकुमार कांबळे आहेत ना?

**मा. सभापती :-**

आपण नंतर विचारु या. आत्ता सभेला सुरुवात करु या.

**प्रभात पाटील :-**

पहिला विषय घ्यायला हरकत नाही. इंतिवृत्तांत मंजुरीचे एवढे विषय आणले की, तुमचे सगळे विषयच मागे राहिले आहेत. एका वेळेला किती इतिवृत्तांत मंजुर करायचे?

**केशव घरत :-**

हा विषय बरोबर आहे. एक सभा झाली की, पुढच्या सभेला इतिवृत्तांत आले पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

हे इतिवृत्तांत आम्ही वाचलेलेही नाही.

**प्र. सचिव :-**

त्यावेळी सभा ताबडतोब लागत होत्या.

**प्रभात पाटील :-**

असे कसे प्रत्येक वेळी सभेचे इतिवृत्तांत आले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

एका सभेचे किती इतिवृत्तांत होईल? हे दोन तीन दिवसांत होऊ शकत नाही का?

**प्र. सचिव :-**

दोन-तीन दिवसात इतिवृत्तांत होऊ शकत नाही.

**गजानन भोईर :-**

प्रत्येक सभेचे इतिवृत्तांत हे पुढच्या वेळेला आले पाहिजे.

**केशव घरत :-**

विषय होऊन जातात, सहा सहा महिन्यानंतर इतिवृत्त येते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, मेजोरिटी विन्स. आपण इतिवृत्त हे प्रत्येक सभेला द्यायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, आपल्याकडे स्टाफही भरपूर आहे.

**प्र. सचिव :-**

कोणी सांगितले माझ्याकडे स्टाफ भरपूर आहे.

**मिलन पाटील :-**

दोन दोन मशिन आहेत.

**प्र. सचिव :-**

दोन क्लार्कमध्ये चालवतोय.

**केशव घरत / सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण स्टाफ वाढवून घ्या.

**मिलन पाटील :-**

एक एक डिपार्टमेंटमध्ये प्युन सरप्लस आहेत.

**प्रभात पाटील :-**

कमी असेल तर आपण टेंडर काढा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, दि. १८/०५/२००५ च्या सभेमध्ये मी असा एक विषय मांडला होता की, त्यांना पकडले की नाही. तर मारलं का नाही असे लिहिले आहे. पाच सहा महिन्याचे आम्हांला कसे आठवणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

दि. १८/०५/२००५ चे इतिवृत्तांत फक्त मंजुर करायचे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, आज आम्ही फक्त एकच इतिवृत्तांत पास करणार.

**गजानन भोईर :-**

पाच महिन्यापुर्वी माझे ४९ वय होते आणि आत ५० झाले.

**प्र. सचिव :-**

पुढच्या सभेपासून कंन्टीन्युमध्ये येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही वाचलेले नाही.

**रतन पाटील :-**

या संदर्भात सचिव कार्यालयात निश्चितच जर स्टाफ कमी असतील, तर तशा प्रक्रियेने सक्रिय करावी आणि अशा पद्धतीचा घोळ होणार नाही, हा गोंधळ होणार नाही, जो आता होत आहे. त्या पद्धतीने ज्या नेमणुका असतील, त्यांना क्लार्क किंवा त्यांना स्टोनो पाहिजे तशी तरतुद करा.

**गजानन भोईर :-**

सचिव डिपार्टमेंटला जो स्टाफ आहे. पाहिजे तो उपलब्ध करुन द्या.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण हे जे एवढे इतिवृत्तांत पास करणार आहोत. हे केल्यानंतर त्या ठरावाची अंमलबजावणी होते किंवा नाही की, आपण नुसते ठराव पास करुन द्यायचे, त्यांच्या माथी मारायचे आणि आमचे आम्ही डोक्यावर मारुन घ्यायचे आणि ते मारल्यानंतर त्याची अंमलबजावणी होते किंवा नाही, हे प्रत्येक वेळेला इतिवृत्तांत आल्यानंतर आपल्याला त्याचे काहीतरी कार्यबाद करायचा विचारतांना येईल. आता हे पाच महिन्याचे मे महिन्याचे काय सांगायचे? मे महिन्यानंतर आता पुर येऊन गेला.

**गजानन भोईर :-**

संपूर्ण जेवढी शौचालये आहेत, त्याच्यामध्ये पाण्याचे टँक बसवायचे, तो ठराव येऊन दिड दोन वर्ष झाला. पण त्याची अजुन पुर्तता झाली नाही. एकाही शौचालयाला वॉटर टँक बसविण्यात आलेले नाही.

**मिलन पाटील :-**

आपण नुसते ठरावच करत राहायचे. जर ठरावाची पुर्तता होत नसेल तर त्याला काय अर्थ आहे?

**गजानन भोईर :-**

ठरावाचे काही पालन होत नाही.

**मिलन पाटील :-**

पुर्तता जर होत नाही तर त्या इतिवृत्तांताचा अर्थ काय?

**केशव घरत :-**

हा विषय सार्वजनिक बांधकाम खात्याला विचारा की, पाणी डिपार्टमेंटकडे........

**गजानन भोईर :-**

एकाने चुक केली त्याला माफी मागावी लागली. सभेमध्ये त्याने ताबडतोब माफी मागितली. पण एवढे ठराव पाच-पाच, दहा-दहा ठराव मागे करतात ह्याची माफी कोणी मागायची आमच्याकडे. एका ठरावाची माफी मागितली होती. मग का असे ठरावाचे पालन होत नाही?

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, जर चुक होते आणि अधिका-यांची जर चुक झाली तर आम्ही करु ना.

**गजानन भोईर :-**

आपल्याला एक चुक मान्य आहे.

**मिलन पाटील :-**

मग साहेब, आम्ही दहा चुका करत नाही.

**गजानन भोईर :-**

दहा पंधरा ठराव असेच आहेत.

**प्रभात पाटील :-**

आज एक ठराव मंजुर करायचा आणि त्याची काय पुर्तता होते आणि पुढच्या वेळेला पुढच्या इतिवृत्तांत मंजुर करायचे.

**प्र. सचिव :-**

हे असे ठेवले तर पुढच्या वेळेला पुन्हा पुढचे पेंन्डींग राहणार.

**मिलन पाटील :-**

चार दिवसानंतर दुसरी सभा लावा. इतिवृत्तांतावर चार दिवसांनी सभा लावा.

**प्र. सचिव :-**

मला स्टाफ द्या. माझ्याकडे जास्त स्टाफ नाही.

**केशव घरत :-**

सचिव सहेब, आपण स्टाफ मागवून घ्या. आयुक्तांना सांगा की, माझ्याकडे स्टाफ नाही.

**मिलन पाटील :-**

सचिवजी प्रशासन तुमच्या शेजारी बसलेले आहे. त्यांना अधिकार आहेत. सरप्लस स्टाफ इतर खात्यामध्ये आहे तो येथे वर्ग करुन घ्या. कारण हरिभाऊंकडे काही नाही ना, म्हणून कोणी यायला तयार नाही. साहेब, आपण प्रशासनाला आदेश करा की, ताबडतोब स्टाफ उपलब्ध करुन द्या कारण हे महत्त्वाचे आहे आणि पुढे हफ्त्या हफ्त्याला दोन दोन सभाही लागतील. कारण आपण कार्यशील असे सभापती आहात. आपण विषयाचे गांभिर्य घ्या. खुप आणखीन आपले विषय आहेत. पुढच्या पुढच्या हफ्त्याला दोन वेळा सभा लावा. पण काहीतरी शहराच्या हितासाठी करा.

**गजानन भोईर :-**

तिस-या मिटींगला त्या ठरावाची पुर्तता झाली का नाही, ह्याचा पण आपण ताबडतोब अहवाल घ्या. ह्या ठरावाची पुर्तता झाली का नाही आणि नसेल तर संबंधित जे कोणी अधिकारी असतील त्यांच्यावर कार्यवाही करा.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे. कारण चार महिन्यापुर्वीची गोष्ट कोणाच्याही मनात राहणार नाही. म्हणून जे पेंन्डींग आहेत, अजुनपर्यंत दोन चार पेंन्डींग आहेत.

**मिलन पाटील :-**

माजी सभापतींना विचारा की, पाचव्या महिन्यात ठराव काय झाला? त्यांनी सांगावे आम्ही सरळ पास करतो.

**जयंत पाटील :-**

सभापती महोदय, येथे पाच सभेचे इतिवृत्तांत आपण मंजुरीसाठी आणले आहे. खरं म्हणजे स्थायी समितीमध्ये मी पहिल्यांदाच आलो आहोत. इतिवृत्तांत वाचल्यानंतर पुर्वीचे आठ नगरसेवक ज्यांचे ह्याच्यामध्ये स्टेटमेंट आहे, त्यांनी ह्याच्यावर चर्चा केलेली आहे, ती दुरुस्ती आता कोण करणार? आठजण निवृत्त झाले, त्यांची दुरुस्ती कोण करणार?

**प्र. सचिव :-**

ग्रॅमेटीकल असेल तर इतर जे सदस्य असतील ते सुचवतील आणि जर काही लिखानामध्ये दुरुस्ती असेल......

**जयंत पाटील :-**

ते काय बोलले ह्याची कल्पना आम्हांला कशी काय येणार?

**प्र. सचिव :-**

नेहमी एक सभा अशी पुढेच जाणार आहे. जरी ते निवृत्त झाले तरी.

**जयंत पाटील :-**

ते एका वेळेचे भाग आहे. मला तर असे म्हणायचे की, जोपर्यंत तुमचे इतिवृत्त मंजुर होत नाही तोपर्यंत तुम्ही केलेले ठराव आणि त्यात केलेली चर्चा तुम्हांला पुढच्या कार्यक्रमासाठी लागूच होत नाही. मागच्या सभेमध्ये जे ठराव झाले ते ठराव जोपर्यंत आपले इतिवृत्त मंजुर होत नाही, त्या कार्याची तुम्ही पुर्तता कशी करणार?

**रतन पाटील :-**

त्याचे कामसुद्धा चालू झालेले आहे. त्याचे टेंडर निघाले आहेत व कामसुद्धा चालू झालेले आहे आणि येथे इतिवृत्तांत मंजुरपण झालेले नाही.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, प्रशासन उत्तर देईलच. परंतु, जनरली असे असते की, मिटींगमध्ये ठराव झाल्यानंतर त्याचे इम्प्लिमेंटेशन होते. म्हणजे इतिवृत्तांतासाठी इम्प्लिमेंन्टेशन राहत नाही. आपला जो पहिल्यापासून कारभार आहे, नगरपालिकेपासून ते आजपर्यंतच की, एखादा ठराव पास झाल्यानंतर त्याचे इम्प्लिमेंन्टेशन इतिवृत्तांतावर अवलंबून नसते. इतिवृत्तांतामध्ये ग्रॅमेटिकल मिस्टेक असतात.

**गजानन भोईर :-**

जे आठ ठराव आहेत, त्यांची एका वर्षात पुर्तताच झालेली नाही.

**मोहन पाटील :-**

पुर्तता झाली नाही, हा विषय वेगळा आहे.

**जयंत पाटील :-**

मोहन पाटील साहेब, आपल्या म्हणण्याशी मी थोडासा सहमत आहे. इम्प्लिमेंन्टेशन आणि ग्रॅमेटिकल हे दोन्ही वेगवेगळे भाग आहेत. एखाद्याने ठराव मांडला की, एवढ्या लाखाचे हे काम व्हायला पाहिजे. त्या लाखाच्या पुढे जर झिरो पडला तर तुम्ही काय करणार? त्याचे इम्प्लिमेन्टेशन म्हणजे काय? त्याची अमाऊंन्ट तेवढी आपण देणार? मग इतिवृत्त मंजुरीला का येते?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब तसे नाही.

**जयंत पाटील :-**

मग आपण इतिवृत्त मंजुरीला विषयच तसा आणू नका.

**मोहन पाटील :-**

ठिक आहे, जरी झिरो आला तरी ती ग्रॅमेटिकल मिस्टेक होऊ शकेल.

**जयंत पाटील :-**

तोपर्यंत तुम्हांला त्या ठरावाची पुर्तता करता येणार नाही. ते काम करु शकणार नाही.

**मोहन पाटील :-**

आपल्याला पुर्ण कल्पना आहे की, ठराव मंजुर झाल्यानंतर त्याचे इम्प्लिमेंन्टेशनला सुरुवात होते आणि नंतर जे ग्रॅमेटिकल मिस्टेक असते ते आपण इतिवृत्तांतामध्ये मंजुर करुन घेतो.

**जयंत पाटील :-**

तीन दिवसामध्ये ताबडतोब दुस-या दिवशी तुमचे होते का?

**मोहन पाटील :-**

त्याची पुर्तता, त्याला लागणारी वेळ......

**जयंत पाटील :-**

मुळात आपले जे प्रोसिडींग आहे, आपण ते इतिवृत्त मंजुरीसाठी आणले आहे. ते खुप उशिरा आणलेले आहे. सात दिवसामध्ये काही मोठा फरक पडत नाही.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे, पण सचिव साहेबांनी आपल्याला याबद्दल सांगितले की, त्यांच्याकडे जर खरोखर स्टाफ नसेल तर त्यांना स्टाफ दिला पहिजे. या पद्धतीचे आपणही त्यांना सहकार्य केले पाहिजे.

**जयंत पाटील :-**

त्यांनी स्टाफची मागणी आपल्याकडे करण्याचीच आवश्यकता नाही.

**मोहन पाटील :-**

त्यांनी स्टाफची मागणी वारंवार केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, पान क्र. २ मध्ये सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांनी जो ठराव मांडला आहे. त्या ठरावामध्ये वॉर्ड क्र. ७ आणि २४ चा ठेका रद्द केलेला आहे. तर हा ठेका रद्द केला आहे की नाही? मॅडम ज्यावेळी उपाषणाला बसल्या होत्या हे त्यावेळेचे आहे. तो ठेका रद्द झालेला आहे का?

**गजानन भोईर :-**

सदरहू ठेकेदारावर कार्यवाही करावी तर त्याच्यावर कार्यवाही झाली का?

**प्रभात पाटील :-**

त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे होते.

**गजानन भोईर :-**

ब्लॅक लिस्टमध्ये न येता तो एकदम व्हाईट लिस्ट आला.

**प्रभात पाटील :-**

तो एकदम व्हाईटमध्ये आहे. त्याच्यामध्ये नोंद आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपण ह्याचे गांभिर्य घ्या. एखादा सदस्य असा ठराव मांडतो की, ह्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाका. तो माणूस ह्या महानगरपालिकेतर्फे सर्वात जास्त काम घेतो. म्हणजे ह्याचा अर्थ काय? म्हणजे नक्की काय केले? त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकले की, काय केले?

**प्रभात पाटील :-**

समजा, मी जर एखाद्या ठरावाची कॉपी मागितली. स्थायी समितीचा सहाव्या महिन्यातील जो ठराव आहे. मला त्या ठरावाची कॉपी द्या. तर आपल्या प्रशासनाचे उत्तर असे असते की, ते इतिवृत्तांत अजुन मंजूर झालेले नाही. मग तुम्हांला तशी प्रत देता येत नाही आणि कामाला मात्र मंजुऱ्या देता येतात व काम ओके करता येतात. हा कुठचा न्याय आहे?

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, जी आपण प्रत्येक वेळी म्हण वापरता ना की, आंधळं दळतंय आणि कुत्र पीठ खातंय, हे प्लीज कुठेतरी बंद करुन टाका.

**प्र. सचिव :-**

याबाबत खुलासा करतो की, सचिव कार्यालयाकडे चार स्थायी समिती, एक मा. महासभा कमीत कमी एक दिवस किंवा दोन दिवस चालते. वृक्ष प्राधिकरणाची एक समिती, महिला व बालकल्याणची एक समिती, परिवहनची दोन समिती अशा कमीत कमी महिन्याला अकरा सभा होतात. अकरा दुणे बावीस दिवस सचिव कार्यालयाचे सभेमध्ये जातात आणि फारतर दोन लिपीक आणि दोन स्टेनो आहेत आणि इतर महापालिकेच्या सचिवांकडे तीसच्या वर स्टाफ आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण प्रशासनाकडे मागणी केली आहे का?

**प्र. सचिव :-**

मागणी केली, मला कायम स्वरुपी स्टाफ पाहिजे. मला ठेक्यातला स्टाफ नको.

**सुर्यकांत भोईर / प्रेमनाथ पाटील :-**

किती स्टाफची मागणी केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

नगररचनेमध्ये स्टाफ एक्स्ट्रा आहे. ते काढून घ्या. ते तिथे कशाला आहेत? नगररचना व बांधकाम विभागामध्ये एक्स्ट्रा स्टाफ आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

नगररचनेमध्ये जो स्टाफ जास्त आहे तो कमी करा.

**गजानन भोईर :-**

चर्चा करण्यापेक्षा, सभापती साहेब, आपण ह्याच्यावर निर्णय घ्या.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, स्थायी समिती सभागृहामध्ये एखादा नगरसेवक किंवा अन्य नगरसेवक बोलतात की, एखादा ठेकेदार निश्चितच चांगले काम करत नाही त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाका. तो त्याच्या कामाच्या पद्धतीवरुन हे सगळे बोलले जाते. त्याच्यावर हे सभागृह का निर्णय घेत नाही? आता असे दिसले की, त्याला ब्लॅक लिस्टवरुन व्हाईट लिस्टमध्ये टाकलेले आहे. त्याला जास्त टेंडर दिले जात आहे. ह्याच्यावर कुठेतरी निश्चित धोरण व्हायला पाहिजे. तुम्ही नगरसेवकांचा, स्थायी समिती सदस्यांना हा मान आहे की, अपमान करता की, त्या ठेकेदारांन ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे तर त्यांचा सन्मान करता. हे कुठेतरी थांबायला

पाहिजे आणि ह्याच्यावर कुठेतरी धोरण घ्या, असे होऊ नये. सभापती साहेब, तुमच्याकडून आम्हांला हीच अपेक्षा आहे.

**मा. सभापती :-**

यापुढे असे होणार नाही असे मी आपल्याला सांगू इच्छितो.

**रतन पाटील :-**

धन्यवाद.

**मा. सभापती :-**

तसेच, उपायुक्त रणखांब साहेबांना मी विनंती करतो की, पुढच्या वेळेला सचिव साहेबांना ताबडतोब इतर खात्याचे जे जादा कर्मचारी असतील ते वर्ग करा आणि आजच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सचिव कार्यालयाबरोबर त्यांनी चर्चा करावी. त्यांच्या रिक्वायरमेंटप्रमाणे. जसे शक्य होईल, उपलब्धतेनुसार त्याची पुर्तता करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु. परंतु, आपण सांगितल्याप्रमाणे कायमस्वरुपी आपण आढावा घेता त्याच्यामध्ये जी पदांची जे अतिरिक्त मा. मिलन पाटील ह्यांनी सांगितले की, त्याच्याप्रमाणे जेवढी शक्य होईल तेवढी पदे देण्याचे प्रयत्न करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रयत्न करु नका. जरुर त्यांना कर्मचारी द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांना किती दिवसात आपण कर्मचारी द्याल, ते आपण आम्हांला सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेबांनी सांगितले की, परिवहनची सभा असते, महिला व बालकल्याण समितीची सभा असते, तर आपण त्यांना तसा वेगवेगळा स्टाफ द्या.

**जयंत पाटील :-**

इतिवृत्तांताला मंजुरी द्या. मोहन पाटील साहेब, हे ग्रॅमेटिकल मिस्टेक असेल. आपण महात्मा गांधीना येथे राष्ट्रपती म्हणून लिहिले आहे तर ते राष्ट्रपिता होते अशी दुरुस्ती इतिवृत्तांत १८/०५/२००५ च्या पान क्र. ४ मध्ये करावी आणि दुसरी एक आनंदाची गोष्ट आज मी येथे वाचली. सर्व नगरसेवकांना ती गोष्ट आनंदाची असेल.

**गजानन भोईर :-**

दि. १८/०५/२००५ च्या इतिवृत्तांत पान क्र. ३ वर श्यामराव पाटील कोण? तर श्यामराव पाटील कोणते तर बोरीवलीवाले आहेत. मी तसे बोललो तर बोरीवलीवाले नाही, नवघरवाले आहेत. तर ह्याच्यात बोरीवली नाहीत, नवघरवाले आहेत असे झाले आहे.

**रतन पाटील :-**

तो बोर्ड काढायचा होता, तो बोर्ड काढला का?

**जयंत पाटील :-**

तिथे बोर्ड नाही, मी काल पाहिला. स्वातंत्र्य सैनिक श्यामराव पाटील आपण जे म्हणतो, जे आपल्या डोक्यामध्ये आहे तो कसा होणार? दोन वर्षाचा मुलगा स्वातंत्र्य सैनिक कसा होणार? १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले.

**रतन पाटील :-**

तो बोर्ड कोणी लावला होता? त्याची पहिल्यांदा शहानिशा करा. महापालिका प्रशासनाने तो बोर्ड लावला नव्हता. तो बोर्ड कोणी लावला होता, ह्याची चौकशी व्हायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

दि. १८/०५/०५ च्या इतिवृत्तांत पान क्र. १४ वर सर्व नगरसेवकांना आनंदाची बातमी आहे. स्थायी समितीने ठराव अतिशय चांगला केलेला आहे. सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी ठराव मांडलेला आहे. आपल्याकडे आलेले आरोग्य अधिकारी चांगले काम करतात. ठिक आहे, सगळेजण चांगले काम करतात आणि नगरसेवक कोणतेही वाईट काम करत नाहीत. त्यामुळे दोन वर्षानंतर येणारी जी निवडणुक आहे, ती निवडणुक घेऊ नये. सदर नगरसेवकांना मुदतवाढ देण्यांत यावी असा मी ठराव मांडतो. ह्या ठरावाची कॉपी तुम्ही निवडणुक अधिकाऱ्याला पाठवा.

**प्रभात पाटील :-**

त्यावेळी असा प्रश्न होता की, नेहमी आपण डॉक्टरांना मुदवाढ, दुसऱ्या कोणत्या अधिकाऱ्याला मुदतवाढ असा करत असतो. त्यावेळी हा विषय निघाला होता.

**जयंत पाटील :-**

काही गोष्टी आपण डिलीट करायला पहिजे. सन्मा. सदस्य गजानन भोईर पाद मारायचे बोलले तर आपण पाद मारायचे तिथे लिहिणार का? हा विषय घेऊन नगरसेवका कोर्टामध्येही जाऊ शकतील. हा विषय कोर्टामध्ये जाऊ शकत नाही का? मग ह्याला हजर असणारे नगरसेवक जबाबदार ठरतील.

**प्रभात पाटील :-**

असे काही होत नाही. हा उपहासात्मक प्रश्न होता.

**जयंत पाटील :-**

हे प्रोसिडींगमध्ये घ्यायला नको असे माझे म्हणणे आहे. उपहासात्मक चर्चा वेगळी होऊ शकते. पण प्रोसिडींगमध्ये घेतांना ते गांभिर्याने घ्या. आम्हांला तर हे माहित नव्हते, आम्ही नवीन आलो आहोत.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक वेळी अधिका-यांच्या मुदतवाढीचाच प्रश्न येत होता.

**प्रभात पाटील :-**

प्रत्येक वेळी मुदतवाढीचाच विषय असतो.

**जयंत पाटील :-**

आम्ही नवीन आलो आहोत. आम्हांला माहिती नाही.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. १५ मध्ये १ ते १० काम म्हटले आहे आणि तपशिल ९ कामांचाच आहे. एक काम कोणते आहे?

**दिपक खांबित :-**

१ ते ९ काम असे आहे.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. ३७ मध्ये, मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की, मागचे सभापतीही उपस्थित आहेत. त्यांनी अवलोकनाच्या विषयावर कधी बोलायला दिले नाही, बरोबर आहे. परंतु, मला एवढेच म्हणायचे आहे की, अवलोकनाच्या विषयावर जरी चर्चा झाली नाही, तरी मला सगळ्या सदस्यांना अशी विनंती करायची आहे की, ह्या अवलोकनाच्या विषयाचा माल पुरवठा कामकाज जे काय असेल, त्याची पुर्तता कुठपर्यंत केली गेली ह्याचा तरी आपण तपशिल घ्यावा अशी माझी सगळ्यांना विनंती आहे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, ह्या विषयावर निश्चित चर्चा करणे व त्याचा खुलासा करण्याची आणि बोध घेण्याची गरज आहे. मी त्यावेळी मा. महासभेमध्येसुद्धा हा प्रश्न उपस्थित केला की, आयुक्त साहेबांच्या म्हणण्यानुसार अवलोकनार्थ हे विषय आपल्याकडे येथे चर्चा करायची नाही का? मग तो विषय आमच्याकडे पाठवण्याची गरजच काय आहे? अवलोकनासाठी नुसते बघायचे आणि बोलायचे नाही, चर्चा करायची नाही, असा विषय होऊ नये. जर अवलोकनाचे विषय असतील तर त्याच्यावर निश्चितच चर्चा करुन त्याचा खुलासा किंवा त्याच्यावर धोरणात्मक बाबी, सुचना करायच्या असतील तर त्याची त्यांनी तिथे नोंद करुन घ्यायची आहे. बोलायचेच नाही, अवलोकनाचे विषय आले की, लगेच मिटायचे, झाले, काहीच बोलायचे नाही असे होऊ नये. आता पहिले त्या पद्धतीने महानगरपालिका अधिनियमामध्ये तसे आहे का की, अवलोकनाचे जे विषय आहेत ते चर्चेला घ्यायचेच नाही का? असे कुठेतरी कायद्यामध्ये नियाममध्ये आहे का? तसे आपण आम्हांला सांगा.

**गजानन भोईर :-**

म्हणजे चर्चाही होणार नाही आणि सर्वांनी विचारलेल्या प्रश्नावर पत्रव्यवहार केला तर त्याचे उत्तरही द्यायचे नाही. मागे श्री. इरकर होते, त्यावेळी मी पत्र दिले होते त्यांच्या डिपार्टमेंटला. गोल्डन धुरांडा ह्याची किंमत त्यांनी साडेदहा रुपये लिहिले होते. सदरहू गोल्डन धुरांडा हा सव्वा दोन रुपयाला मार्केटमध्ये मिळतो. एक लाख झाडे जरी घेती तर साडे आठ रुपयाचा डिफरन्स त्याच्यामध्ये येतो.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, दि. ०१/१०/२००५ च्या लोकसत्तामध्ये आलेले आहे की, कल्याण महानगरपालिकेतील रसायन घोटाळा प्रकरणी दहा अधिका-यांवर गुन्हा दाखला करण्याचे आदेश हायकोर्टाने दिलेले आहेत. ह्याच्यामध्ये श्रीकांत सिन्हा वगैरे, बायस असे मोठमोठे अधिकारी आहेत, चंद्रशेखरसारखे अधिकारी आहेत. तर हे अधिका-यांनीसुद्धा देतांना त्याची पडताळणी केली पाहिजे की, ह्याची किंमत काय आहे? बेशक वाटेल ते पैसे लावतात आणि स्थायी समितीसमोर पाठवून देतात. आम्ही हे पुढच्या वेळेला स्विकारणार नाही. अधिका-यांनी ह्याची पाहणी केलेली असते का? उद्या जर ह्याच्यामध्ये कोण कोर्टात गेले तर ते दहा वर्षांनीसुद्धा आमच्यावर येऊ शकते. त्याला जबाबदार कोण?

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, अवलोकनाचे जेवढे विषय झालेले आहेत, त्याची मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितलेली आहे. मला माहिती मिळेलच. आता काय काय कामे झालेली आहेत?

**मिलन पाटील :-**

असे व्हायला नको, भिक नको पण कुत्रं आवर. आम्हांला अशी गत घ्यायची आहे, काम घ्या आणि पैशाचे काहीच नाही. मग पैसे भरा. नाहीतर कोर्टात जा किंवा बाहेर जा.

**प्रभात पाटील :-**

आम्ही वाल्या कोळी का व्हायचे? आम्ही वाटेकरी का व्हायचे? वाल्या कोळ्याच्या बायका मुलांसारखे. आम्ही मंजुरी दिली म्हणून आमचा या प्रकरणाशी काही संबंध नाही.

**रतन पाटील :-**

मा. प्रशासनाने, आपण सांगा, अधिनियमामध्ये हा नियम आहे का?

**प्रभात पाटील :-**

ह्यांच्यासारखा आमच्यावर गुन्हा दाखल व्हायचा, आम्ही मंजु-या दिल्या म्हणून.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, इतिवृत्तांतामध्ये ही जी कामे आलेली आहेत, त्याच्यातील किती कामे झालेली आहेत आणि किती कामे पेंन्डींग आहेत, ते आपण आम्हांला सांगू शकता का?

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, अवलोकनाच्या विषयावर निश्चित धोरण काय ठरवता, ते आपण अगोदर ठरवा. आजसुद्धा अवलोकनाचे विषय आहेत. त्याच्यावर चर्चा होणार नाही का?

**प्रभात पाटील :-**

अवलोकनाचा विषय येईल तेव्हा त्या विषयाला आम्हांला मंजुरी द्यायची नाही.

**रतन पाटील :-**

चर्चा न करतासुद्धा आजपर्यंत अवलोकनाचा विषय मंजुर झालेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, माझा असा प्रश्न आहे की, जी कामाची लिस्ट आहे त्यात २८ नंबर जे आहे, ही जी कामे इतिवृत्तांतामध्ये आलेली आहेत, त्याच्यावरती कामे किती झालेली आहेत आणि किती बाकी आहेत त्याची तपशिलवार माहिती मला द्या.

**प्रभात पाटील :-**

पत्र द्या ना.

**सुर्यकांत भोईर :-**

पत्र देतो, पण मी तोंडी विचारतो ना.

**मा. सभापती :-**

आपण ह्या विषयावर नंतर चर्चा करु.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ह्याच्यातील कामे किती झालेली आहेत ते आम्हांलाही माहिती पडू द्या व किती कामे बाकी आहेत तीही माहिती होऊ द्या. आम्हांला फक्त माहिती पाहिजे. आपण आमच्याकडे, स्थायी समितीकडून मंजुर करुन घेता. मग ती कामे किती झाली आहेत व किती बाकी आहेत ते आम्हांला माहिती पडू द्या.

**गजानन भोईर :-**

माहिती कशी पडणार? आपण तो विषय चर्चेला आणता कशाला?

**मा. सभापती :-**

सदरची माहिती आपण नंतर घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

मंजुर झालेली आहे तर आम्हांला दाखवा की, कुठे कुठे कामे मंजुर झालेली आहेत. त्याचे टेंडर निघाले आहेत. त्यांची कामे झाली का नाहीत ते फक्त बघायचे आहे. ती कामे कुठे झाली आहेत? आपण अधिका-यांना विचारा. अधिकारी उत्तर देतील.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण प्रशासनाला विचारा ना.

**मा. सभापती :-**

प्रशासनाला विचारतो व नंतर तुम्हांला उत्तर देतो.

**सुर्यकांत भोईर :-**

आता प्रशासन येथेच आहे ते उत्तर देतील ना. किती कामे बाकी आहेत व किती कामे झालेली आहेत?

**गजानन भोईर :-**

इतिवृत्तांत पुढच्या सभेत घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आता लगेच आपल्याला खुलासा देता येईल का?

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण त्या संबंधित अधिका-याला विचारा की, ह्याच्यात किती कामे झाली आहेत? किती कामे पेंन्डींग आहेत? त्यांच्याकडे लिस्ट असेल ना?

**कैलासबेन जानी :-**

इतिवृत्तांत पुढच्या वेळी आणा.

**मा. सभापती :-**

ह्या सभेला जे अधिकारी आहेत ते पुढच्या सभेला.......

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, हा विषय बांधकाम विभागाशी संबंधित आहे. येथे खांबित साहेब उपस्थित आहेत. त्यांना माहिती असेल कुठली कामे झाली आणि कुठली कामे झाली नाहीत.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, विषय चालू आहे, तो विषय चालू ठेवा आणि अधिका-यांना निर्देश द्या. तोपर्यंत ते विभागाकडून ताबडतोब माहिती घेतील. साहेब आपण निर्देश द्या. आरोग्याचे अधिकारी आहेत, बांधकाम विभागाचे अधिकारी आहेत.

**मा. सभापती :-**

येथे जो विषय आलेला आहे, त्यात सर्व खात्याचे विषय येतात. त्याच्यामुळे त्या त्या अधिका-यांनी पुढच्या वेळेस येतांना उत्तर तयार करुन घेऊन यायचे आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, सहा महिन्यापुर्वी असाच विषय झाला होता की, ज्याचे विषयपत्रिकेवर विषय असतील त्या अधिका-यांनी सभागृहात हजर राहायला पाहिजे. म्हणजे प्रत्येक वेळेला आपण सांगायचे का? विषयपत्रिका प्रत्येक अधिका-यांना दिली जाते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हा जो विषय आहे, ह्याचे ताबडतोब उत्तर देता येणार नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेबांनी असे उत्तर दिले आहे की, अधिकारी उपस्थित नाही म्हणून उत्तर देऊ शकत नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ज्यांचे विषय आहेत ते सगळे अधिकारी उपस्थित आहेत आणि त्याच्याबद्दलची जी माहिती आहे ती माहिती घ्यायला वेळ लागेल म्हणून सभापती साहेबांनी ते निर्देश दिले.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, माहिती का मागितली तर हे जे टेंडर काढले आहे, सर्व झालेले आहे. ती कामे झाली आहेत का नाही त्याची आपण आम्हांला माहिती द्या. ती कामे चालू आहेत का नाही?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सभापती साहेबांनी निर्देश दिल्याप्रमाणे त्या त्या विभागाच्या अधिका-यांकडून माहिती घेऊ पण आता इमिजिएट ताबडतोब माहिती देता येणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

इमिजिएट माहिती का? त्यांच्याकडे लिस्ट नसते का? अधिकारी काम करत नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, त्यांनी वर्क ऑर्डर घेतली नाही का?

**सुर्यकांत भोईर :-**

वर्क ऑर्डर दिली नाही का ते आपण सांगा. कुठे कुठे कामे चालू आहेत व कुठली कामे झालीत ती दाखवा ना. कुठली कामे बाकी आहेत ती आपण आम्हांला दाखवा.

**मा. सभापती :-**

माहिती घेऊनच सांगता येईल. अशी कामे सांगाता येणार नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, सिटी इंजिनिअर कुठे आहेत? त्यांनाही पुढच्या वेळेस सभेला यायला सांगा.

**दिपक खांबित :-**

वर्क ऑर्डर दिलेली आहे पण कामांना सुरुवात झालेली नाही.

**जयंत पाटील :-**

दोन नंबरचे जे आहे, गोडदेव नाक्यापासून नवघर नाक्यापर्यंत......

**दिपक खांबित :-**

ते काम सुरु करायचे आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्याला वर्क ऑर्डर केव्हा दिली? सात महिने झाले.

**दिपक खांबित :-**

वर्क ऑर्डर आत्ताच दिली आहे.

**जयंत पाटील :-**

आपण एवढा वेळा का लावला?

**दिपक खांबित :-**

पावसाळा होता आणि पावसाळ्यात कामे सुरु करता येत नाहीत.

**जयंत पाटील :-**

हा विषय मार्च महिन्यामध्ये मंजुर झालेला आहे.

**दिपक खांबित :-**

होय, पण वर्क ऑर्डर का दिली नव्हती, तर ते काम पावसाळ्यामध्ये सुरु करता आले नसते म्हणून वर्क ऑर्डर सगळ्यांना आत्ता देण्यांत आलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मार्च महिन्यात जर वर्क ऑर्डर दिली असती तर जुन महिन्यापर्यंत काम झाले असते.

**दिपक खांबित :-**

मुदतवाढीचा प्रॉब्लेम येतो म्हणून पावसाळा संपल्यानंतर सगळ्यांना आत्ता वर्क ऑर्डर देण्यांत आली.

**जयंत पाटील :-**

पावसाळा येणार आहे हे तुम्हांला माहिती असतांना आपण बांधकामाचे एवढे विषय का आणले?

**दिपक खांबित :-**

आत्ता कुठे आणले होते? पुर्वीच आणले होते.

**जयंत पाटील :-**

बजेट संपलेले आहे.

**दिपक खांबित :-**

मे महिन्यामध्ये आणि सगळ्या कामांना मंजुऱ्या ह्या घेतल्या जातील. आता सगळी कामे सुरु होतील.

**सुर्यकांत भोईर :-**

आज सहा महिने झाले वर्क ऑर्डर देऊन, तरी अजून तुमचे कामे चालू नाहीत.

**दिपक खांबित :-**

वर्क ऑर्डर सगळ्यांना आत्ता दिलेल्या आहेत आणि आत्ता प्रत्येक प्रभागाच्या नगरसेवकांनाही.......

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांना वर्क ऑर्डर कधी दिली त्याची माहिती आपण आम्हांला द्या.

**दिपक खांबित :-**

सगळी माहिती आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

कधी आणि किती तारखेला दिले ते आम्हांला माहिती पडू दे.

**दिपक खांबित :-**

कुठली माहिती पाहिजे ते आपण आम्हांला सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

सर्व कामांची माहिती द्या.

**दिपक खांबित :-**

देतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, दोन नंबरच्या कामाची वर्क ऑर्डर कधी दिली?

**दिपक खांबित :-**

साहेब, गेल्या आठवड्यामध्ये दिली.

**जयंत पाटील :-**

हफ्त्या हफ्त्याला वर्क ऑर्डर देता का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपणांला जी माहिती पाहिजे ती पुढच्या आठवड्यात घेऊ या.

**जयंत पाटील :-**

संपूर्ण माहिती पुढच्या सभेत घेण्यांत यावी.

**सुर्यकांत भोईर :-**

इतिवृत्तांत मंजुर झाल्यानंतर परत हे आमच्याकडे कशाला येईल?

**दिपक खांबित :-**

साहेब, पुढच्या मिटींगला सगळी माहिती येईल ना. कधी वर्क ऑर्ड दिली त्याची माहिती येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

इतिवृत्तांत जर मंजुर झाले तर ते आमच्यापुढे मंजुरी येणारच नाही.

**मा. सभापती :-**

विषयपत्रिकेवरील विषयाला सुरुवात करा.

**गजानन भोईर :-**

हा विषयपत्रिकेवर विषय आला की नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेब, बांधकामचे जे विषय आहेत, त्यावर आपण कशा प्रकारची माहिती देणार आहात?

**दिपक खांबित :-**

कामाच्या सद्यस्थितीबद्दल जी मंजुर झालेली कामे आहेत, त्याबाबत माहिती देणार आहोत.

**सुर्यकांत भोईर :-**

पुढच्या सभेमध्ये मंजुर झालेली कामे कुठे आहेत आणि कुठे चालू आहेत व किती पेंन्डींग आहेत त्याची आम्हांला संपुर्ण तपशिलवार माहिती पाहिजे. तेव्हा आम्ही हे इतिवृत्तांत मंजुर करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याकडे माहिती अव्हेलेबल आहे का?

**दिपक खांबित :-**

होय.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, पान क्र. ३८ वर आपल्या बजेटमध्ये आपण संगणकासाठी बरीचशी तरतुद केलेली होती आणि मे महिन्यातले प्रोसिडींग आहे आणि आपला विषय असा होता बजेटमध्ये तरतुद करतांना की, आपण आपल्या महानगरपालिकेच्या शाळांमध्ये संगणक चालू करायचे आहे. जुनमध्ये शाळा सुरु होईल या अपेक्षेने एप्रिल महिन्यामध्ये माझे पत्र आहे आणि मे मध्ये माझे स्टेटमेंटदेखील आहे की, नव्याने ह्या वर्षाचे शैक्षणिक वर्ष सुरु होत आहे. तशी आपण त्याची तरतुद करावी म्हणजे आता सहा महिने, आजपासून सहा महिन्याच्या परिक्षा सुरु झाल्या आहेत. आणखीन सहा महिने आपल्याकडे आहेत. पण येणाऱ्या २००६-०७ मध्ये तरी आपले हे प्रोजेक्ट होईल का?

**केशव घरत :-**

साहेब, अजुनपर्यंत युनिफॉर्म देखील दिलेले नाहीत.

**सुर्यकांत भोईर :-**

सहामाही झाली आणि आजपासून सहामाहीच्या परिक्षा सुरु झाल्या आणि मुलांना अजुन गणवेश भेटलेले नाही. गणवेश गेले कुठे?

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदयाची टर्म संपलेली आहे. ते सहा महिने वरती गेले, म्हणजे नविन शैक्षणिक वर्ष अर्धवर्ष संपले आहे. सहा महिन्याच्या परिक्षा चालू झालेल्या आहेत. राहिलेल्या सहा महिन्यामध्ये आपण त्यांचे गणवेश आणि जे संगणक प्रशिक्षण आहे, ह्याच्या मागे लागावे. दोन दोन पत्र दिलेली आहेत शिवाय मी येथे सभागृहामध्ये बोललेसुद्धा आहे की, बजेटमध्ये संगणक प्रशिक्षणासाठी आपण तरतुद कशाकरिता केली होती?

**मोहन पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला संगणक जी आहेत ती स्थानिक आमदार-नामदारांनी दिलेली आहेत ना?

**प्र. सचिव :-**

एकच शाळेत दिली होती.

**केशव घरत :-**

नाही.

**केशव घरत :-**

नाईक साहेबांनी प्रत्येक शाळेला एक एक संगणक दिलेले आहे. पण आपण प्रशिक्षकाची नियुक्ती करायची आहे, ती अजून झालेली नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, आपण कुठल्या ठेकेदाराला गणवेश पुरवठा करण्याचा ठेका दिलेला आहे त्याची माहिती द्या.

**सुर्यकात भोईर :-**

त्या विभागाचे अधिकारी कोण आहेत, त्यांना सभेमध्ये बोलवा.

**केशव घरत :-**

सहा महिने तर असेच गेले.

**सूर्यकांत भोईर :-**

म्हणजे तुम्ही वर्ष घालवल्यानंतर परत टेंडर आणाल का, गणवेशाचे?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण शिक्षण अधिका-याला बोलवा.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब, संगणक सर्व शाळांना दिलेले आहेत का?

**रतन पाटील :-**

ते शिकवण्यासाठी प्रशिक्षण दिले आहेत का?

**ए. एस्. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

सभापती साहेबांच्या पूर्व परवानगीने बोलतोय की, संगणक प्रशिक्षणाच्या बाबतीत संगणक प्रशिक्षण देण्यासाठी एका संगणक केंद्राला सर्वेक्षणाची जबाबदारी सोपवलेली आहे? ह्याची माहिती आल्यानंतर..........

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, अजून माहिती यायची बाकी आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

सहा महिने झाले तरी अजून माहिती आली नाही का?

**ए. एस्. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मागच्या महिन्यातच आपण त्यांना सर्वेक्षणाची आर्डर दिलेली आहे. सर्वेक्षण करुन त्या कंपनी येतील. त्याबरोबर आपण सर्व शिक्षकांचे म्हणजे एकेका शाळेतून दोन दोन शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्याचे नियोजित आहे. त्याप्रमाणे तो शिक्षक त्यांना संगणकाचे प्रशिक्षण देईल.

**केशव घरत :-**

साहेब प्रश्न असा नाही. आपण प्रशिक्षक नेमायचे आहे असा ठराव झालेला आहे. प्रशिक्षक नेमायचे आहेत. दहा प्रशिक्षक नेमायचे आहे आणि त्यांना एक ठराविक शाळा नेमून द्यायचे आहे. तुम्ही सांगता की शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल आणि शिक्षक शिकवतील. असा ठराव झालेला नाही.

**ए. एस्. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मी हजर होण्याच्या अगोदरचा तो ठराव होता.

**मिलन पाटील :-**

तुम्ही हजर होउन किती दिवस झाले?

**ए. एस्. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

२५ जुलै, २००५.

**मिलन पाटील :-**

महिने किती, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर आपणच विचार करा. गेल्या महिन्यात झाले म्हणजे तो तुमच्या वेळेचा ठराव आहे. तुम्हाला तो ठराव माहित असायला पाहिजे. आपण ठराव वाचत नाही.

**केशव घरत :-**

आपण प्रशिक्षक नेमायचे आहे आणि त्यांना ठराविक शाळा नेमून द्यायचे आहे. असा तो ठराव झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण सांगा, जर आपण शिक्षकांना ट्रेन केलेतर आधी मुळात आपल्याकडे जितक्या इयत्ता, जितक्या तुकड्या व तेवढे शिक्षक आहेत का?,

**केशव घरत :-**

नाही, शिक्षकच कमी आहेत.

**गजानन भोईर :-**

संगणकाचे प्रशिक्षण देतात असे म्हणता आणि तीन दिवस पेपरला फोटो आला आहे. चेन्याच्या शाळेमध्ये मुली झाडू मारतात.

**केशव घरत :-**

बरोबर बोलता.

**सुर्यकांत भाईर :-**

आमच्या मिरा गावच्या शाळेमध्ये शिपाई ठेवले आहेत ते अजिबात साफसफाई करत नाही. झाडूवाल्याकडून झाडू मारुन घेतला जातो. मग शाळेमध्ये शिपाई हे कशा करिता ठेवले जातात.

**मिलन पाटील :-**

१६, १७, १८ मध्ये सहा-सहा लोक बसलेले आहत सकाळी ६.३० ते रात्रीचे ७.०० वा. त्यांना कशाला पोसायला ठेवले आहे? त्यांना द्या पाठवून?

**प्रेमनाथ पाटील :-**

शिक्षण अधिकारी साहेब, शाळा क्र. ६ मध्ये शिपाई झाडू मारत नाही. ठेक्याने झाडूवाले ठेवले आहेत ते झाडु मारतात.

**गजानन भोईर :-**

समजा, सभापती साहेब स्थायी समितीच्या सभेला आले नाही तर आमची सभा होणार नाही का? तो अधिकारी तिथे येत नाही म्हणजे तिथे साफसफाई होणार नाही का? शाळेची साफसफाई आपण करायची नाही का?

**ए. एस्. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

आपण शाळेला एकच सफाई कामगार दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

शिक्षण अधिकारी साहेब, आपण त्या ठिकाणी दुस-याची नियुक्ती करु शकत नाही का?

**ए. एस्. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

तिथे नविन नियुक्ती केल्यानंतर काम कमी होईल.

**रतन पाटील :-**

दुसरी कडून कुठेतरी माणसे फिरवा. एवढे आरोग्यामध्ये कामगार आहेत. ते नुसते शाळेमध्ये बसून आहेत.

**केशव घरत :-**

ते दुस-या महानगरपालिकेच्या शाळेत जाउन बसलेले असतात.

**सुर्यकांत भोईर :-**

जे शिपाई आहे ते शिपाई आरामामध्ये बसून गप्पागोष्टी करत असतात. शिपाई का नाही आहेत? शिपाई आरामामध्ये खुर्च्यामध्ये पाय वर करुन बसलेले असतात.

**मा. सभापती :-**

संबंधित अधिकारी आता सन्मा. सदस्यांनी जेजे प्रश्न उपस्थित केलेले आहे. ह्याच्याबाबत मी स्वतः पाहणी करणार आहे. सर्व शाळेची परिस्थिती जाउन बघणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

शाळेची परिस्थिती गंभीर झालेली आहे.

**केशव घरत :-,**

सभापती साहेब, आपण त्या त्या प्रभागात जाउन त्या त्या प्रभागातल्या नगरसेवकांना सोबत घेउन जा. त्यांना विश्वासात घ्या.

**मा. सभापती :-,**

ठिक आहे. सन्मा. सदस्य इतिवृत्तांतचा विषय चालू आहे त्यात आपल्या ज्या काही सुधारणा असतील त्या आपण सांगा. त्याबाबत लिखाण चालू आहे. ह्याच्यावर आपण तयारी करु या.

**गजानन भोईर :-**

काय काय आढावा घेणार? माशाचा पाडा, भटाचा पाडा त्या शाळेला लाईट नाही तरी तिथे ॲक्वागार्डन मशीन आहे. प्रगती आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

शाळेच्या रिपेरिंगसाठी वायमेनसाठी टेंडर काढतो ते कुठे गेले आहेत?

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, गणवेशाचा विषय मी परत काढतो. शाळा चालू झाली जून महिन्यामध्ये आणि आज सहामाही परिक्षा चालू झालेल्या आहेत. हे गणवेशाचे टेंडर काढले ते गणवेश कधी येतील? सन २००६ च्या जून महिन्यामध्ये भेटले की त्याच्या मागच्या वर्षात मिळेल?

**प्रेमनाथ पाटील :-**

गणवेश कुठल्या ठेकेदाराला शिवायला दिलेले आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

गणवेश कधी भेटतील?

**गजानन भोईर :-**

जो मुलगा मे महिन्यात पास होईल त्यालाच गणवेश दिला जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

असे आहे का?

**संजय तायशेट्ये :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे, गणवेश पुरवठा करण्याचे काम महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाला दिलेले आहे. मी जेव्हा चार्ज घेतला तोपर्यंत गणवेश आलेले नव्हते. त्याच्यामुळे महाराष्ट राज्य वस्त्रोद्योग मंडळावर नोटीस बजावली होती की, जर दोन दिवसात तुम्ही भरले नाही तर तुमचा ठेका रद्द करण्यात येईल. पण दरम्यानच्या कालावधी मध्ये त्यांनी सतरा ते अठरा शाळांचे गणवेश पाठवलेले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, महानगरपालिकेच्या एकूण शाळा किती आहेत?

**मा. सभापती :-**

२९ शाळा आहेत.

**संजय तायशेट्ये :-**

आणि दोन तीन दिवसामध्ये बाकीच्या गणवेशांची डिलीव्हरी करणार आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

एवढा उशिर का झाला?

**प्रेमनाथ पाटील :-**

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाला जर २९ शाळेचे गणवेश शिवायला जमत नसेल तर त्याने तो ठेका घेउच नये. २९ शाळेचे एकूण विद्यार्थी अंदाजे दहा हजार विद्यार्थी असतील ना.

**संजय तायशेट्ये :-**

साडे नउ हजार विद्यार्थी आहेत.

**मा. सभापती :-**

यापुढे या मंडळाकडे गणवेश शिवण्याचे काम देउ नका. कॅन्सल करा.

**गजानन भोईर :-**

शाळेचे विद्यार्थी वाढतील प्रत्येकाला नाव द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, गणवेशाचा विषय आहे. मुलांच्या शाळेचा विषय आहे. मुलांना जर टाईमामध्ये गणवेश मिळत नसेल आणि सहा महिन्यानंतर जर तुम्ही त्या गणवेशाचे वाटप करणार तर तसे चालेल तर आपणच सांगा?

**मा. सभापती :-**

आपल्या प्रमाणे मला ही वाटते. पण काय करणार?

**सुर्यकांत भोईर :-**

म्हणून आम्हाला अधिकाऱ्यांना विचारायचे आहे.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना कामाची वर्क ऑर्डर कधी दिली? आणि मुदत किती दिलेली आहे? आपण त्यांना मुदत दिली असेल.

**केशव घरत :-**

गणवेश शाळा सुरु होण्याच्या अगोदरच यायला पाहिजे. पण जेव्हा शाळा सुरु होतो तेव्हा आपण टेंडर काढता.

**सुर्यकांत भोईर :-**

शाळा सुरु होते त्यावेळी मुलांना गणवेश वगैरे द्यायला पाहिजे. ते तुम्ही आता सहा महिन्यानंतर देता. ते देता तरी कशाला? ह्याच्यात सुधारणा व्हायला पाहिजे.

**केशव घरत :-**

साहेब, ह्याच्यात सुधारणा व्हायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

कपड्याची क्वॉलिटी बरोबर नाही त्याच्यावर लक्ष असू द्या.

**प्रभात पाटील :-**

दि. १३/६/०५ रोजीच्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. २ मध्ये सभापती साहेब आपण बोलता की दुरुस्त्या करायच्या आहेत हे मला मान्य आहे परंतु जे माजी सभापती बसले होते व हा जो कारभार झाला इथे ह्या सभापतींनी स्पेशल विषय आणला होता हे मी सदस्यांना आठवून देते की, प्राथमिक शाळांना जोडून पुर्व प्राथमिकचे वर्ग चालू करायेच म्हणून आपण बजेटमध्ये तरतुद केली. सभापती साहेबांचे पान क्र. २ वर पूर्ण लेक्चर आहे ते बघा की, आपण ह्या पूर्व प्राथमिक शाळा चालू केल्या पाहिजेत. भाईंदर पश्चिम पुर्वेला प्रायोगिक तत्वावर शाळा चालू करायच्या. आज त्याला सुद्धा सहा महिने झाले. ह्याची पुर्तता व्हायची कधी? हे कारभार तुम्ही आता चालवा म्हणजे निदान सन २००६ मध्ये त्याचे काहीतरी होईल. मला हे तुमच्या निर्दशनात आणून द्यायचे आहे. हे विषय तुम्ही पुन्हा एकदा घ्या. आम्हाला तुमचा वेळ घ्यायचा नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्या बोलण्याचा उद्देश असा आहे की, आपण ह्या विषयावर चांगला निर्णय घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही जे विषय मंजुर केलेले आहेत त्याचे पुढे काय होते ते बघा.

**प्रभात पाटील :-**

ह्याचा अर्थ पुर्तता होते की, नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या विषयाची पुर्तता होते की नाही ते आपण बघून घ्या.

**एस्. ए. खान :-**

पान क्र. ४६ मध्ये लिहिले आहे की, माळीचे आठ हजार रुपये मासिक आणि मजुर पुरवठा बारा महिन्यासाठी.

**प्रभात पाटील :-**

कशासाठी सभापतींनी तो विषय आणला हे मला कळत नाही. संगणकाचा विषय, पुर्व प्राथमिक शाळांचा विषय.

**रतन पाटील :-**

पुर्व प्राथमिक शाळा जर घेत असाल तर माध्यमिक शाळासुद्धा चालू करा, सातवी ते दहावीपर्यंत. सभापती साहेब, आमची अशी सूचना घ्या की, माध्यमिक शाळा सुद्धा चालू करावी.

**सुर्यकांत भोईर :-**

माध्यमिक नंतर पण जे पहिले प्राथमिक शाळा आहेत त्यांना तरी अगोदर चालू करुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

दि. १३/०६/२००५ च्या इतिवृत्तांतामध्ये ३० वर जेसलपार्कला सब-वे बांधण्यासाठी महासभेने प्रशासकिय व आर्थिक मंजुरी दिली आणि रेल्वे प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे राईटस् ह्यांना नेमणुक करुन मान्यता देण्यांत येत आहे आणि उर्वरित दोन या तीनसाठी राईटस् ह्यांची नेमणुक आहे, त्याचे काय झाले? ते काम कुठपर्यंत आलेले आहे?

**दिपक खांबित :-**

सर्व्हे चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याला आपण पैशाचीही मंजुरी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

चांगला विषय घेतला आहे, पण मे. राईटस्‌ची नियुक्ती कोणी, रेल्वेने केली आहे का?

**दिपक खांबित :-**

ती रेल्वेची एजन्सी आहे.

**रतन पाटील :-**

ठिक आहे. पण आपण जो उड्डाणपुल बांधला त्याची एजन्सी कोणाकडे होती? त्याचे सर्वेक्षण व सुपरविझन हे कोणाकडे होते?

**दिपक खांबित :-**

रेल्वेचे जे काम होते ते रेल्वेनेच केले होते.

**रतन पाटील :-**

पण त्याचे सर्वेक्षण आणि सुपरविझन कोणी केले?

**दिपक खांबित :-**

रेल्वेने केले होते.

**रतन पाटील :-**

आणि आज हे सगळं त्यांच्याकडे दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

रेल्वेकडे २०१० पर्यंत ते कोणतेही काम घ्यायच्या तयारीमध्ये नाही. त्यांना लिस्ट दिलेली आहे. आपल्याला त्यांच्याकडून ती सगळी कामे करुन घ्यायची आहेत.

**रतन पाटील :-**

आपल्या विभागामध्ये सक्षम असा कोणी नाही का?

**दिपक खांबित :-**

जी एजन्सी आहे, ती रेल्वेची आहे. रेल्वेच्या वरचे काम रेल्वे करते. ते आपण बघत नाही.

**मा. सभापती :-**

रेल्वेच्या इथली कुठलीही कामे असतील तर तेच करतात.

**प्रभात पाटील :-**

मला असे म्हणायचे होते की, ते काम कुठपर्यंत आले?

**दिपक खांबित :-**

पुढच्या महिन्यामध्ये त्याचे एस्टीमेट येईल आणि आपण टेंडर काढून आपण काय करणार. काम सगळं आपण करणार, टेंडर काढून. पण ते त्यांच्याकडून फायनल झाल्यानंतर.

**रतन पाटील :-**

त्या माध्यमातून आपण त्यांना एवढे देत आहोत.

**दिपक खांबित :-**

साहेब, रेल्वेला तेवढे पैसे भरावे लागतात.

**रतन पाटील :-**

रेल्वेला भरतोय की, त्या राईटस्‌ला पैसे भरत आहोत?

**दिपक खांबित :-**

राईटस्‌ ही रेल्वेची एजन्सी आहे.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. ३१ मध्ये भाईंदर ईस्ट आणि वेस्टचे लिलाव किती लाखाला जातात हे मला माहिती नाही. पण मोर्वाचा लिलाव ५२ लाखाला गेलेला आहे. मोर्वाच्या लिलावाची किंमत आहे. तिथे पुर्वेचा लिलाव विचारला होता. तिथे मोर्वाचे झालेला आहे. दुरुस्ती करण्यांत यावी. पान क्र. ३९ वर मी म्हटले होते की, सुवर्ण जयंतीसारखे काही कार्यक्रम आणि महिला व बालकल्याण समितीच्या विषयाच्या संदर्भात एक चांगला अधिकारी द्या असे मागचे सभापती साहेब ह्यांना मी विनंती केली होती. आपण तिथे कोण अधिकारी दिले का?

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, अजुनपर्यंत कॅंन्टीन बंद आहे. त्याच्यावर अजुन निर्णय झालेला नाही. आज कॅन्टीनच्या माध्यमातून महापलिकेचे उत्पन्न बुडत आहे. कॅन्टीन बंद असल्यामुळे, आम्हांला चहा प्यायलाही मिळत नाही. आमच्याकडे नागरिक येतात, त्यांच्या समस्या सोडवायला. त्यांनासुद्धा आम्ही चहा पाजू शकत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण कॅन्टीन चालवायला त्या पुजारीला दिले का?

**रतन पाटील :-**

कॅन्टीनच्या संदर्भात निर्णय काय घेतला गेला? एक महिन्यापुर्वी जी सभा झाली त्यावेळी निर्णय घ्यावा असे ठरले होते. आपण अजूनपर्यंत त्याच्यावर निर्णय घेतलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेबांनी त्याच्यावर निर्णय दिला होता.

**रतन पाटील :-**

निर्णय घेतला नाही.

**मा. सभापती :-**

ठराव झालेला आहे, ३५ नंबरवर आहे.

**रतन पाटील :-**

ठराव झालेला आहे, मग निर्णय का घेतला नाही? ते कॅन्टीन अजुनपर्यंत का चालू झालेले नाही?

**जयंत पाटील :-**

उमेश पुजारी ह्यांना कॅन्टीन ठेक्याने द्यायचे असे ठरले होते. मग त्याची पुर्तता नंतर काय झाली?

**रतन पाटील :-**

परत फेरनिविदा काढा असे ठरले होते.

**जयंत पाटील :-**

फेरनिविदेचा नाही.

**मोहन पाटील :-**

जी कायदेशिर कार्यवाही सभागृहाने जी करायला पाहिजे होती व सभागृहाने ज्या सुचना करायला पाहिजे, त्या दिलेल्या आहेत. प्रशासनाकडून जी काय कार्यवाही झाली त्याला खुलासा आपण येथे करावा.

**प्रभात पाटील :-**

मला या संदर्भामध्ये असे समजले की, कमिशनर साहेब असे म्हणाले की, सभापती साहेबांनी असा निर्देश दिला आहे की, ह्याबाबत कमिशनर ह्यांनी निर्णय घ्यावा.

**मोहन पाटील :-**

तसा लेखी ठराव दिलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

ठरावत असेच म्हटले आहे ना की, निर्णय कमिशनर साहेबांनी घ्यावा. म्हणजे तो विषय आमच्याकडे येऊनसुद्धा फायदा काय आहे?

**मोहन पाटील :-**

त्या ठरावाप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी.

**रतन पाटील :-**

ज्या कमिशनर साहेबांकडे हा ठराव गेला होता, ते कमिशनर तर गेले आणि त्या जागेवर दुसरे कमिशनर आलेले आहेत. ते ह्याच्यावर काय निर्णय घेणार?

**मा. सभापती :-**

तो ठराव मागवून घ्यावा.

**एस्. ए. खान :-**

साहेब, पान क्र. ४६ वर माळीच्या पगाराचे आठ हजार रुपये दिले आहेत. ते प्रतिदिन आहेत की, मासिक आहेत, काय आहे? एक दिवसाचे आठ हजार आहे की, महिन्याचे आठ हजार रुपये आहे आणि तो माळी असे काय काम करणार आहे?

**दिपक खांबित :-**

प्रति दिन ८० रुपये आहे.

**रतन पाटील :-**

८० रुपये अशी दुरुस्ती करावी.

**प्र. सचिव :-**

८० रुपये ही दुरुस्ती करण्यांत येईल.

**एस्. ए. खान :-**

तो माळी कोण आहे? ते आपण आम्हांला दाखवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

एका महिन्यासाठी घेतले आणि बारा महिन्याचा पगार काढता.

**सुर्यकांत भोईर :-**

एक महिन्यासाठी घेतलेला आणि त्याचा मी ठराव मांडलेला आहे.

**एस्. ए. खान :-**

खांबित साहेब, त्या माळीला स्थायी समितीसमोर उभे करायला पहिजे होते. पुढच्या वेळी सभेमध्ये बोलवा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण जेव्हा एखादी पिच करतो. त्या पिचसाठी टेक्निशियन माणसे असतात. त्या त्या टेक्निशियन माणसाची त्या त्या पद्धतीने फी असते. आपण पिच करणे म्हणजे सर्वसाधारण एखादे ग्राऊण्ड उखरुन त्याच्यावर माती टाकून करतो हा विषय वेगळा आहे आणि जर टेक्निशियनने पिच केले असेल तर त्याची काय फी लावली? आकारणी काय केली? त्या पद्धतीचा खुलासा बांधकाम विभागाने करावा.

**सुर्यकांत भोईर :-**

कुठले खेळ होतात तिथे? तिथे कुठले रणजी सामने होतात? कुठल्या क्रिकेटच्या मॅचेस होतात?

**मोहन पाटील :-**

कुठले खेळ होतात हा विषय नाही.

**मिलन पाटील :-**

तिथे भरपूर जण खेळतात. सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये जेसलपार्कवरुन मुले येऊन खेळतात. मिरा रोडची मुले येतात. आपण सकाळी सात वाजता त्या मैदानामध्ये जा आणि बघा किती मुले येऊन खेळतात. ज्युचंद्रवरुन येऊन मुले क्रिकेट खेळतात.

**प्रभात पाटील :-**

आपण त्यांना बारा महिन्यासाठी का अपॉईन्ट केले?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हे जे माळीचे रेटस् दिलेले आहेत तर हे जनरल माळी झाड कापणारे नाहीत. ते क्रिकेट असोसिएशनचे लोक असतात आणि ते सायन्टीफिक काम करावे लागते, पिच तयार करायला. त्यामुळे त्यांना साडेसात हजार रुपये दिले आहे. त्याच्यापेक्षाही मोठमोठे पिच आहेत, त्यांना जास्त पगार दिला जातो. त्या तांत्रिक बाबी, ते स्पेशलाईज असतात आणि त्यांना आपण क्रिकेट असोसिएशनकडून घेतलेले आहे. त्यामुळे हा रेट आहे व तो एकच माळीचा रेट आहे. पिचवर माती टाकणे, त्याला प्रेसिंग करणे ह्या सायन्टीफिक बाबी बघाव्या लागतात. माळीसाठीच तो एक माणूस घेतलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, इतके वर्ष आपण महापौर चषक भरवले त्यावेळी आपण ते पिच महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून बनवत होतो. हे कायम स्वरुपी ठेवले आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

त्या तिथे मैदानामध्ये गुरे जातात त्यांना तुम्ही बंद का करत नाही?

**मोहन पाटील :-**

आपल्या शहरामध्ये स्पोर्टस्ना आपल्याला प्राधान्य द्यायचे आहे म्हणून आपण ते केले आहे.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, बोरवेल संदर्भात ठराव झालेला आहे. माझी या ठिकाणी अशी विनंती आहे की, बोरवेलची कामे सुरु झालेली आहेत का? त्याचे विश्लेषण करुन सांगावे.

**शिवाजी बारकुंड :-**

पावसाळ्यामध्ये बोरवेलचे काम घेत नाही.

**केशव घरत :-**

परंतु, आता पावसाळा संपलेला आहे. त्यांना वर्क ऑर्डर दिलेली आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

वर्क ऑर्डर दिलेली आहे, सर्व्हे झालेला आहे. पावसाळी संपल्यानंतर बोरवेलचे काम घेऊ या.

**मा. सभापती :-**

खरे म्हणजे बोरवेलची कामे मार्च महिन्यानंतर केली जातात.

**सुर्यकांत भोईर :-**

बोरवेलची कामे मे महिन्यामध्ये घेतली जातात.

**केशव घरत :-**

परंतु, आता हा ठराव घेतलेला आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

त्यांना बोरवेलची ऑर्डर दिलेली आहे.

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता या ठिकाणी इतिवृत्तांत मंजुरीचा ठराव झालेला आहे. मागील इतिवृत्तांत दि. १८.०५.०५ ते दि. ३०.०६.०५ रोजी स्थायी समितीच्या ज्या सभा झालेल्या होत्या. त्यावेळेला आम्ही सदस्य म्हणुन नव्हतो. त्यामुळे आम्ही या इतिवृत्तांताशी सहमत नाही अशी नोंद घेण्यांत यावी. अशी माझी विनंती आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, असे होऊ शकत नाही.

**रतन पाटील :-**

समजा, उद्या ह्याच्यामध्ये जर काही आक्षेप आले तर मग ती आमची जबाबदारी नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही त्या सभेला हजर नसल्यामुळे तुमच्यावर काहीही आक्षेप येणार नाहीत.

**रतन पाटील :-**

आम्ही या इतिवृत्तांताला सहमत नाही.

**प्र. सचिव :-**

तुमच्या सहमतीचा प्रश्न येत नाही.

**मोहन पाटील :-**

तुमच्या सहमतीचा प्रश्न येतच नाही. जे नवीन सदस्य असतील त्यांच्या संमतीचा प्रश्न येत नाही. जे सन्मा. सदस्य त्या मिटिंगला हजर नसतात. त्यांच्या आक्षेपाचा प्रश्न येत नाही.

**प्रकरण क्र. ११८ :-**

दि. १८/०५/२००५, दि. १३/०६/२००५, दि. १७/०६/२००५ दि. २८/०६/२००५, दि. ३०/०६/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १२५ :-**

दि. १८/०५/२००५, दि. १३/०६/२००५, दि. १७/०६/२००५ दि. २८/०६/२००५, दि. ३०/०६/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे. तसेच इतिवृत्तांतामधील ठरावांवर प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली याची माहिती पुढील सभेमध्ये अधिका-यांकडून सभागृहास देण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११९ चे वाचन केले.)

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही गेल्या वेळेला सांगितले होते की, पेपरमध्ये बातमी देऊन, सगळ्यांची नावे आणुन तुम्ही तो विषय आणायला पाहिजे होता. श्री. प्रविण पाटील हे कॉंग्रेसचे सन्मा. सदस्य किंवा कुठल्या पदावर असतील तर आपण त्यांना कसे नेमणार? तो माणुस कुठल्याही पार्टीचा असु द्या. तो सदस्य आहे किंवा त्याचे काय पद आहे ते कळायला पाहिजे.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही या पदासाठी जाहिरात देऊन मनुष्य मागविलेला आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य कैलासबेन जानी, ह्याच्यामध्ये पक्षाचा वगैरे संबंध येत नाही. ह्याच्यामुळे चुकीचा अर्थ निघतो.

**केशव घरत :-**

या ठिकाणी पक्षाचा संबंध नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

याच्यामध्ये पक्षाचा संबंध येत नाही. कुठलाही अधिकारी डॉक्टर वकील असो किंवा कोणीही असो त्याला पक्षाची बांधिलकी असते.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणीही कोणाच्या पक्षाबाबत बोलायला नको.

**कैलासबेन जानी :-**

पक्षाचा संबध नाही असा माझा बोलण्याचा अर्थ नव्हता. फक्त तो कुठल्या पक्षाचा अधिकारी किंवा पदाधिकारी आहे ते कळु शकते.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, तो कुठल्या पक्षामध्ये आहे हे बघण्याचा संबंध येत नाही.

**मा. सभापती :-**

कुठलाही अधिकारी कुठल्याही पक्षाचा असु शकतो.

**डॉ. रमेश जैन :-**

अगर हो तो उसने किसी भी पद से किसी भी पार्टी का इस्तिफा देना चाहिए।

**कैलासबेन जानी :-**

अगर वह अधिकारी कौनसे पद पर होगा तो उसने इस्तिफा देना चाहिए।

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की विधी सल्लागार नेमण्यासाठी जाहिरात दिलेली होती का?

**कैलासबेन जानी :-**

आमच्या मते जाहिरात दिलेली नव्हती.

**सुर्यकांत भोईर :-**

विधी सल्लागार नेमण्यासाठी जाहिरात दिलेली नव्हती.

**एस. ए. खान. :-**

परंतु, ह्याच्यामध्ये जाहिरात दिलेली होती असे लिहिलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

विधी सल्लागार नेमण्यासाठी जाहिरात देण्याचे ह्याच्यामध्ये मेन्शन केलेले नाही. त्याच्यामुळे जाहिरात दिलेली नव्हती.

**सुर्यकांत भोईर :-**

जर विधी सल्लागार नेमण्यासाठी जाहिरात दिली असे तुमचे म्हणणे असेल तर ती जाहिरात कुठल्या वर्तमानपत्रामध्ये दिलेली आहे?

**मा. सभापती :-**

आपण विशेष कार्यकारी अधिकारी नेमताना निविदा मागावी असा माझा विषय आहे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी विशेष कार्यकारी अधिका-याचा विषय येत नाही. विधी सल्लागाराचा विषय येतो. आपण विधी सल्लागार नेमणार म्हणजे ते कायदे विषयक ज्ञान देणार आहेत आणि आपण त्या सल्लागारांना बेकायदेशीररित्या आणणे ही एक चुकीची बाब आहे. आपल्याला जे कायद्याचा सल्ला देणार. आपण त्यांना बेकायदेशीररित्या आणणे आपल्याला पटेल का? श्री. प्रविण पाटील हे आपल्या सगळ्यांच्य ओळखीचे आहेत. शिवाय ते माझे अतिशय जवळचे मित्र आहेत. परंतु, कुठल्याही त-हेचे बगल न देता ते निविदा भरतील. ते पुन्हा येऊ शकतील.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण त्या संबंधी त्य निविदा पेपरमध्ये ओपन करा आणि नंतर हे करा. माझा म्हणण्याचा अर्थ असा आहे की, ती निविदा पेपरमध्ये काढली जावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण एका अनाडी कोर्टातील विधी सल्लागाराला हाकलेले. त्यामुळे आपण आता चांगली भुमिका घ्यावी.

**मा. सभापती :-**

श्री. प्रविण पाटील हे हुशार आहेत.

**जयंत पाटील :-**

श्री. प्रविण पाटील यांच्या हुशारीबद्दल मी बोलत नाही. ते चांगले आहेत. शिवाय ते माझे जवळचे मित्र आहेत. त्यामुळे ते योग्य रितीने डिसीजन घेतील.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यावर रुलिंग देऊन विषय संपवा.

**मा. सभापती :-**

विधी सल्लागार नेमण्यासाठी पेपरमध्ये जाहिरात द्या. असे माझे म्हणणे आहे.

**एस.ए.खान. :-**

मग अर्ज असाच दाखल केलेला आहे का?

**प्रभात पाटील :-**

निविदा मागवता येत नाही मग विषय संपला.

**मिलन पाटील :-**

तुम्ही या विषयाची निविदा मागवावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी अशी विनंती आहे की, आता हा जो विषय आलेला आहे. तो सहा महिन्यासाठी मंजुर करावा. त्याच्यानंतर पुढे निविदा वगैरे मंजुर करा.

**कैलास बेन जानी :-**

हा विषय पुढच्या वेळेला घ्या. आम्हाला एवढी घाई नाही.

**एस्. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, हा जो अर्ज दिलेला आहे. हा स्वतःहुन दिलेला आहे का?

**प्रभात पाटील :-**

हा अर्ज स्वतःहुन दिलेला आहे.

**एस्. ए. खान :-**

हा अर्ज स्वतःहुन दिला असेल तर अर्ज द्या. असे सांगितले? इथे जागा रिक्त झालेली आहे. त्यामुळे तुमच्या अर्जाची गरज आहे. असे त्यांना कोणी सांगितले?

**कैलासबेन जानी :-**

निविदा मागवा आणि विषय आणा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

निविदा काढता येते का? ते आपण नंतर बघु या.

**एस्. ए. खान :-**

परंतु, गोषवाऱ्यामध्ये अनुभवी असल्याचा उल्लेख केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, प्रशासनाने हा विषय कसा दिला?

**एस्. ए. खान :-**

या गोषवाऱ्यामध्ये हे आहे, ते आहे. दिलेले आहे. मग हा विषय असा का आणला?

**कैलासबेन जानी :-**

मला हा गोषवारासुद्धा आज सकाळी मिळालेला आहे.

**मा. सभापती :-**

ज्याच्या त्याच्याप्रमाणे गोषवारा दिलेला आहे. तरीसुद्धा आपण या विषयावर निविदा मागविणार आहोत.

**डॉ. रमेश जैन :-**

मा. सभापतीसाहेब, अर्ज मागायचे आणि नंतर परत हे करायचे असा अपमान व्हायला नको.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, प्रशासनाने हा गोषवारा दिलेला आहे. श्री. प्रविण पाटील यांच्या अर्जावर विचार व्हावा आणि त्यांना विधी सल्लागार पदी नियुक्त करावे असे क्लिअर कट म्हटलेले आहे आणि असा गोषवारा

दिलेला आहे. असे असताना तुम्ही परत निविदा काढण्याबाबत बोलत आहात. आपल्याच सांगण्यानुसार स्थायी समितीचा अजेन्डा निघालेला आहे.

**मा. सभापती :-**

तो अजेन्डा जरी प्रशासनाने दिला असेल तरी तो अजेन्डा आपल्याला पसंत नसेल किंवा आपल्याला त्या गोष्टीची माहिती नसेल. वास्तविकरित्या सभागृहामध्ये विधी सल्लागाराचा विषय नेहमी गाजला जातो याचा आपल्याला अनुभव आहे. त्यापेक्षा आपण विधी सल्लागार निविदा मागुन भरले तर त्याच्यावर कोणाचाच ठपका लागणार नाही.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, हा विषय तुमच्या संमतीने आलेला होता का? विषयपत्रिका बनविताना तुम्हाला ह्याच्याबद्दल विचारले असेल.

**मा. सभापती :-**

विषयपत्रिका बनविताना मीच सही केलेली होती.

**गजानन भोईर :-**

याचा अर्थ हे तुमच्या निर्दशनास आलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही तो विषय त्यावेळेला फेटाळायला पाहिजे होता.

**गजानन भोईर :-**

मग तुम्ही त्यावेळेचे प्रोसिडिंग का काढले नाही.

**मिलन पाटील :-**

मा. सभापतींची ही पहिली वेळ आहे. त्यामुळे आपण त्यांना सांभाळुन घेतले पाहिजे.

**मा. सभापती :-**

हा विषय सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवल्यामुळे हा विषय विषयपत्रिकेवर ठेवणे भाग आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

याठिकाणी मा. आयुक्तसाहेबांची सही आहे की नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय मा. आयुक्तसाहेबांचा आहे.

**मा. सभापती :-**

ह्या विषयाचा गोषवारा मा. आयुक्तसाहेबांनी दिलेला आहे. तो गोषवारा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

फक्त विषय मा. सभापती साहेबांचा आहे का?

**मोहन पाटील :-**

काही विषय प्रशासनाकडुन येतात आणि आपण काही विषय सुमोटाने आणतो. या ठिकाणी प्रशासनाने आणलेल्या विषयावर मा. सभापती महोदयांचे असे म्हणणे आहे की, प्रशासनाने विषय दिल्यानंतर तो विषय सभागृहामध्ये आणण्याचे काम मा. सभापती महोदयांचे असते आणि त्यांच्याबरोबर त्यांचे अधिकार असतात. प्रशासनाने विषय दिल्यानंतर आपण तो विषय कम्पलसरी घेतला पाहिजे असा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु, कोणते विषय घ्यायचे आणि कोणते विषय कट करायचे तो अधिकार मा. सभापती महोदयांचा असतो. त्यामुळे मा. सभापती साहेबांनी त्या पद्धतीने विषय आणलेला आहे.

**प्रकरण क्र. ११९ :-**

विधी सल्लागार यांची मानधनावर नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. १२६ :-**

विधी सल्लागार हे कायदेशीर माहिती देणारे आहेत त्यांची नेमणूक देखील कायदेशीर होणे आवश्यक आहे. करिता विधी सल्लागार नेमणूकी करिता पेपरमध्ये जाहिर नोटीस देऊन देकार मागवण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत महादेव पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२० चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्यी श्री. मिलन पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, हा ठराव वाचुन झाल्यानंतर ह्या ठरावावर चर्चा करायची आहे का?

**मोहन पाटील :-**

ठराव झाल्यावर चर्चा करता येतील.

**रतन पाटील :-**

इथे सर्वानुमते ठराव करणार आणि त्या ठरावावर नंतर चर्चा करायची. ह्या सभेत काय चाललेले आहे? सभेला कुठेतरी शिस्त लावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, मी तुम्हाला चर्चा करायला संधी देतो.

**गजानन भोईर :-**

या आरक्षणामध्ये जी अतिक्रमणे आहेत. ती तुम्ही अगोदर काढली का?

**मोहन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, या आरक्षणाच्या अतिक्रमणाचा विषय या ठिकाणी उद्‌भवलेला आहे. त्या अतिक्रमणाचे ॲक्विझिशन करण्यासाठी आपण पेपर नोटीस दिलेली आहे.

**गजानन भोईर :-**

आरक्षणाच्या अतिक्रमणाची पेपर नोटीस कधी दिलेली होती.

**प्रभात पाटील :-**

आरक्षणावरील अतिक्रमणाचे ॲक्विझिशन करण्याची पेपर नोटीस दिलेली होती. कारण खाली बोर्डसुद्धा लागलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

आपण खाली बोर्ड लावलेला आहे. ज्या पद्धतीने प्रशासनाने कार्यवाही करायला पाहिजे. आपण अशी कार्यवाही कायद्यानुसार केलेली आहे. आपण सध्याच्या परिस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये टी.डी.आर. देण्याची सिस्टिम ॲडॉप्ट केलेली आहे आणि आपण त्यांना टी.डी.आर. देत आहोत. आपल्याकडे असे लोक आल्यानंतर त्यांना टी.डी.आर. देऊन आपला प्लॉट मोकळा होऊ शकतो. ज्या ठिकाणी कोणीही टी.डी.आर. घ्यायला तयार नसेल किंवा त्याने अतिक्रमण केले असेल तर आपण त्यांना त्या ठिकाणी पैसे देऊ शकतो. याबाबत अशी पद्धत आहे की, त्यांना पैसे द्या किंवा आपण टी.डी.आर. घ्या. अशा पद्धतीमध्ये आपला महत्त्वाचा प्लॉट आहे किंवा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सर्वात मोठा प्लॉट म्हणजे शिवार गार्डन आहे आणि त्या गार्डनच्या पाठीमागे असलेले अतिक्रमण किंवा त्याच्या बाजुचा पुर्ण व्हॅकेंन्ट प्लॉट आहे. ज्या प्लॉटमध्ये आपला एक ट्रॅफिकचा उल्लेख आहे, दुसरा सिनेवंडर थिएटरचा उल्लेख आहे आणि तिसरा गार्डनचा उल्लेख आहे. अशा पद्धतीने जे महत्त्वाचे प्लॉट आहेत. आपण त्या प्लॉटना टी.डी.आर. देण्यासंदर्भात चर्चा केलेली आहे. चर्चा केल्यानंतर ज्यांचे प्लॉट आहेत. त्या लोकांनी थेट प्रशासनाकडे संपर्क साधलेला आहे. त्या प्लॉटबाबतची त्यांची बरीचशी प्रकरणे आलेली आहेत आणि त्यांना टी.डी.आर. देण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रशासनाने त्या संदर्भात एक प्रस्ताव आणला असेल तर आपण त्या प्रस्तावाला मान्यता दिली पाहिजे. आपण मागच्या महासभेमध्ये त्यांचा प्राधान्यक्रम ठरविलेला आहे. आपल्याला त्या प्राधान्यक्रमाप्रमाणे जी रिझर्वेशन क्लिअर करायची आहेत.

**रतन पाटील :-**

आम्ही प्राधान्यक्रम नाकारत नाही.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे जी रिझर्वेशन आलेली आहेत. आपल्या महासभेनेच त्याचा प्राधान्यक्रम ठरवुन दिलेला आहे आणि तो प्राधान्यक्रम त्या पद्धतीने या ठिकाणी आलेला आहे. आपल्याला त्यांना त्या पद्धतीने रिझर्वेशनमध्ये टी.डी.आर. द्यायचा असेल आणि आपण अतिक्रमण काढायची जबाबदारी घेतली तर आपल्या हिशेबाने आपण त्यांना प्रोटेक्ट करणे जरुरी आहे. आपण त्याच कामाकरीता हा सल्लागार नेमत आहोत. अतिक्रमण क्लिअर करणे, त्यांना टी.डी.आर. देणे इ. पद्धतीची कामे करुन ते इम्प्लिमेन्टेशनमध्ये उतरवायचे आहे. म्हणुन हा सदरहु विषय या विषयपटलावर आलेला आहे.

**गजानन भोईर :-**

सदरहु अतिक्रमणे हटवा असा महासभेत उल्लेख झालेला होता. मग तुम्ही त्याचा विचार का केला नाही?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्याचा विचार करायला पाहिजे होता.

**गजानन भोईर :-**

प्रथम अतिक्रमणे हटवा. आता या ठिकाणी ९१ चा सर्व्हे नंबर काय आहे?

**मिलन पाटील :-**

आपल्याला ह्याच्यासाठी सल्लागार नेमायचा आहे. म्हणजे तो सल्लागार ते काम करुन आपल्याकडे आणुन देईल.

**रतन पाटील :-**

तो सल्लागार अतिक्रमण हटविणार नाही. आपण अतिक्रमण हटवुन द्यायची आहेत. ते अतिक्रमण प्रशासनाला दिसत नाही का? अतिक्रमण दाखविण्याची गरज आहे का?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, आरक्षण क्र. ९१ हा कुठला मौजे आहे. भाईंदर, गोडदेव, खारीगांव काय आहे?

**रतन पाटील :-**

आरक्षण क्र. ९१ हे स्टेडियमचे आरक्षण आहे.

**मा. सभापती :-**

ज्या ठिकाणी स्टेडियम असेल ते आरक्षण आहे.

**गजानन भोईर :-**

परंतु, त्याचा मौजे कुठला आहे?

**मा. सभापती :-**

आपण त्या ठिकाणी आतापासुन पत्रव्यवहार केला नाही आणि त्यांनी ज्या गोष्टीवर अभ्यास केलेला आहे. आपण त्याचा संदर्भ केला नाही तर ते सगळे आपल्या कारकिर्दीत झाले असे होईल.

**रतन पाटील :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही असे कसे बोलता? कारण या ठिकाणी विषयपत्रिकेवर विषय येत आहे. ते स्टेडियम भाईंदर (पुर्व), भाईंदर (प.) किंवा घोडबंदरला आहे. याची माहिती द्यायला नको का? त्या स्टेडियमचा सर्व्हे नंबर काय आहे? ते सांगा.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेब तुम्ही या विषयासाठी अधिका-यांना बोलवा.

**मिलन पाटील :-**

मा. अध्यक्ष साहेब, महानगरपालिकेने प्रत्येक नगरसेवकाला आराखड्याची एक-एक प्रत दिलेली आहे. हे आरक्षण कुठे आहे आणि काय आहे हे आपण पुर्वी तपासुन बघायला पाहिजे होते. आता वाद घालण्यांत अर्थ नाही.

**रतन पाटील :-**

आम्हाला हे शिकविण्याची गरज नाही. आम्ही ते आरक्षण बघितलेले आहे. आम्हाला ते आरक्षण माहिती आहे. मा. सभापती साहेब, ही आरक्षणे कुठे आहे ते आम्हाला माहिती आहे.

**मिलन पाटील :-**

आपण हा सल्लागार नेमणार आहोत. हा ठराव सर्वानुमते पास झालेला आहे. त्यामुळे दुसरा विषय घेण्यांत यावा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही दहा मिनिटापुर्वी बोललास की, आम्हाला पाच महिन्याची मुदत वाढवता येत नाही. आणि तुम्ही तो ठराव दहा महिन्यापुर्वी दिलेला आहे. तुम्ही तो ठराव आम्हाला वाढवायला सांगता.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, तुमच्याकडे त्या आरक्षणाची कॉपी दिलेली आहे की नाही. तुमच्याकडे हा अजेन्डा आला तेव्हा तुम्ही तपासायला पाहिजे होते. ही आमच्या घरची आरक्षणे नाहीत. ही लोक असेच बोलत राहतील. त्यामुळे पुढचा विषय घेण्यांत यावा.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, या विषयावर चर्चा झाली पाहिजे.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही हा विषय बहुमताने पास करा. आणि पुढचा विषय घ्या. तुम्हाला विरोध करायचा असेल तर विरोध करा.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तुम्ही कशाला प्रशासनाची बाजु मांडता.

**मिलन पाटील :-**

आम्ही रुलिंगवाले सदस्य आहेत.

**गजानन भोईर :-**

तुम्ही रुलिंगवाले सदस्य असाल तर तुम्ही ए.टी.पी. वाल्यांना बोलवा.

**रतन पाटील :-**

तुम्ही रुलिंगवाले असले म्हणुन काय झाले? तुम्ही रुलिंगवाले असले म्हणुन आम्ही सहन करुन घेणार नाही.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही रुलिंगवाले सदस्य असले म्हणुन तुम्ही रस्ता बंद करणार का?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तुम्ही असे कसे रुलिंगवाले असल्याचे सांगता.

**कैलासबेन जानी :-**

आम्ही या ठिकाणी बसलेले आहोत. तुम्ही रुलिंगवाले सदस्य आहात किंवा कोणी काय आहे ते सर्व काही आम्हाला माहिती आहे. ते सांगण्याची गरज नाही.

**रतन पाटील :-**

आम्ही मा. सभापती साहेबांकडुन सहकार्याची भुमिका ठेवलेली असताना सन्मा. सदस्य मिलन पाटील हे रुलिंगवाल्याची भुमिका का स्पष्ट करीत आहेत?

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, या ठिकाणी रुलिंगवाल्यांचा प्रश्न उपस्थित होत नाही.

**मिलन पाटील :-**

दि. ३.८ च्या महासभेत हा विषय झालेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमच्या प्रभाग कार्यालयाच्या मिटिंगमध्ये हा विषय झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

हा प्रश्न जनतेशी निगडित आहे. हा प्रश्न रुलिंगचा नाही किंवा हा प्रश्न सत्ताधारी पक्षाच्या रुलिंगचा नाही. हे जे रिझर्वेशन आहे. ते लोकांच्या जागेमध्ये आहे.

**कैलासबेन जानी :-**

मग रुलिंगवाल्यांनाच ते रिझर्वेशन काढु दे. आमच्याकडे सल्ला कशाला मागतात?

**जयंत पाटील :-**

मघाशी सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी मा. सभापतीसाहेब नवीन असल्यामुळे त्यांनी बोलु नये असे सांगितले होते, परंतु, हा विषय गांर्भियाने घ्यायला पाहिजे. हे सर्व प्रश्न संपुर्ण जनतेशी निगडित आहे. खास करुन येथील स्थानिक लोक ख्रिश्चन, आग्री, कोळी असले तरी त्यांच्या त्या जागा आहेत. त्यामुळे असा प्रश्न उद्भवतो की, जर एखादा प्लॉट रिर्झर्वेशनमध्ये असेल आणि आपण जर तो प्लॉट ताब्यात घेतो. याबाबत सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी चांगली माहिती दिलेली आहे की, तुम्ही त्यांना एकतर टी.डी.आर. म्हणजेच ट्रान्सफर डेव्हलपमेन्ट राईटस् द्या किंवा त्यांना कॉम्पनसेशन देताना त्यांना कुठला रेट लावणार आहात?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील तुमचे म्हणणे योग्य आहे. ए.टी.पी. चे अधिकारी येतात. त्यांचे रेट कोणते आहेत, किती ठिकाणी देता येईल, त्याची माहिती देणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

मुंबई महानगरपालिकेमध्ये किंवा इतर ठिकाणी ज्या झोपडपट्ट्या झाल्या. त्याचे असे कारण आहे की जर तुम्ही योग्य ठिकाणी दर दिला नसेल तर त्या ठिकाणी झोपडपट्ट्या बनल्या. जर तुम्ही त्यांना योग्य दर दिला तर ते शेतकरी आपल्याला जागा ताब्यात देतील.

**गजानन भोईर :-**

प्रथम अतिक्रमण हटवा. आम्ही त्याला विरोध केलेला नाही. परंतु, आपण एखादी जागा दान करतो. म्हणजे त्यांचे नुकसान करतो.

**जयंत पाटील :-**

दुसरा प्रश्न असा आहे की, आपण दि. ३.८.०४ रोजी ठराव क्र. ३५ नुसार आपण ह्या जागा आर्किझम या संस्थेला ठराव करुन दिलेल्या आहेत. मग त्यांनी गेल्या दीड वर्षामध्ये काय कामे केली याची माहिती द्यायला पाहिजे. आपण त्यांना तीन वर्षाची मुदत दिलेली आहे आणि आता जवळजवळ दीड वर्ष संपलेले आहे. त्यांनी काहीतरी काम केले असेल तुम्ही आम्हाला त्या कामाची माहिती द्या.

**प्रभात पाटील :-**

ह्यांच्या सगळ्या मुद्यांशी सहमत असायला पाहिजे. मुळात तुमचा जो गोषवारा आलेला आहे, तो गोषवाराच अपुर्ण आहे. ह्याच्यामध्ये मौजे, सर्व्हे नं., ठिकाण नाही. ह्याच्यामुळे जर दोन विरोधी पक्ष भांडायला उठले तर कोणाचे चुकले? मग प्रशासनाने भानगडी लावल्या असेच नाईलाजाने म्हणावे लागेल.

**रतन पाटील :-**

आमचे म्हणणे तेच आहे की, संपुर्ण गोषवारा अपुर्ण आहे. त्याच्यामध्ये ठिकाण नाही. कुठलेही प्लॅनिंग नाही.

**गजानन भोईर :-**

विरोध करीत नाही तुम्ही. आम्ही हा गोषवारा रितसर आणायला सांगतो.

**प्रभात पाटील :-**

या गोषवाऱ्यामध्ये पुर्व, पश्चिम नाही. नंबर, पुढचे मागचे काहीही नाही.

**गजानन भोईर :-**

याचा स.नं. ९१, स.नं. ९६ कुठे आहे? ते सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सांगावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते आरक्षण मिरा भाईंदरमध्ये आहे.

**गजानन भोईर :-**

ते आरक्षण मिरा भाईंदरमध्ये कुठे आहे?

**मिलन पाटील :-**

त्याच्यामध्ये स्टेडियम असे लिहिलेले आहे. याच्यामध्ये सुभाषचंद्र बोस गार्डनचा उल्लेख आहे.

**गजानन भोईर :-**

परंतु, टाऊन पार्क कुठे आहे?

**मिलन पाटील :-**

शिवार गार्डन हे टाऊन प्लॅन आहे.

**गजानन भोईर :-**

त्याचा सर्व्हे नंबर काय आहे? मौजे भाईंदर, गोडदेव, नवघर काय आहे?

**मिलन पाटील :-**

तो सर्व्हे नंबर नाही. ते तुमच्या आरक्षणामध्ये शिवार गार्डन दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही कशाला बाजु मांडता?

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही एकीकडे बोलता ऑफिसरची वाट लावा आणि इथे ऑफिसरची बाजु मांडता.

**मिलन पाटील :-**

हे टाऊन पार्क आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, उद्या ह्याच्यामध्ये तुमचा सर्व्हे नंबर आला तर काय करायचे?

**मिलन पाटील :-**

माझे तीन सर्व्हे नंबर आलेले होते.

**एस.ए.खान :-**

मा. सभापती साहेब, टाऊन प्लॅनिंगचे अधिकारी कुठे आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेब, या मिटिंगला टाऊन प्लॅनिंगचा विषय आहे. मग टाऊन प्लॅनिंगचे अधिकारी कुठे आहेत? एकही अधिकारी हजर नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही टाऊन प्लॅनिंगच्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**रतन पाटील :-**

आता टाऊन प्लॅनिंगचे अधिकारी आले असल्यामुळे आम्ही त्यांना विचारु इच्छितो की, या ठिकाणी आरक्षणा संदर्भात विषय दिलेला आहे. माहितीसुद्धा अपुर्ण दिलेली आहे. शिवाय गोषवारासुद्धा व्यवस्थित दिलेला नाही. त्या ठिकाणी फक्त आरक्षण क्रमांक ९१ टाकलेला आहे. ते स्टेडियमचे आरक्षा आहे. परंतु, कुठला मौजे, कुठला सर्व्हे नंबर त्याची हद्द कुठे आहे? त्याबाबतची माहिती दिलेली नाही. अशा पद्धतीचा अपुरा गोषवारा आहे. या संदर्भात आपण माहिती द्यावी.

**दिलीप घेवारे :-**

हा गोषवारा मी दिलेला नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही शहर अभियंता श्री. शरदचंद्र वैरागडे साहेबांना बोलवा.

**मोहन पाटील :-**

त्यांनी तुम्हाला गोषवारा दिलेला आहे. परंतु, सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्हाला त्याचा सर्व्हे नंबर माहिती करुन घ्यायचा आहे.

**रतन पाटील :-**

सिटी इंजिनिअर साहेबांनी गोषवारा दिलेला असल्यामुळे सिटी इंजिनिअर साहेबांना याबाबत माहिती असली पाहिजे. त्यामुळे मा. सभापती साहेबांनी सिटी इंजिनिअर साहेबांना बोलवावे. या ठिकाणी नगरविकास

खाते आहे. तरीसुद्धा या ठिकाणी सिटी इंजिनिअर असे लिहिलेले आहे. सिटी इंजिनिअर साहेबांकडे व्यवस्थित गोषवारा असेल त्यामुळे सिटी इंजिनिअर साहेबांना बोलवा.

**मोहन पाटील :-**

कुठे जमीन आहे, कुठे काय आहे, किती जमीन आहे, कोणत्या ह्याची आहे, कोणता सर्व्हे नंबर आहे. त्याची संपुर्ण माहिती श्री. जगताप हे अधिकारी देतील. मा. सभापती महोदय त्यांना बोलावतील.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही बोलता ते बरोबर आहे. परंतु, हा गोषवारा नगर विकास खात्याकडुन यायला पाहिजे होता.

**प्रभात पाटील :-**

सचिव साहेब, तोपर्यंत पुढचा विषय घ्या. परंतु, सभागृहाचा वेळ वाया घालवणारी अपुरी माहिती इथे आणु नका.

**प्रकरण क्र. १२० :-**

विकास आराखड्यातील आरक्षणे विकसित करण्याकरिता तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणेंस मान्यता देणे.

**ठराव क्र. १२७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणे ताब्यात घेऊन विकसित करणे बाबत मा. महासभा दि. ०३/०८/२००४ ठराव क्र. ३५ अन्वये प्राधान्यक्रम ठरवून निर्णय झालेला आहे. त्यापैकी मा. स्थायी समिती सभा दि. १८/०५/२००५ ठराव क्र. ०९ अन्वये मे. आर्कीझम यांना ठरावात नमूद १ ते ९ कामे करणे कामी नियुक्त करुन तीन वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. मा. महासभेच्या ठरावानुसार खालील आरक्षणाच्या जागा विकसित करावयाच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | आरक्षण क्रमांक ९१ | स्टेडीयम |
| २) | आरक्षण क्रमांक २६२ | टाऊन पार्क |
| ३) | आरक्षण क्रमांक २६३ | टाऊन हॉल, ड्रामा थिएटर |
| ४) | आरक्षण क्रमांक २६४ | म्युनसिपल ऑफिस |
| ५) | आरक्षण क्रमांक १६५ | मार्केट |
| ६) | आरक्षण क्रमांक ६८ | मार्केट |
| ७) | आरक्षण क्रमांक १३२ | अग्निशमन कार्यालय |

वरील प्रमाणे अ.क्र. १ ते ७ आरक्षणाची जागा ताब्यात घेऊन त्यामध्ये करावयाच्या विकास कामांची अंदाजपत्रके आराखडे व प्रस्ताव तयार करणेकामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करावयाची आहे; त्याकरीता पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात ''तांत्रिक सल्लागा'' लेखाशिर्षाखाली आवश्यक तरतूद करावी लागणार आहे. तरी सदर तांत्रिक सल्लागार नेमून त्यांना द्यावयाच्या आवश्यक फी कामी होणाऱ्या खर्चास व तांत्रिक सल्लागार नेमणेकामी स्पर्धात्मक निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२१ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मघाशी प्रथम ठराव झाला नंतर चर्चा झाली. परंतु, आता एक शिस्त म्हणुन प्रथम चर्चा होऊ द्या. नंतर ठराव करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रथम ठराव मांडु दे. नंतर चर्चा करा.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही सभेच्या नियमाप्रमाणे सभा कामकाज बघा. सभा कामकाजामध्ये प्रथम ठराव मांडले जातात, अनुमोदन दिले जाते, त्याच्यानंतर या ठरावावर चर्चा होते आणि चर्चा झाल्यानंतर या ठरावामध्ये ज्या काही दुरुस्त्या असतील. त्या दुरुस्त्या दिल्या जातात.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, हे कुठल्या सभाशास्त्रामध्ये आहे? तुम्ही ते सभाशास्त्र आम्हाला दाखवा. माझ्याकडे सभाशास्त्राचे पुस्तक आहे.

**मोहन पाटील :-**

कामकाजाची पद्धत हिच आहे. त्यामुळे आपण ह्या पद्धतीचा अवलंब करु या.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही या सभागृहाला न्याय द्या. प्रथम चर्चा होऊ द्या. तुम्ही बहुमताच्या जोरावर असे करु नका.

**मोहन पाटील :-**

ठराव मांडुन झाल्यावर तुम्हाला चर्चा करायला वेळ किती जाईल.

**रतन पाटील :-**

तुम्ही आम्हाला विरोध करता का?

**मोहन पाटील :-**

विरोध करण्याचा प्रश्न नाही. कामाची पद्धत तिच आहे.

**रतन पाटील :-**

ही कामाची पद्धत नाही. प्रथम चर्चा करा आणि नंतर ठराव मांडा. आम्ही तुम्हाला ठराव मांडायला देऊ.

**प्रभात पाटील :-**

ठराव मांडायचा असेल तर मांडा.

**रतन पाटील :-**

साहेब, विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे या शिर्षामधुन रु. १ कोटीची तरतुद आहे आणि विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे बी.पी. रोड बांधकामामध्ये रु. ८ कोटीची तरतुद आहे. आज स्थायी समितीसमोर जो विषय आहे. आपल्याला ह्या हेडमधील दुसऱ्या हेडमध्ये ट्रान्सफर करायचे आहे. त्या त्या विभागात शिक्षण आहे. स्मशानभुमी बाजारपेठा व कत्तलखाने आहेत, मी या सभागृहात एक निर्दशनास आणु इच्छितो की, अंदाजपत्रक सन २००५ व सन २००६ मध्ये जी तरतुद केलेली आहे. ती तरतुद संपलेली आहे का? तुम्ही एवढी कुठली कामे काढली. एवढी-एवढी कामे काढलेली आहेत आणि एवढी-एवढी कामे संपलेली आहेत. त्याचा गोषवारा द्या आणि मिरा भाईंदरमध्ये अजुनही काही कामे आलेली आहेत. जी कामे करणे अत्यंत आवश्यक आहेत. ती कामे केली नाही तर मिरा भाईंदरमध्ये मोठा हाहाकार माजेल. असे तुम्हाला वाटते का? तसे असेल तर तसे सांगा आणि आम्हाला तशा दोन्ही गोष्टी दाखवुन द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

ऑडिटर साहेब, हजर आहेत. ऑडिटर साहेबांना विचारा.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील, तुम्ही सांगायची गरज नाही. मा. सभापती साहेब सांगतील.

**प्रभात पाटील :-**

आपल्या स्थायी समितीचे सन्मा. सदस्य नवीन आहेत. मा. सभापतीसाहेब, हे आपल्या मधील आहेत. आपल्यामधुनच मा. सभापती साहेबांची निवड केलेली आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपल्या मधील आहेत. हे आम्हाला समजते. परंतु, त्यांनी प्रशासनाकडुन माहिती घ्यायची आहे.

**मा. सभापती :-**

मी माहिती देतो. सर्व सन्मा. सदस्यांना या विषयाचा गोषारा दिलेला आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला गोषवारा दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

गोषवारा दिलेला आहे हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, या आर्थिक तरतुदीमधील एवढी तरतुद कुठे वापरली गेलेली आहे? ज्या शिक्षण विभागात तरतुद वापरलेलही आहे. त्या शिक्षण विभागाम रु. ५० लाखाची तरतुद आहे. ती तरतुद कुठे वापरली गेलेली आहे. तुम्ही आता त्याला रु. ३५ लाख ह्या हेडमधुन घेत आहात. मग ही तरतुद कुठे वापरली गेलेली आहे? तरतुद संपलेली आहे का? सार्वजनिक तळी, विहिरी सुशोभिकरणासाठी रु. २५ लाखाची तरतुद आहे. तुम्ही त्याच्यामध्ये अजुन रु. २५ लाख या शिक्षणामधुन म्हणजेच रु. ८ कोटीमधुन घेत आहात. ती तरतुद संपलेली आहे का?

**मोहन पाटील :-**

तरतुद संपण्याचा प्रश्न नाही. परंतु, इतर कामे सुद्धा घ्यायची आहेत. आपण ही तरतुद वाढवत आहोत. कारण आपल्याला ह्याच्यामध्ये जी विकास कामे घ्यायची आहेत. आपण ती विकास कामे घेण्यासाठी या तरतुदीचे पुर्ननियोजन करीत आहोत.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, जे महत्त्वाचे आहे ते तुम्ही विसरलात. तुम्ही जरा लक्ष देऊन ऐकुन घ्या. या मिरा भाईंदरमध्ये २६ तारखेला ती पुर परिस्थिती निर्माण झाली. त्याबाबत कोण बोलणर आहे? या पुर परिस्थिती संदर्भात या विभागाचे नियोजन करण्यासाठी तुम्ही काही तरतुद केलेली आहे का? तुम्ही ह्या फंडाची तरतुद नाले बांधणीसाठी करा. हा फन्ड रु. ८ कोटीमधुन उरलेला आहे. या अंदाजपत्रकामध्ये जे शिक्षण, स्मशानभुमी वापरले गेलेले आहे. ते अजुन बाकी आहे. ती तरतुद तेवढीच वापरा आणि जो फन्ड उरेल तो आकस्मिक निधी या शिर्षामध्ये घ्या. आज सहा महिने राहिलेले आहे. सहा महिन्यानंतर परत तिच पुरपरिस्थिती येणार आहे. आपण जर आज त्याच्यावर निर्णय घेतला नाही तर आपल्याला हाल सहन करावे लागणार आहेत. रेल्वेखाली उघाड्या बांधणे, नाले खोदणे हे कधी करणार? तुम्ही पुढच्या बजेटमध्ये घेऊन ही कामे करणार आहात का ? साहेब, तुम्हाला या कामाला आताच सुरुवात करावी लागेल. हे गांर्भियाचे विषय आहेत. त्यामुळे भलत्यासलत्या शीर्षामधुन घेऊ नका. ह्या विषयाचे गांर्भीय घ्या.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी या ठिकाणी चांगले भाषण केलेले आहे.

**रतन पाटील :-**

मी या ठिकाणी वस्तुस्थिती मांडलेली आहे. हे भाषण नाही. भाषण स्टेजवर करतात. या मिरा भाईंदरची ही समस्या आहे. ही समस्या आपण निर्माण केलेली आहे. याला आपण जबाबदार आहोत.

**मोहन पाटील :-**

आपण जबाबदार आहोत असे नाही. सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही मघाशी बोललात की, आम्ही सहकारी पक्षाला मदत करतो. म्हणुन आम्ही तुमच्या सुचना घेणे ग्राह्य धरतो आणि आम्ही तुमच्या सुचना घेतो. तो विषय नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, विषय घेतो म्हणजे काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही भाषण हा शब्द वापरलेला आहे.

**मोहन पाटील :-**

विषय घेतो हे माझे म्हणणे बरोबर आहे. मी चुकीचे बोलत नाही. आपण या ठिकाणी पुर्ननियोजनसारखा विषय आणलेला आहे. आपल्याला या विषयामध्ये काही विकास कामे करायची आहेत आणि आपण जी विकास कामे या बजेटला घेतलेली आहेत. त्याच्यामध्ये काही कामे करायची असतील ती कामे आपण केलेली आहेत. मी सन्मा. सदस्य रतन पाटील यांच्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, ज्यावेळेला मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये पुर परिस्थिती निर्माण झाली. त्यावेळेला मी महासभेत बोललो की, मी इकडच्या सन्मा. सदस्यांनी सांगितले की, आम्हाला संपुर्णपणे समाधान झालेले नाही. परंतु, मिरा भाईंदर शहरापेक्षा जास्त फटका मुंबईला मिळाला. मुंबईमध्ये सुद्धा सेन्ट्रल गव्हर्नमेन्ट त्यांना पुर्णपणे मदत दिली. त्याच्यामुळे आपल्या मिरा भाईंदर शहराला काही गोष्टी मिळालेल्या नाहीत. ही सुद्धा एक खंत आहे. आपण त्या पद्धतीचा पाठपुरावा करीत आहोत. परंतु, मी त्यावेळेला सुद्धा बोललो की, मुंबई महानगरालिकेचा शंभर वर्षाचा इतिहास आहे. त्या शंभर वर्षाच्या इतिहासात असलेल्या महानगरपालिकेमध्ये अजुनही अनेक ठिकाणी पाणी जमत आहे. त्यासाठी आलेली सन्मा. नेते मंडळी तसेच श्री. लालकृष्ण आडवाणी साहेबांनी मुंबईसारख्या चांगल्या प्रशासनाने काम केल्याचे सर्टीफिकेट दिले. परंतु, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या कामासाठी आपण तत्परतेने सर्व पक्षांच्या लोकांनी तिथे ध्यास घेतला आणि काम करण्याचा प्रयत्न केला. यासाठी डिझास्टर मॅनेजमेन्टचे काम एका बाजुने चालु आहे. परंतु, मिरा भाईंदर शहरामध्ये अशा पद्धतीचे नाले म्हणजेच जे पुर्वीचे वसई नाले आहेत. आपण नवीन नाले निर्माण केलेले आहेत. आपल्याला अशा नाल्यांसाठी जवळजवळ रु. १० कोटी ते रु. १५ कोटी खर्च करायचे आहेत. आपला त्याबाबत सर्व्हे चालु आहे. हा विषय येत्या महासभेपुढे येणार आहे. ज्या पद्धतीने रु. ४५ कोटीचे रस्ते या शहरामध्ये झाले पाहिजेत. आपण त्याचा पाठपुरावा या शहराच्यावतीने मंत्रालयामध्ये केलेला आहे. आपल्याला त्याची परवानगी मिळालेली आहे. त्यामध्ये असलेली गटारे, त्यामध्ये असलेले नाले झाले पाहिजेत. आपल्याला या नाल्यांसाठी रु. १५ कोटी ते रु. २० कोटीपर्यंत खर्च येणार आहे. आपण तो प्लॅन या ठिकाणी आणणार आहोत. आपण सांगितले की ही प्रोव्हिजन होत असताना आपल्या प्रभागात असलेले गार्डन, गटार किंवा विकास काम ही कामे होणे अत्यावश्यक आहे. आपण त्या आवश्यकतेनुसार या ठिकाणी पुर्नविनियोजन आणलेले आहे आणि आपण ते करीत आहे. याचा अर्थ असा नाही की, आपल्याला शहराच्या विकासाची काळजी आहे. म्हणुन आपण बोलतो की, या ठिकाणी हे झाले पाहिजे. ते झाले पाहिजे. ती विकास कामे झाली पाहिजेत. ही आमच्या लोकांची सुद्धा भावना आहे. आम्ही या भावनेतुन त्या पद्धतीने त्या ठिकाणी तशा पद्धतीचे पक्के नाले झाले पाहिजेत. ते पक्के नाले तयार करायला तरतुद निर्माण झाली पाहिजे. आपण त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. यासाठी त्या विषयाची पुढच्या महासभेत विशेष सभा घेऊन आम्ही तो विषय आणणार आहोत. तेव्हा आम्ही हा शब्द बोलणे मला कधीही पटलेले नाही. मी डायसवर बसलेलो असताना विरोधी शब्द कधीही बोललेलो नाही. सन्मा.

सदस्य रतन पाटील साहेब, मला एवढेच बोलायचे आहे की, काही कामामध्ये मला असे बोलायचे नाही. शेवटी कोणतेही काम बहुमताने केले जाते. कोणतेही काम होते आणि कोणतेही काम केले जात नाही हा विषय नाही. परंतु, जर सहकारी पक्षाची भावना असेल तर असे सुझाव घेतले पाहिजेत, अशा सुचना घेतल्या पाहिजेत आणि आम्ही त्या घेत आहोत. तुम्ही ज्या पद्धतीने बोललात की हे काय चाललेले आहे? आम्हाला याची काय गरज आहे? सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही आम्हाला तुमच्या सुचना केलेल्या आहेत. आम्ही तुमच्या सुचनेप्रमाणे प्रभाग क्र. २२ मध्ये कॉंक्रीटीकरणाचे रस्ते केले. रस्ते कॉंक्रिटीकरण करण्याची कुठली पद्धत आहे? तुमच्या सुचना आल्या म्हणुन आम्ही हे काम केलेले आहे. आज तुम्ही त्या कॉंक्रीटीकरणाच्या हायवेच्या ठिकाणी जाऊन बघा. एका वर्षात त्याची काय गॅरेन्टी आहे? आपण डांबरीकरणाचे रस्ते केले. आपल्याला ते रस्ते रिपेरिंग करता येतील. परंतु, कॉंक्रिटीकरणाचे रस्ते दुरुस्त करता येत नाही. आम्ही हा विचार बघितलेला नाही. त्या विरुद्ध पक्षाचा किंवा सगळ्या पक्षाचा पॅनल बघितलेला नाही. आमच्याकडे तो विषय आला. कोणतेही विषय घेतल्यानंतर कुठल्याही सत्ताधारी पक्षाने असा विचार करु नये की तो विषय सत्ताधारी पक्षाकडे येतो की नाही. सहकारी पक्षाचे विषय सत्ताधारी पक्षाकडे महापौर दालनामध्ये येतात. त्या विषयावर विचार विनिमय होतो. आमच्याकडे प्रशासन ते विषय आणतात आणि हा विषय घेतला पाहिजे की नाही. हे सांगतात. जर माझ्या प्रभागाच्या बाजुला असलेल्या विषयामध्ये तुम्ही संपुर्णपणे रु. ६० लाख ते रु. ७० लाख खर्च केला तर आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की तो रस्ता रिपेरिंग होऊ शकत नाही. जो डांबरीकरणाचा रस्ता असतो. तो रस्ता रिपेरिंग होऊ शकतो. परंतु, त्याबाबतीत प्रशासन उत्तर देताना मी असा कधीही विचार केलेला नाही की हे विषय नामंजुर करण्याचे सहकारी पक्षाचे प्रस्ताव आहेत. आपण कितीही बोललो तरी प्रस्ताव मंजुर करणे किंवा नामंजुर करणे हे बहुमतावर अवलंबुन असते. परंतु, आम्ही तुमच्यावर ते बहुमत कधीही लादलेले नाही आणि कधी लादणारसुद्धा नाही. कारण तो अधिकार सर्वस्वी तुम्हाला आहे आणि आम्ही तुम्हाला तो अधिकार देतो. तुम्ही पुर्ननियोजन करा. अशा पद्धतीने बोललात तर आमचे काहीही अडलेले नाही. तुमची गटारे तुटली गेली, नाले तुटले गेले.

**प्रभात पाटील :-**

साहेब, आता तुम्ही बोलले ते बोलाल, ते बोलतील तुम्ही हे शब्द काढा. ह्याला अर्थ नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, हे जे नाले आहेत. आम्ही हे नाले करीत आहोत. विशेष सभा घेऊन हे जे पक्के नाले आहेत आणि जे नाले नैसर्गिक आहेत. त्याचा सर्व्हे झालेला आहे. आपल्याला त्या सर्व्हेप्रमाणे रु. १५ कोटी ते रु. २० कोटीपर्यंत खर्च येणार आहे. तो खर्च करण्याच्या पद्धतीने आमची वाटचाल चालु आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील आम्ही याला अज्ञात नाही. आम्ही पूर्ण ज्ञात आहोत. आम्ही असे विषय आणतो किंवा या ठिकाणी सत्ताधारी पक्षाचे विषय येतात. सत्ताधारी पक्षांना मी बोलल्याबद्दल मला कटु वाटत आहे. सन्मा. सदस्य गजानन भोईर यांना पुर्ण कल्पना आहे की मी याबाबतीत कधीही विरोध दाखविलेला नाही आणि दाखविणारसुद्धा नाही. परंतु, मला या ठिकाणी हे बघायचे आहे की, आपल्याला ज्या पद्धतीने नाले घ्यायचे आहेत. आपल्या महासभेपुढे त्या नाल्याचा विषय येत आहे. आपल्याला त्याच्यासाठी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी घ्यावी लागेल. आपण जरी पुर्ननियोजन केले तरी आपल्याला त्याच्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी लागणार आहे. आपल्याला ती प्रशासकीय व आर्थिक मंजुरी जवळजवळ रु. ५० कोटीच्या आतमध्ये घ्यावी लागेल. म्हणुन या विषयामध्ये संपुर्ण गांर्भीय आहे. मा. सभापती महोदय, तुम्ही गांर्भीयाचा विषय दाखविला म्हणुन आम्हाला नाईलाजाने तुमच्या बोलण्याप्रमाणे बोलावे लागले. कारण हा विषय गांर्भीय मिळविण्याचा नाही. आम्हाला हा विषय संपुर्ण गांर्भीयाने घ्यायचा आहे. तुम्ही त्यांना बोललात की हे विषय होणार आहेत. मग तुम्ही हे विषय का घेतले? याचा अर्थ असा आहे का? की आम्हाला या विषयाबाबत गांर्भीय नाही. मा. सभापती महोदय, मला एवढेच बोलायचे आहे की, आपल्याला या विषयाचे गांर्भीय आहे. म्हणुन आपण या ठिकाणी गांर्भीयपुर्ण विषय घेतलेला आहे. धन्यवाद.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही छान भाषण केले असे मी बोलणार नाही. परंतु, तुम्ही सभागृहाला छान मार्गदर्शन केले असे मी म्हणेन. तुम्ही मला मघाशी भाषण बोललात. परंतु, या ठिकाणी भाषणाची व्यवस्था नाही. या अंर्तआत्म्यामध्ये जे असते ते बाहेर येते. आज मी तुम्हाला हे घ्या किंवा ते घ्या असे म्हटलेले नाही. तुम्ही स्वतः हे बजेट बनविलेले आहे. त्याच्यावर तुमचे फोटोसुद्धा आहेत. तुम्ही हे बजेट बनवुन वर्षाकाठी जी तरतुद केलेली होती. ती वर्षाकाठीची सगळी तरतुद सहा महिन्यात संपलेली आहे का?

**मोहन पाटील :-**

याबाबतची माहिती अधिकारी देतील.

**रतन पाटील :-**

तुम्ही आम्हाला उलट मार्गदर्शन करायला लागलेले आहात. बजेटची तरतुद संपलेली आहे का? त्याच्यामधील किती तरतुद बाकी आहे. मिरा भाईंदरच्या विकासासाठी अजुन कुठली कामे निघालेली आहेत.

**मोहन पाटील :-**

माझा तो विषय नव्हता. ही जी नैसर्गिक आपत्ती झालेली आहे. त्याच्याकरीता नाले हे आमचे रक्षण आहे असे तुम्ही बोललात म्हणुन मला बोलावे लागले.

**रतन पाटील :-**

नाले रक्षणाकरीता आहेत. परंतु, ही गंभीर बाब सांगितलेली आहे.

**मा. सभापती :-**

अतिवृष्टीचे जे झालेले आहे. त्याच्यासाठी आपण सेन्ट्रल गव्हर्नमेन्टकडे मागणी करताना आपण आपल्या शासनाकडुन पैशाची मागणी केलेली आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपली मागणी चांगली आहे. आम्ही तुमच्या मागणीचे निश्चित स्वागत करु. परंतु, जी अत्यावश्यक बाब आहे. तिच्यावर गांर्भीयाने लक्ष द्या. असे मी आपल्याला सभागृहामध्ये सांगितलेले आहे. आपण हे पैसे इकडे वापरण्यापेक्षा हेडमधुन प्लॅन तयार करा.

**मा. सभापती :-**

त्या संदर्भात माजी सभापती साहेब, खुलासा करतील.

**एस्. ए. खान :-**

विजय पार्कचा गंभीर विषय आहे. आपल्याला गटार आणि रस्ता करायचा आहे. त्याच्यासाठी बजेटमध्ये थोडी वाढ करुन द्या. विजय पार्कला पावसाळ्याच्या वेळेला आठ-आठ फुट पाणी भरलेले होते. त्याची प्रोसिजर पूर्ण झाली नसेल तर पुर्ण करुन घ्या.

**मिलन पाटील :-**

खांबित, प्रथम आरक्षणाबाबतची माहिती द्या.

**गजानन भोईर :-**

सभापतीसाहेब, एम.आय. पासुन नवघरपर्यंत जो नाला आहे. त्या नाल्यामध्ये प्रभाग क्र. २२, प्रभाग क्र. २३, प्रभाग क्र. २४, प्रभाग क्र. २५, प्रभाग क्र. २६ हे प्रभाग येतात. तो नाला बांधला तर आपल्याकडे रस्त्यावर पाणी जमणार नाही. त्याची ह्याच्यामध्ये तरतुद करुन घ्या. आपल्याला तो नाला काढायचा आहे म्हणुन तो विजय घेऊन या.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही हा विषय संपवा.

**केशव घरत :-**

माझे एवढेच म्हणणे आहे की, नालेसफाईचे काम जानेवारी महिन्यात पूर्ण व्हावे.

(सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील, तुम्ही मांडलेल्या ठरावाची तरतुद कशासाठी ठेवलेली आहे.

**मा. सभापती :-**

हा ठराव झालेला आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील तुम्ही या स्थायी समितीचे नवीन सदस्य झालेले आहात. तुम्हाला नवीन नवीन कामे करायची आहेत. म्हणुन हे पैसे मिळणार आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, मी नवीन कामांबद्दलच बोलता. जुनी कामे काढा असे मी बोलत नाही. ही विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे हे कशासाठी दिलेले आहे? मा. सभापतीसाहेब, रु. ८ कोटीची तरतुद राखीव ठेवलेली होती ती कशासाठी ठेवलेली होती. याचे उत्तर लेखापरिक्षक किंवा प्रशासनाने द्यावे. त्याचा खुलासा करावा. प्रत्येक वेळेला कोणीतरी उत्तर देते. मग आपले प्रशासन कधी उत्तर देणार? तुम्ही निश्चित दिशा देत नाहीत.

**मिलन पाटील :-**

हा विषय पास झालेला आहे. सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी ठराव केलेला आहे.

**कैलासबेन जानी :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांच्या प्रश्नावर खुलासा होऊ दे. म्हणजे विषय संपेल.

**सुधीर नाकाडी :-**

प्रकरण क्र. १२१ पुर्ननियोजन पत्रकास मंजुरी मिळणेबाबतचा विषय झालेला आहे. त्याच्यामध्ये विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे बी.पी. रोड बांधकामाचे जे रु. ८ कोटी आहेत. ते बांधकाम विभागाच्या ह्याच्यानुसार सन २००५-०६ मध्ये सर्वच्या सर्व खर्च होणार नाही. कारण ह्याच्यामध्ये काही टेक्निकली अडचणी असतील त्या अनुषंगाने असे म्हटलेले आहे की, तुम्हाला पुढच्या वर्षी बनवायचे असेल तर मार्च महिन्यानंतर तरतुद उपलब्ध होणार आहे. त्यामुळे रु. ८ कोटीची तरतुद ह्यावर्षी खर्च होणे शक्य नाही. त्यामुळे ही रक्कम इतर ठिकाणी वापरुन त्यांनी शहराच्या विकासासाठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुमचे म्हणणे आम्हाला मान्य आहे. आपण आता आरक्षणे आपल्या ताब्यात घेत आहोत. त्यासाठी त्यांना मोबदला द्यावा लागणार आहे. याच्यासाठी ती तरतुद ठेवलेली होती.

**प्रकरण क्र. १२१ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १२८ :-**

| | या शिर्षातून | | | | | हया शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्रं.** | **प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मूळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **उपलब्ध शिल्लक** | **प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मूळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **प्रस्तावित वाढीची रक्कम** | **अभिप्राय** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** |
| १ | विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे ६ (६) पृ. क्रं. ३३ | मुख्य कार्यालय इमारत बांधणे/ नागरी सुविधा केंद्र | १००.००लक्ष | - | १००.००लक्ष | विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे ६ (११) पृ. क्रं. ३३ | तांत्रिक सल्लागार फी | २५.००लक्ष | १४.८६लक्ष | ७५.०० लक्ष | मुख्य कार्यालय इमारत बांधणे/ नागरी सुविधा केंद्र या लेखाशिर्षाखाली आजपर्यत काहिही खर्च झालेला नाही व ३१ मार्च २००६ पर्यत होणारा खर्च गृहीत धरता सदर लेखाशिर्षातून रु. ७५.०० लक्ष रक्कम तांत्रिक सल्लागार फी या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास शिफारस आहे. |
| २ | विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे ६ (११) पृ. क्रं. ३३ | डी.पी. रोड बांधकाम | ८००.००लक्ष | ६५.५७ल क्ष | ७३४.४३लक्ष | विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे ६ (७) पृ. क्रं. ३२ | नविन मुख्य इमारत फर्निचर | १५.००लक्ष | ०.४९ लक्ष | १५.०० लक्ष | डी. पी. रोड बांधकाम या लेखाशिर्षाखाली आजपर्यत झालेला खर्च व व ३१ मार्च २००६ पर्यत होणारा खर्च गृहीत धरता सदर लेखाशिर्षातून रु.१५.०० लक्ष नविन मुख्य इमारत |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | विकास आराखडा अंमलबजावणी बांधकामे ६ (१८) पृ.क्रं. ३३ | सार्वजनिक तळी विहीरी सुशोभिकरण | २५.००लक्ष | ४.९९ लक्ष | २५.००लक्ष | फर्निचर, रु. २५.०० लक्ष सार्वजनिक तळी विहीर सुशोभिकरण करणे, रु. ३५.०० लक्ष नविन शाळा इमारत बांधकाम, रु. ५०.००लक्ष स्मशानभुमी बांधकामे, रु. ५०.००लक्ष उदयाने नविन बांधकाम, रु. १०.०० लक्ष शाळा इमारत दुरुस्ती, रु. १०.०० लक्ष सर्व स्मशानभुमी व दफनभुमी दुरुस्ती, रु. १०.००लक्ष बाजारपेठा देखभाल दुरुस्ती, रु. १०.०० लक्ष कुंपणे आणि उदयानाची दुरुस्ती, रू. १५.०० लक्ष |
| | | | | | | **शिक्षण** १ (२) पृ. क्रं. ३४ | नविन शाळा इमारत बांधकाम | ५० लक्ष | ५.४६ लक्ष | ३५.००लक्ष | |
| | | | | | | **स्मशानभुमी** ३ (१) पृ. क्रं. ३१ | स्मशानभुमी बांधकामे | ४०.००लक्ष | ८.३७ लक्ष | ५०.००लक्ष | |
| | | | | | | **सार्वजनिक उदयाने** ५ (१) पृ. क्रं. ३१ | उदयाने नविन बांधकाम | १००.००लक्ष | ०.३८ लक्ष | ५०.००लक्ष | |
| | | | | | | **शिक्षण** ड (२) पृ. क्रं. २३ | शाळा इमारत दुरुस्ती | १०.०० लक्ष | - | १०.००लक्ष | |
| | | | | | | **स्मशानभुमी** ५ (१) पृ. क्रं. १८ | सर्व स्मशानभुमी व दफन भुमी दुरुस्ती | ३५.०० लक्ष | १०.०९लक्ष | १०.०० लक्ष | |
| | | | | | | **बाजारपेठ आणि कत्तलखाने** ६ (१) पृ क्रं. १९ | बाजारपेठा देखभाल दुरुस्ती | १०.००लक्ष | ९.९९ लक्ष | १०.००लक्ष | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **सार्वजनिक उदयाने** ९ (३) पृ. क्रं. २० | कुपणे आणि उदयानाची दुरुस्ती | ९.०० लक्ष | - | १०.००लक्ष | सार्वजनिक कार्यालये दुरुस्ती /पेस्ट कंट्रोल, रु. ३५.०० लक्ष तळी विहीरी दुरुस्ती, रु.५०.००लक्ष गटारे दुरुस्ती व ५.०० लक्ष गटारे नविन या लेखाशिर्षाखाली वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे |
| | | | | | | **बांधकामे ११** (५) पृ. क्रं. २२ | सार्वजनिक कार्यालये दुरुस्ती / पेस्ट कंट्रोल | ३५.०० लक्ष | ९.००लक्ष | १५.०० लक्ष | |
| | | | | | | **बांधकामे ११** (८) पृ. क्रं. २२ | तळी विहीरी दुरुस्ती | १०.०० लक्ष | १०.००लक्ष | ३५.०० लक्ष | |
| | | | | | | **बांधकामे** ११ (९) पृ. क्रं. २२ | गटारे दुरुस्ती | २००.००लक्ष | ९३.४८लक्ष | ५०.०० लक्ष | |
| | | | | | | **बांधकामे** ६ (१६) पृ. क्रं.३३ | गटारे नविन | १४८०.०० लक्ष | २११.२८लक्ष | २००.०० लक्ष | |

वरील प्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

आपण ही व्यवस्था किती ठिकाणी करीत आहोत. म्हणजेच आपण ही स्टेजची वगैरे व्यवस्था किती ठिकाणी करतो? ही व्यवस्था कूठल्या तलावात करत असु. तर असे आपले किती तलाव आहेत?

**दिपक खांबित :-**

आम्ही गणेश विसर्जनची व्यवस्था भाईंदर (पुर्व) आणि भाईंदर (पश्चिम) ला करतो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही ही व्यवस्था पाच ठिकाणी करता की दहा ठिकाणी करता तो फक्त आकडा सांगा. किती ठिकाणी करता?

**दिपक खांबित :-**

आम्ही गणेश विसर्जनाची व्यवस्था जवळजवळ पंधरा ठिकाणी करतो.

**जयंत पाटील :-**

तुमच्या मतें तुम्ही ही व्यवस्था पंधरा ठिकाणी करता. परंतु, ह्याच्यामध्ये नं. ९ च्या कॉलममध्ये स्पीकर सेट दहा हजार लिहिलेले आहेत. म्हणजे तुम्ही दहा हजार स्पीकर सेट कुठे लावता?

**दिपक खांबित :-**

ते स्पीकर सेट दहा हजार नसुन चार हजार आहेत. ते दुसऱ्याचे रेट आहेत.

**जयंत पाटील :-**

आपण चार हजार स्पीकर सेट पकडले तरी आपण एवढे चार हजार स्पीकर सेट लावतो का?

**गजानन भोईर :-**

त्यांनी त्याच्यामध्ये टेन्डरचा रेट दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तो टेन्डरचा रेट आहे.

**मिलन पाटील :-**

तो रेट वर्षाचा आहे.

**गजानन भोईर :-**

हे खुर्चीचे भाडे रु. १२ वर्षांचे आहेत का?

**जयंत पाटील :-**

हे कॉन्ट्रक्ट वर्षाचे आहे.

**रतन पाटील :-**

हे रेट कुठुन काढलेले आहेत ते सांगा.

**केशव घरत :-**

हे खुर्चीचे भाडे रु. १२ एका दिवसाचे आहे की वर्षाचे आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, हे वर्षाचे असेल तर तुम्ही वर्षाचे आहे असे बोला.

**मा. सभापती :-**

सन २००५ आणि सन २००६ करीता दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

कॅान्ट्रक्ट वर्षाचे आहे असा याचा अर्थ झाला.

**मा. सभापती :-**

याच्यामध्ये असा अर्थ होतो की, एखादा कार्यक्रम संपला की, त्या कॉन्ट्रॅक्टरला रु. १२/- देऊन खुर्ची घेऊन जा असे सांगायचे.

**केशव घरत :-**

रु. १२/- हे खुर्चीचे भाडे पर डे आहे ना!

**गजानन भोईर :-**

हे रु. १२/- दिवसाचे आहेत की, वर्षाचे आहेत.

**मा. सभापती :-**

जे वर्षाचे टेन्डर असते ते एक महिन्यासाठी रिन्यु करण्यास काढलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही एक महिन्यासाठी बोललात ते बरोबर आहे. परंतु, किती वेळा टेन्डर काढले ते ह्याच्यामध्ये दिलेले आहे का? मा. सभापतीसाहेब, वर्षांचा खर्च दिलेला आहे का? वर्षाचा खर्च किती आहे? किती ठिकाणी

मंडप आहेत. ते काहीही दिलेले नाही. आम्हाला माहिती आहे की, तो खर्च तुमच्याकडे दिलेला आहे. परंतु, तुम्ही या ठिकाणी नमुद केलेला नाही. याचा गोषवारा दिलेला नाही.

**मा. सभापती :-**

तुम्हाला टेन्डरविषयी माहिती पाहिजे तर मिळेल.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही ती माहिती ह्याच्यामध्ये का देत नाही? तुम्ही ती माहिती अर्धवट का देत आहात? आपण वर्षभर पंधरा ठिकाणी मंडप देऊ.

**गजानन भोईर :-**

हे बोलतात की रु. १२/- हे दिवसाचे आहेत. आणि हे बोलतात की रु. १२/- हे वर्षांचे आहेत.

**दिपक खांबित :-**

या ठिकाणी दिवसाचे भाडे आहे आणि कॉन्ट्रॅक्ट एक वर्षाचे आहे. आपण ते सुद्धा देतो.

**गजानन भोईर :-**

वर्षातुन चार वेळा खुर्च्या लावल्या की त्याचे पैसे मिळतात.

**दिपक खांबित :-**

पहिल्या दिवशी पुर्ण भाडे आहे. आणि पुढच्या प्रत्येक दिवसाकरीता २० टक्के द्यायचे आहेत. रु. १२/- त्याच्या २० टक्के म्हणजे रु. २.४०/- द्यायचे आहेत.

**गजानन भोईर :-**

गणपती झाल्यावर पुन्हा दोन दिवसात छतपुजा आली.

**दिपक खांबित :-**

परंतु, असा कार्यक्रम होत नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, ह्याच्यामध्ये किती तरतुद आहे?

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये रु. ४० लाखाची तरतुद आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही रु. ४० लाखाची वर्षाची तरतुद आहे.

**दिपक खांबित :-**

हे रु. ४० लाख वर्षाचे नसुन दिवसाचे आहेत. तुमचे भरपुर कार्यक्रम होतात. प्रत्येक वेळेला चौपाटीवर कार्यक्रम होतो.

**रतन पाटील :-**

आता खांबित साहेबांनी वक्तव्य केले तर त्यांनीच किती कार्यक्रम होतात ते सांगा.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, प्रशासनाला याबाबत माहिती द्यायला सांगा आणि मला पुढच्या विषयाचा ठराव मांडु दे.

**रतन पाटील :-**

रेट वगैरे सगळे संपले. चौपाटीवर काय कार्यक्रम होतात? ते तुम्ही सांगा.

**दिपक खांबित :-**

आपण ठराव मंजुर करतो आणि ज्याप्रमाणे कार्यक्रम असतात. त्याप्रमाणे ठेकेदाराला ऑर्डर देऊन त्यांच्याकडुन प्रत्येक वेळेला काय करुन घेतो. ह्याच्यामध्ये श्री गणेश विसर्जन, दुर्गामाता विसर्जन, कार्तिक पौर्णिमा त्याच्यानंतर ईद, नवरात्र उत्सव आणि बाकीचे काही शाळेचे वगैरे कार्यक्रम असतील. त्याबाबत ठेकेदारांकडुन त्या मंजुऱ्या करुन घेतो. आपण या ठिकाणी फक्त दर मंजुर करुन घेतो आणि ज्याप्रमाणे आवश्यकता लागेल. त्याप्रमाणे आपण वर्षभरामध्ये घ्या. दराची ऑर्डर देऊन कामे मंजुर करुन घेतो आणि तो ठेकेदार त्याप्रमाणे आपली कामे करतो.

**गजानन भोईर :-**

समजा, हा पाच दिवसाचा प्रोग्रॅम आहे. तर आपण गणपतीमध्ये त्याला पाच दिवसाचे खुर्च्याचे किती भाडे दिले.

**दिपक खांबित :-**

पहिल्या दिवशी प्रत्येक खुर्चीचे भाडे रु. २.४०/- दिलेले आहे.

**गजानन भोईर :-**

म्हणजे पाच दिवसाचे रु. २१/- भाडे झाले.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही या गोषवाऱ्यामध्ये ते द्यायला पाहिजे होते. तुम्ही अशी अर्धवट माहिती का देत आहात?

**मा. सभापती :-**

हा विषय झालेला आहे.

**प्रकरण क्र. १२२ :-**

निवेदस मंजूरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १२९ :-**

id.27À08À05 raojaIcyaa **“dOinak maMuba[- saMQyaa”** yaa vaR%tp~at p`isaQd Jaalaolyaa jaahIr inaivada saucanaa Ë.43 Anvayao KalaIla zokodaraMnaI maudtIt inaivada saadr kolaolyaa Aahot. sadr kamaakrIta sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa Aqa-saMklPaIya AMdajap~kat puroSaI trtud ]plabQa Aaho.

**1´ imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It sava-QamaI-ya ]%savaaAMtga-t EaI.gaNaoSa ivasaja-na¸ dugaa-maata ivasaja-na¸ gaNagaaOr kait-k¸ paOiNa-maa kirta tlaava va caaOpaTIvar [-d vaolaMkNaI ]%sava [.kirta laa[-T¸ maMDp¸ sToja¸ paTI-Sana¸ rolaIMga¸ Tobala¸ Kucyaa-¸ gaoT va [tr vyavasqaa krNao.**

| **A. Ë.** | **tpiSala** | **Saaiga-d DokaoroTsa\-** | **vdarka [lao.** | **Qaaraval DokaoroTsa\-** | **ba`mha saa}D** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | pupvaRYTI krIta sToja ³16’0" ]Mca´ | $.100000À¹ p`tI 100 caaO. fuT | $.125000À¹ p`tI 100 caaO. fuT | $.32000À¹ p`tI 100 caaO. fuT | $.111000À¹ p`tI 100 caaO. fuT |
| 2 | maMDp vaa^Tr p`uf | $.25 caaO.fuT | $.28 caaO.fuT | 19 caaO.fuT | $.30 caaO.fuT |
| 3 | lahana sToja | $. 25 caaO.fuT | $.28 caaO.fuT | $.20 caaO.fuT`` | $.30 caaO.fuT |
| 4 | Kucyaa- | $. 15 naga | $.17 naga | $.12 naga | $.20 naga |
| 5 | Tobala | $. 100 naga | $.90 naga | $.55 naga | $.110 naga |
| 6 | janaroTr | $. 15000 naga | $.16000 naga | $.11000 naga | $.20000 naga |
| 7 | gaoT | $. 10000 naga | $.12000 naga | $.6000 naga | $.12000 naga |
| 8 | laakDI rolaIMga | $. 50 rinaMga fuT | $.55 rinaMga fuT | $.40 rinaMga fuT | $.60 rinaMga fuT |
| 9 | spIkr saoT | $. 10000 naga | $.9500 naga | $.4000 naga | $.11000 naga |
| 10 | h^laaojana | $. 150 naga | $.160 naga | $.100 naga | $.125 naga |
| 11 | eca.ema.laa[-T | $. 6000 naga | $.6500 naga | $.5000 naga | $.8000 naga |
| 12 | paTI-SanaÀpDdo | $. 30 rinaMga fuT | $.32 rinaMga fuT | $.22 rinaMga fuT | $.30 rinaMga fuT |
| 13 | karpoT | $. 5 caaO.fuT | $.6 caaO.fuT | $.2 caaO.fuT | $.6 caaO.fuT |
| 14 | sT^nD f^na | $. 500 naga | $.575 naga | $.400 naga | $.500 naga |
| 15 | gaoT la^mp ³Do laa[-T´ | $. 5500 naga | $.5800 naga | $.4500 naga | $.6000 naga |

**2´ imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It sava-QamaI-ya ]%savaaAMtga-t EaI.gaNaoSa ivasaja-na¸ dugaa-maata ivasaja-na¸ gaNagaaOr kait-k¸ paOiNa-maa kirta tlaava va caaOpaTIvar ivasaja-na izkaNaI baaoTIMcaI vyavasqaa krNao.**

| A.Ë. | tpiSala | kaOiSak paTIla | ivavaok ba`dsa-\ | paTIla A^D sansa\ |
|---|---|---|---|---|
| 1 | ivasaja-na izkaNaI baaoTIMcaI vyavasqaa krNao. | $.11500À¹ p`it baaoT p`tI idna | $.13500À¹ p`it baaoT p`tI idna | 16540À¹ p`it baaoT p`tI idna |

varIla tulanaa%mak t@ta pahta zokodaraMnaI saadr kolaolyaa savaa-t kmaI daracyaa inaivada hyaa vaajavaI Aahot. Ë.1 cyaa kamaa krIta mao. QaaravaI DokaoroTsa\- yaaMcaI savaa-t kmaI dracaI inaivada va Ë.2 cyaa kamaakrIta mao.kaOiSak paTIla yaaMcaI savaa-t kmaI dracaI inaivada hyaa vaajavaI Aahot. sadr inaivadasa maMjaUrI doNyaat yaot Aaho. tsaoca zokodaraMcaI vaoLaovaoLI yaoNaa¹yaa doyak p`danaasa maMjaUrI doNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२३ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

मा. अध्यक्ष साहेब, आम्हाला विषय क्र. १२३ बाबत योग्य ती माहिती पाहिजे. या विषय क्र. १२३ मध्ये प्रशासनाची काहीतरी चुक झालेली आहे. आम्हाला याची थोडीफार माहिती द्यावी. आपण या ठिकाणी जे गाड्यांचे दिलेले आहे. तुम्ही या गाड्यांच्या निविदा कशा पद्धतीने दिलेल्या आहेत. तुम्ही हा जो गोषवारा दिलेला आहे. हा कशा पद्धतीने दिलेला आहे. त्याची थोडीफार माहिती द्या. हा गोषवारा चुकीचा दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही गोषवारा व्यवस्थित द्यायला पाहिजे होता.

**कैलासबेन जानी :-**

गोषवारा बरोबर आहे. कशाला व्यवस्थित द्यायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

आम्हाला हा गोषवारा मान्य आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, आम्हाला गोषवारा व्यवस्थित पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्हाला गोषवारा मान्य आहे. मग तुम्ही कशाला बोलता?

**गजानन भोईर :-**

आपण कार्यशाळेला दीड वर्षापुर्वी मंजुरी दिली. परंतु, आपल्या खात्याने ह्याच्यामध्ये काय हे केलेले आहे. त्याची आपण आम्हाला माहिती द्या. कारण ह्या गोष्टीला दीड वर्ष झालेले आहे. त्या कार्यशाळेला दीड वर्षापुर्वी प्रशासकिय मंजुरी दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला आपले गॅरेज करायचे आहे आणि कार्यशाळा सुद्धा करायची आहे. असा आपण प्रस्ताव केलेला आहे.

**रतन पाटील :-**

आपण उड्डाणपुलाखाली आपली कार्यशाळा बनवायची आहे असे ठरलेले होते.

**गजानन भोईर :-**

आपण कार्यशाळेला दीड वर्षापुर्वी प्रशासकिय मंजुरी दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही हा गोषवारा बघुन सांगा. त्यांना माहिती देऊ दे.

**गजानन भोईर :-**

दिड वर्षापुर्वी काय झाले? याची तुम्ही प्रथम आम्हाला मुख्यालयाकडुन माहिती देण्यांत यावी.

**मिलन पाटील :-**

श्री. अशोककुमार रणखांब साहेब, तुम्ही ह्याच्यावर सही केलेली आहे. म्हणुन तुम्ही आम्हाला याचे उत्तर द्या. तुम्ही कुठल्या हिशोबाने सही केली.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तुम्हाला कुठले उत्तर पाहिजे.

**मिलन पाटील :-**

विषय क्र. १२३ चा जो गोषवारा दिलेला आहे. आम्हाला त्याबद्दल माहिती पाहिजे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तुम्हाला याबाबतची सगळी माहिती मिळेल. त्या माहितीमध्ये काही गैर असेल तर नामंजूर करा आणि जे योग्य असेल ते मंजुर करा. तुम्हाला प्रत्येक आयटमवाईस सविस्तर माहिती मिळेल.

**मोहन पाटील :-**

साहेब, गैर असेल तर नामंजुर करा आणि जे योग्य असेल ते मंजुर करा असे तुम्ही बोलु नका. आम्हाला जे काही करायचे असेल ते आम्ही करु आणि करणार. ह्याच्यामध्ये वाद नाही. परंतु, त्याची माहिती घ्या.

**मा. सभापती :-**

दिड वर्षात काय केले त्याची माहिती द्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी तुम्हाला याची माहिती देतो. ह्याच्यामध्ये तुम्हाला तक्ता दिलेला आहे. उदा. अनुक्रमांक १ :- टाटा ०४०७ ह्याच्यामध्ये  जे ६४ आयटमचे दर आहेत.

**मोहन पाटील :-**

आपण दर दिलेले आहेत ते बरोबर आहेत. परंतु, त्यांचा प्रश्न असा आहे की, आपली कार्यशाळा आहे.

**गजानन भोईर :-**

ही कार्यशाळा मंजुर केलेली होती.

**मोहन पाटील :-**

आपल्या कार्यशाळेचे प्रस्ताव अजुनपर्यंत मंजुर नाहीत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, कार्यशाळेचा जो प्रस्ताव आहे. त्याचे काम चालु आहे आणि आपल्याला त्या पदाची मंजुरी मिळाल्यानंतर आपण त्याची कार्यवाही पुढे चालु करणार आहोत.

**मिलन पाटील :-**

आता आम्हाला ४०७ ची माहिती द्या. ४०७ चे काय आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आता आपल्याकडे जे दर केलेले आहेत. आपल्याकडे त्याची वेगळी शीट आहे.

**केशव घरत :-**

परंतु, ह्याच्यामध्ये त्याचा काहीही उल्लेख नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठिकाणी त्याचा काहीही उल्लेख नाही.

**प्रभात पाटील :-**

गाडीचा नंबर आहेत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

गाडीच्या नंबरचा प्रश्न नाही. परंतु, हे जे दर आहेत. हे एकुण ६४ आयटम आहेत.

**मिलन पाटील :-**

तुम्ही बोललात ते आम्हाला समजले. परंतु, ४०७ चे काय?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हे जे पहिले ६४ आयटम आहेत.

**गजानन भोईर :-**

हे ६४ आयटम नाहीत. हे ६४ दुसरेच काहीतरी आहे.

**मिलन पाटील :-**

श्री. अशोककुमार रणखांबसाहेब, तुम्ही सही केलेली आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी तुम्हाला माहिती देतो.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आम्हाला व्यवस्थित माहिती द्या. तुम्ही आम्हाला शांततेने माहिती द्या.

**संजय तायशेट्ये :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, या ठिकाणी जे ६४ लिहिलेले आहेत ते नंबर ऑफ आयटम आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

दुसरा ए.जी. मोटारचा उल्लेख केलेला आहे.

**मिलन पाटील :-**

आयटम म्हणजे काय? त्या आयटममध्ये काय आहे?

**संजय तायशेट्ये :-**

नंबर ऑफ पार्टस् आहेत.

**रतन पाटील :-**

त्याची अमाऊन्ट काय आहे? ते लिहिलेले आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्याची शीट वेगळी आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही ती शीट कधी देणार आहात.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, ४४७ हे जास्त दराने दिलेले आहे.

**मिलन पाटील :-**

त्याबाबत माझा प्रश्न आहे मला विचारु दे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मला प्रथम आयटमबाबत समजावुन सांगु दे. पहिला आयटम टाटा ४०७, ह्याच्यामध्ये कुठल्या-कुठल्या गोष्टीचे काम करायला लागते ते बघितले तर टायरपासुन, इंजिनपासुन, स्टेरिंग वगैरे सारखे वेगवेगळे आयटम त्याच्यामध्ये आहेत. या कंपनीच्या ६४ आयटमचे जे कमी दर आहेत. दुसऱ्या ह्याचे रु. २२४/- जे दर आहेत. ते कमी आहेत आणि तिसऱ्या आयटमचे रु. ४४७/- आहेत. म्हणजे वेगवेगळे दर आहेत. ४४७ आयटमचे दर कमी आहेत आणि रोअर आयटमचे ८२ आयटमचे कमी दर आहेत.

**मिलन पाटील :-**

श्री. रणखांबसाहेब, तुम्ही सही केल्यानंतर तुम्ही हे सगळे आयटम चेक केले आहेत का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी सही केलेले जे आयटम आहेत ते आयटम मी तुम्हाला वाचुन दाखवतो.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही ते आयटम तपासुन बघा. परंतु, तुम्हाला ते आयटम तपासता येणार नाहीत.

**मोहन पाटील :-**

परंतु, श्री. रणखांबसाहेबांना त्या आयटमबाबत खुलासा करु दे.

**जयंत पाटील :-**

श्री. रणखांबसाहेब, तुम्ही या ठिकाणी चार जणांच्या निविदा आणलेल्या आहे. त्या निविदा अशा आहेत. मेसर्स साई ऑटो गॅरेज ए. डी. मोटर्स, वाय. सी. स्पेअर आणि रे राईट असे आहेत. आपण प्रत्येकाला वेगवेगळे आयटम दिलेले आहेत. म्हणजे तुम्हाला सगळ्यांच्याच निविदा मान्य कराव्या लागतील.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी तुम्हाला हे सगळे समजावुन सांगतो. आता सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी सांगितलेला पहिला मुद्दा मी तुम्हाला सांगतो की, एखाद्याच्या स्टेअरिंग रिपेरिंगचा आयटम लागला आणि एखाद्यांचा ब्रेक रिपेअर करण्याचा आयटम लागला. आपण स्टेरिंग एकत्र रिपेअर करुन ब्रेकचा घेऊ शकत नाही. म्हणुन ज्यांचे सगळ्यात जास्त आयटम असतील व ते आयटम कमी दराचे असतील तर आपण त्या आयटमना दरवर्षीप्रमाणे मंजुरी देतो.

**जयंत पाटील :-**

त्याचे दर काय आहेत?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी तुम्हाला आता दर सांगतो.

**गजानन भोईर :-**

आपण निविदा मंजुर करायला देतो, परंतु, त्या निविदा जास्त दराने देतो. सभागृहातील सदस्यांना काय कळणार? कारण मी ४४७ आकडा मोठा आहे असे बोलतो.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आम्हाला आयटमबाबत सांगा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी तुम्हाला आयटमबाबत सांगतो. आपण आयटमवाईस जाऊ या. पहिला आयटम टाटा इंजिन स्पेअर पार्टस क्रँड शार्प. आता साई ऑटोचा दर आहे. ए.डी. आणि वाय.सी.चे सुद्धा रेट आहेत. त्याच्यानंतर कनेक्टिंग रॉड, कनेक्टिंग बेअरींग, नेम बेअरींग नंबर ऑफ पार्टस, पाचवा आयटम गास्गेट शीटसृ, सहावा आयटम वॉल शीट, सातवा आयटम वॉल गाईड, आठवा आयटम रॉकर शॉप अशा प्रकारे आयटम आहेत.

**मोहन पाटील :-**

या आयटमची सविस्तर माहिती श्री. रणखांब साहेब यांच्याकडे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. रणखांब साहेब, ह्या तुमच्या गॅझेट मध्ये काहीतरी मिस अंडरस्टँडिंग आहे. कारण तुम्ही दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये २२४ काय आहे? ४४७ काय आहे? ८२ काय आहे? ६४ काय आहे? म्हणजे हे आकडे काय आहेत? ते या लोकांना कळत नाही. तुम्ही याबाबत क्लेरिफाय करा. कारण आम्हाला वाटते की, हे रुपये आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे दर आहेत असे आम्हाला वाटते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आम्ही हा गोषवारा कसा एक्सप्लेन करायचा याबाबत विचार केला. कारण बेसिकली एका ह्याचे दर एवढे आहेत. आपण हे एवढे दर जोडले तर ते प्रॅक्टिकली फिजिबल होंणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यासाठी तुम्ही हा गोषवारा काय आहे? तो समजावुन सांगा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी हा गोषवारा समजावुन सांगत आहे. हे जे चार टेन्डरधारक आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण १४ ला मंजुरी देण्यांत यावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण १४ ला मंजुरी देत नाही. परंतु, ज्यांचे दर सगळ्यात कमी आहेत. त्यांना आपण मंजुरी देतो.

**जयंत पाटील :-**

परंतु, तुम्ही या ठिकाणी गोषवारा दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, चार कंपन्या एकातच आहेत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याच्यामध्ये टाटा ४०७ चे बिल आहेत. त्याच्यामध्ये साई ऑटो गॅरेजचे रु. ६४ हे दर कमी आहेत. ए.डी. मोटरचे रु. २२४/- हे दर कमी आहेत. वाय.सी. चे सुद्धा रु. ४४७ हे कमी दर आहेत. त्यामुळे आपण त्या ठेकेदाराला कमी दरात द्यायला पाहिजे. हा गोषवारा देण्यापुर्वी आम्ही हा गोषवारा सर्व प्रकारे तयार करुन बघितलेला आहे. परंतु, आता हा गोषवारा कसा द्यायचा हा एक प्रश्न आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुमची चुक कुठे झालेली आहे तें सांगतो. वरील तुलनात्मक तक्ता पाहता वाय.सी. स्पेअर यांचे दर सर्वात कमी आहेत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्याचे दर ४४७ आयटममध्ये कमी आहेत.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही दिलेल्या तक्त्यामध्ये आम्ही काय समजायचे? यांचे दर कमी कसे? ते आम्हाला कसे कळणार?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याच्यापेक्षा कमी दर घेऊ शकत नाही. कारण ते पॉसीबल नाही. आता आपण काय करु या? की ह्या ज्या शीटस आहेत. त्याच्यासाठी माझ्याकडे दोन फाईली आहेत. त्यातील शीट जोडुन त्याची प्रत्येकाला झेरॉक्स देतो. जर आपल्याकडे काही अवलोकन असेल किंवा बघायचे असेल किंवा काही चेक करायचे असेल तर आम्ही आपल्या विभागामध्ये सगळ्यांना दाखविण्याची व्यवस्था करतो. अजेन्ड्याची ही एक फाईल आणि

ही एवढी फाईल जोडली तर फिजीबल होणार नाही. आपण सर्वांनी हे सगळे दर बघा. आणि काही अयोग्य असेल तर तुम्ही त्याच्यामध्ये रेकमेन्ड करु शकता.

**मिलन पाटील :-**

तुम्ही हा चुकीचा गोषवारा दिलेला आहे. वाटल्यास तो गोशवारा पुढच्या मिटिंगमध्ये सुधारणा करुन आणावा. जेनु काम तेनु थाय बिजु करे तो गोता खाय। आपण त्याच्यासाठी ऑटोमोबाईल इंजिनियर नेमलेला आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण ऑटोमोबाईल इंजिनियर रेकमेन्डेशनमध्ये आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला हे रितसर मांडता आलेले नाही. आता या ठिकाणी ४०७ नमुद केलेले आहे. मग आम्ही काय समजणार? ॲक्चुली ४०७ जास्त आहे. तुम्ही साई ऑटो बघायला पाहिजे की, हे दर कमी आहेत. हा लो दर्जाचा आहे. तुम्ही ते अर्थसहाय्य देताना तो वाय.सी. चा कमी दर आहे. याबाबत आम्हाला काय समजणार?

**रतन पाटील :-**

त्या ठिकाणी दर असे लिहायला पाहिजे होते.

**मिलन पाटील :-**

ते दरमध्ये आहे. तुमचा हा गोषवारा व्यवस्थित करुन घ्या.

**मोहन पाटील :-**

तुम्ही याबाबतची माहिती सादर करा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आता आपल्या महानगरपालिकेकडे जेवढी वाहने आहेत. ती वाहने वेगवेगळ्या ॲंगलमध्ये रिपेअर करायची असतील ती पाचशे-सहाशे आयटममध्ये रिपेअर करावे लागतात. कोणाचे स्टेरिंग बिघडेल, कोणाचे चाक बिघडेल, कोणाच्या इंजिनमध्ये फॉल्ट येईल. असे वेगवेगळ्या प्रकारे बिघाड होऊ शकतात. आपल्याकडे पाचशे आयटम आहेत. आपण पाचशे आयटम केल्यानंतर त्याची शीट तयार केलेली आहे. शीटमध्ये सगळ्यात कमी दर अमुक-अमुक कंपनीचे आहेत, हे मेन्शन केलेले आहे. ते किती आहेत? ते बघण्यासाठी मी तुम्हाला उदाहरण देतो की, समजा ४४७ आयटम कमी दराचे आहेत. त्यामुळे आपण त्याला त्याचे रिकमेन्डेशन करतो. दुसऱ्या टाटा ६६०७ मध्ये ४५९ चे दर कमी आहेत. त्याप्रमाणे संख्या दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, ते पुढच्या वेळेला व्यवस्थित येऊ दे. तुम्हाला पाहिजे असेल तर तुम्ही पुढच्या वेळेला सादर करा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याच्यामध्ये बरीच वाहने बंद आहेत. आता तुम्ही कुठलाही आयटम सांगा. आम्ही तो आयटम काढुन देण्याची तयारी करतो. आम्ही त्याच्यामध्ये सगळी माहिती द्यायला तयार आहोत.

**मिलन पाटील :-**

परंतु, त्याच्यासाठी अटीशर्ती लावतील.

**मा. सभापती :-**

हा गैरसमज कसा झालेला आहे ते मी तुम्हाला सांगतो. या गोषवाऱ्यामध्ये ४४७ आयटम लिहिलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते ४४७ आयटम आहेत. आम्हाला तो भाव वाटला.

**मा. सभापती :-**

हा प्रश्न मागच्या दोन-तीन मिटिंगमध्ये लांबणीवर गेलेला आहे.

**रतन पाटील :-**

आपल्या ॲम्बेसिडर गाड्या आपण हे वाय.सी. कडे रिपेरिंगला देत आहोत. आपण ते रिपेरिंग करुन आणलेले आहे. आणि आता पुन्हा ते वाय.सी. कडे रिपेरिंगला गेलेले आहे. मग हे रिपेरिंग कशा पद्धतीने होते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

रिपेरिंगला काय गेलेले आहे?

**रतन पाटील :-**

ॲम्बेसिडर गाड्या रिपेरिंगला गेलेल्या आहेत. वाहन विभागाने आताच रिपेअर करुन आणलेल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

ज्या सन्मा. सदस्यांच्या काही सुचना असतील किंवा काही माहिती ही असेल तर ती माहिती जर प्रशासन द्यायला तयार असेल तर हा ठराव गरजेनुसार मंजुर करायला काही हरकत नसावी. असा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**गजानन भोईर :-**

ठराव मांडायला हरकत नाही. दोन्ही प्रकारचे व्हेईकल घ्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आमच्याकडे टेन्डरबाबत कुठलीही माहिती असेल तर आम्ही तुम्हाला ती माहिती चोवीस तासामध्ये देऊ.

**संजय तायशेट्ये :-**

वाहनाचे लाईट व्हेईकल आणि हेवी व्हेईकल असे दोन प्रकार केलेले आहेत.

**रतन पाटील :-**

सध्या आपल्या ॲम्बेसिडर गाड्या कुठे आहेत? आपल्या ॲम्बेसिडर गाड्या गॅरेजमध्ये आहेत की इथे आहेत.

**संजय तायशेट्ये :-**

काही ॲम्बेसिडर इथे आहेत आणि काही ॲम्बेसिडर गॅरेजमध्ये आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, रिपेरिंग करुन कधी आणल्या. त्याच्यामध्ये त्या ॲम्बेसिडर असतील.

**मिलन पाटील :-**

ह्या गाड्या निगोशिएबल बेसीसवर ठेवा. जर त्या गाड्यांचे कमी जास्त होत असेल तर आम्ही तुम्हाला देऊ. निगोशिएबल करा. समजा, उद्या ह्यांचे रेट जास्त असले तर आम्ही तुम्हाला देऊ.

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन केले.

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी दुसऱ्या ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १२३ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेना मंजुरी देणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. १३० :-**

दै. आपला वार्ताहर, दै. सुरज प्रकाश दि. १४/०६/०५ रोजी स्पेअर पार्ट पुरवठा व वाहने दुरुस्ती बाबत निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार खालील निविदा धारकांनी दर भरले आहेत.

१. मे. साई ऑटो गॅरेज
२. मे. अे.डी. मोटर्स
३. मे. वाय.सी. स्पेअर्स
४. मे. रेअर ऑटो

यांनी मुदतीत सादर केलेल्या निविदा उघडल्या आहेत. महानगरपालिकेतील विविध हेवी कमर्शियल, लाईट कमर्शियल वाहना करिता दुरुस्तीचे दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | मे. साई ऑटो गॅरेज यांनी सर्वात कमी सादर केलेले दर | मे. अे. डी. मोटर्स यांनी सर्वात कमी सादर केलेले दर | मे. वाय. सी. स्पेअर्स यांनी सर्वात कमी सादर केलेले दर | रेअर ऑटो यांनी सर्वात कमी सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाटा ४०७ | ६४ | २२४ | ४४७ | ८२ |
| २ | टाटा ६०८ | ३४ | २३१ | ४५९ | ६८ |
| ३ | टाटा ७०९ | ३५ | २२७ | ४५७ | ६४ |
| ४ | टाटा ७०९ | ३९ | २३७ | ४२२ | ८८ |
| ५ | टाटा ७०९ टुब्रो | ३८ | २१६ | ४४९ | ७० |
| ६ | टाटा १६१२ | ३३ | २२९ | ४५८ | ६३ |
| ७ | टाटा १२१० | ३८ | २२३ | ४५२ | ७३ |
| ८ | टाटा १६१३ | ३५ | २३१ | ४५५ | ७१ |
| ९ | महिंद्रा २६५ | | १६७ | ४०६ | १०१ |
| १० | महिंद्रा २७५ | | १६७ | ४०४ | ९६ |

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | मे. साई ऑटो गॅरेज यांनी सर्वात कमी सादर केलेले दर | मे. अे. डी. मोटर्स यांनी सर्वात कमी सादर केलेले दर | मे. वाय. सी. स्पेअर्स यांनी सर्वात कमी सादर केलेले दर | रेअर ऑटो यांनी सर्वात कमी सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ११ | महिंद्रा ५७५ | | | ४०४ | ९५ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे सर्वात कमी दर आहेत. त्यामुळे हेवी कमर्शियल व लाईट कमर्शियल वाहने दुरुस्त करणेच्या निविदेला मंजुरी मिळावी. तसेच सदर कामी वेळोवेही येणारे देयक अदा करणे मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफासर असे.

**विषय क्रमांक २ :- लाईट व्हेहिकल दुरुस्ती निविदा**

हिंदुस्तान मोटर्स ॲम्बेसेटर्स, मारुती इस्टीम, महिंद्रा जीप, इत्यादी करिता. स्पेअर पार्ट पुरवणे करिता खालील निविदाधारांनी दर भरले आहेत.

१) मे. साई ऑटो गॅरेज
२) मे. अे.डी. मोटर्स
३) मे. वाय.सी. स्पेअर्स
४) मे. रेअर ऑटो

यांनी मुदतीत सादर केलेल्या निविदा उघडल्या असता महानगरपालिकेतील विविध लाईट वाहना करिता खालील प्रमाणे दुरुस्तीचे दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | साई ऑटो गॅरेज | अे. डी. मोटर्स | वाय. सी. स्पेअर | रेअर ऑटो |
|---|---|---|---|---|---|
| १ | फोर्ट आयकॉन | ७८ | १२७ | २०३ | २४ |
| २ | कॉँटेसा | २२९ | ६७ | २८ | ८७ |
| ३ | मारुती एस्टीम | २८३ | ७२ | १७ | ६९ |
| ४ | ॲम्बेसेडर | २७५ | १०८ | १० | ७४ |
| ५ | टाटा २०७ | २१५ | १४५ | २१ | १०६ |
| ६ | महिंद्रा जीप ५४० + ७५० | २७८ | ६८ | २० | १०८ |

तरी वरील तुलनात्मक तक्ता पाहत मे. साई ऑटो गॅरेज यांचे दर सर्वात कमी दर आहेत, व फोर्ड आयकॉन या वाहनाकरिता मे. वाय.सी. स्पेअर्स यांचे दर सर्वात कमी आहेत. सबब हेवी कमर्शियल व लाईन कमर्शियल वाहने दुरुस्ती करणे करीता आलेल्या निविदामधील सर्वात कमी दराची निविदा मंजूर करणे व सदर निविदा मंजुरीस अगोदरच विलंब झाल्याने दरम्यानच्या कालावधीत वानाची दुरुस्ती सन २००४-२००५ साली मंजुर झालेल्या दरानेच करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२४ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

श्री. रणखांब साहेब, तुम्ही मघाशी कार्यशाळा म्हणजे गॅरेजविषयी बोललात की तिकडे गॅरेजचे काम चालु आहे, सर्व्हे चालु आहे. आता जे ड्रायव्हर, कर्मचारी वाचले, त्यांना जागा कुठुन देणार?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तो विषय वेगळा होता आणि आता हा वेगळा विषय आहे.

**गजानन भोईर :-**

जागा तिचं आहे. तिचं कार्यशाळा आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, भाईंदर (इस्ट) आणि भाईंदर (वेस्ट) अशा दोन जागा आहेत.

**गजानन भोईर :-**

मग ह्याच्यामध्ये तसे द्यायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, त्या जागेचे किती भाडे ठरलेले आहे?

**रतन पाटील :-**

साहेब, पी.डब्ल्यु.डी. चे भाडे आकारावे.

**सुर्यकांत भोईर :-**

पी.डब्ल्यु.डी. चा रेट असेल ती रेट ठरविण्यांत यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

पी.डब्ल्यु.डी. चा रेट असतील त्या रेटप्रमाणे भाडे आकारावे.

**रतन पाटील :-**

सार्वजनिक बांधकाम म्हणजेच पी.डब्ल्यु.डी. ला जे भुईभाडे आहे. ते भाडे आकारण्यांत यावे.

**मोहन पाटील :-**

आपण आपले भाडे फिक्स केलेले आहे.

**रतन पाटील :-**

ते भाडं कोणीही फिक्स केलेले नाही. आपण या ठिकाणी भाडं फिक्स करणार आहोत.

**मोहन पाटील :-**

आपल्या कमिटीकडे आपण समाजमंदिर किंवा केबीन देतो. आपण त्याचे भाडे इकडे फिक्स केलेले आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही आता असे का बोलता? आपण आता तिकडे त्या विभागाचे गोडाऊन भाड्याने दिली तर त्याचे करोडो रुपयाचे भाडे मिळेल.

**सुर्यकांत भोईर :-**

लोक रु. ३ हजार ते रु. ५ हजारापर्यंत भाडे द्यायला तयार आहेत.

**रतन पाटील :-**

सार्वजनिक विभागाच्या सार्वजनिक नियमात बसणाऱ्या शासनाच्या दराने, त्यांना सरळ बाजारभावाप्रमाणे भाडे आकारावे.

**मोहन पाटील :-**

आपण रु. २५१/- भाडे ठरविलेले आहे.

**रतन पाटील :-**

त्यांनी आपल्याकडे त्या जागेची मागणी केलेली आहे का?

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे बस होत्या. सगळ्या बस तोट्यात चाललेली आहे.

**रतन पाटील :-**

बस तोट्यामध्ये जाते. महापालिका तोट्यामध्ये जात नाही.

**मोहन पाटील :-**

ही परिवहन सेवा आपली आहे.

**रतन पाटील :-**

हा आपला एक अविभाज्य भाग आहे असे आपण म्हणतो. त्याबरोबर त्यांना सुद्धा कुठेतरी सामावुन घ्या. आपल्या महापालिकेचे नुकसान होऊ नये.

**मोहन पाटील :-**

या परिवहन सेवेकरीता भाईंदर (प.) ला जो डेपो आहे. आपण त्या डेपोची मागणी केलेली आहे. त्यांनी आता भाईंदरची इन्टरसिटी सेवा बंद केलेली आहे. ज्या बसेस भाईंदरच्या बाहेर जातील. त्यांना मोठ्या डेपोची आवश्यकता नाही. तो डेपो चार एकरचा आहे. आपण दोन एकरच्या डेपोची मागणी केलेली आहे. याच्या कार्यवाहीचे काम शासन स्तरावर सुरु आहे. आदरणीय गणेश नाईकसाहेबांनी सुद्धा त्याबाबत चर्चा केलेली आहे आणि पत्रव्यवहारसुद्धा सुरु झालेला आहे. यदाकदाचित तीन महिन्यानंतर किंवा सहा महिन्यानंतर जागा उपलब्ध होऊ शकते.

**रतन पाटील :-**

मी सभेमध्ये बोललोसुद्धा, आपण त्यांना.......

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशार पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन सभागृहात केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण जर ती जागा गोडाऊनसाठी दिली तर आपल्या महापालिकेला करोडो रुपये मिळतील. आपण २५१ कुठल्या हिशेबाने सांगता.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, दोन्ही कायमस्वरुपी नाही.

**रतन पाटील :-**

त्याची मुदत अकरा महिने असेल.

**मोहन पाटील :-**

ह्या जागांमध्ये कुठलेही स्ट्रक्चर नाही.

**रतन पाटील :-**

स्ट्रक्चर असले तरी ते बांधतील.

**मोहन पाटील :-**

आपल्याला त्या जागेचे करोडो रुपये भाडे मिळेल. आपल्याला याबाबत साशंकता नाही. परंतु, ती लोक तिथे कुठलेही स्ट्रक्चर बांधत नाही. ती ओपन जागा आहे. त्या ओपन जागेवर १० १५ चे केबीन बांधणार आहेत. जोपर्यंत त्यांना पक्क्या स्वरुपाची जागा कायम मिळत नाही. तोपर्यंत ते तीन-सहा महिन्यात जागा मिळाली तर जागा ठेवुन देतील.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही त्या जागेचे टेन्डर काढा. ते टेन्डर घेण्यासाठी खुप लोक तयार होतील.

**रतन पाटील :-**

तुम्ही तिथे शासनाचे टेन्डर काढा. तिथे आपले टेन्डर निघते.

**जयंत पाटील :-**

मा. अध्यक्ष महाशय, आपल्याकडे जी परिवहन सेवा चालते. आपण ती परिवहन सेवा कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने चालवतो. हा विषय जेव्हा महापालिकेत आला आणि ह्या विषयासंबंधी चर्चा झालेली असताना मी प्रश्न विचारलेला होता. परंतु, मा. सभापती साहेबांनी वेगळे उत्तर दिलेले होते. मा. उपायुक्त श्री. अजिज शेख साहेब, यांचे वेगळे उत्तर होते. मा. सभापती साहेब, बोलले होते की ती जागा कुठल्याही तऱ्हेच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी लागेल. ती जागा आम्हाला द्यायची गरज नाही असे त्यांनी मिटिंगमध्ये उच्चार काढले होते. त्याच्यानंतर मा. उपायुक्त, श्री. अजिज शेख साहेबांनी उठुन सांगितले की, आपल्याकडे वाहन पार्किंगसाठी रिझर्वेशन आहेत. आम्ही ती रिर्झवेशन घेणार आहोत. असे असताना कॉन्ट्रॅक्टच्या बसेससाठी त्यांचे ड्रायव्हर, त्यांचा इतर स्टाफ यांच्यासाठी आम्हाला मेहेरबानी करण्याची आवश्यकता नाही. जर आपल्या महापलिकेला उत्पन्न वाढवायचे असेल आणि जर आपल्याला जास्त दराने पैसे मिळत असतील तर आपण कशाला दया करायची? आपण त्यांना रु. १९/- हा रेट ठरवुन दिलेला आहे. त्यांनी कुठे जायचे तो त्यांचा लुकआऊट आहे. श्री. अजिज शेख साहेब, तुम्ही त्यावेळेला जे उत्तर दिलेले होते ते सांगा. श्री. अजिज शेख साहेब,, तुम्ही त्यावेळेला असे उत्तर दिले होते की, तुमच्याकडे जे रिर्झवेशन आहे ते रिझर्वेशन आमच्याकडे नाही. हे तुम्ही त्यावेळेला चुकीचे उत्तर दिलेले होते. तुमची ती रिझर्वेशन परिवहन सेवेसाठी नाहीत. ते तुम्ही बघुन घ्या आणि मा. सभापती साहेबांनी वेगळे उत्तर दिलेले होते की, आम्हाला त्याची आवश्यकता नाही. आम्ही ज्यांना कॉन्ट्रॅक्टवर बसेस दिलेल्या आहेत. तेच बघणार. त्यांच्या स्टाफने ते बघण्याचे काम आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठिकाणी दुरुस्ती सुचविलेली आहे की, महानगरपालिका किंवा प्रशासन ठरवेल म्हणजे आपण या ठिकाणी जे रु. २५१/- सुचविलेले आहेत. ते महानगरपलिका किंवा प्रशासन ठरवेल असे म्हणणे आहे.

**जयंत पाटील :-**

सभेमध्ये जे रेट ठरविले त्याची अमाऊन्ट दाखविलेली नाही.

**दिपक खांबित :-**

रु. २५१/- नसल्याचे आम्ही त्यावेळेला ठरविलेले होते.

**जयंत पाटील :-**

तुम्ही तसे दाखवा.

**सुर्यकांत भोईर :-**

रु. ३०००/- भाड्याने द्यायचे पास झालेले होते. तेव्हा आम्ही होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रु. ३०००/- पास झालेले होते.

**रतन पाटील :-**

आम्ही आणतो किती झाले ते सांगा. त्याच्यामुळे महापालिकेचा करोडो रुपयाचा फायदा होईल. तुम्हाला सगळ्यांना जास्त रेट दिलेला आहे. रु. १९/- हा रेट महाराष्ट्रात कुठेही नाही.

**मोहन पाटील :-**

बांधकाम विभाग जो रेट ठरवेल त्या रेटनुसार टेन्डर द्यायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तीन-तीन, चार-चार महिन्याचे भाडे द्यायला तयार आहेत.

**रतन पाटील :-**

तुम्ही महापालिकेचे नुकसान कशाला करता?

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ह्या जागा कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने घ्यायच्या असा ठराव पास झालेला असताना तुम्ही स्थायी समितीच्या मंजुरीला का आणले?

**मोहन पाटील :-**

या विषयाबाबत महासभेत चर्चा झालेली होती. मग तुम्ही महासभेत दिलेले उत्तर का बदलता?

**सुर्यकांत भोईर :-**

आमचा या ठरावाला विरोध आहे.

**मोहन पाटील :-**

या ठरावामध्ये विरोधाचा प्रश्न येत नाही. जर तुम्ही चक्क बांधाल तेव्हा तुम्हाला भाड्यावर मिळणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

महापालिकेने बांधुन घ्यावे आणि भाड्याने द्या. महापालिकेचे उत्पन्न वाढवा.

**मोहन पाटील :-**

आपल्याला भाड्याने द्यायचे आहे. कायमस्वरुपी द्यायचे नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांनी महापालिकेत उत्तर दिलेले आहे की हे कॉन्ट्रॅक्टरवर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिका पर किलोमीटरसाठी किती रुपये देते?

**जयंत पाटील :-**

महानगरपालिका पर किलोमीटरसाठी रु. १९/- देते.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग दिवसाचे किती देते? आपल्या महानगरपालिकेला त्याचे किती इन्कम येते?

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेला रु. २५०/- तासागणिक मिळतात.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. अजिज शेख साहेब, आपले ह्याच्यावर काय म्हणणे आहे?

**कैलासबेन जानी :-**

परिवहन सेवेसाठी जे बजेट केलेले आहे ते फक्त खतम करणार आहे. बाकी काही इन्कम नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण जे टेन्डर काढलेले आहे. त्याच्यामध्ये त्यांनी सगळ्या जागा पार्किंगसाठी, वर्कशॉपसाठी जी जागा लागेल ती जागा त्यांनी स्वतः निर्माण करावी. आपण अशा पद्धतीचा क्लॉज त्याच्यामध्ये टाकलेला आहे. आपण ती जबाबदारी आपल्यावर घेतलेली नाही. फक्त आपल्या नगरपालिकेच्या रिझर्वेशनमध्ये पार्किंग किंवा असे काही अनुषांगिक रिझर्वेशन आहेत. जर आपण त्याला सेक्शन ३७ खाली मायनर मॉडिफिकेशन केले आणि त्याच्यामध्ये परिवहन सेवेच्या वापरासाठी आपल्याला फ्युचरमध्ये जर काही जागा मिळाली तर आपण तशा पद्धतीचा प्रस्ताव परिवहन समितीकडे पाठवला होता. परिवहन समितीने तो प्रस्ताव मंजुर करुन टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेन्टला पाठविलेला आहे. तो प्रस्ताव महासभेमध्ये येईल. त्याच्यानंतर त्या प्रस्तावावर काय रिझर्वेशन टाकायचे किंवा काय रिझर्वेशन निर्माण करायचे वगैरे ठरविता येईल. परंतु, सध्या आपले जे महालक्ष्मी इन्फ्रास्ट्रक्चर कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यांचे त्या ठिकाणी कर्मचारी आणि साहित्य वगैरे आहे. ते ठेवण्यासाठी त्यांनी जागेची मागणी केलेली आहे. त्यासाठी हा विषय आलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या कॉन्ट्रक्टरने त्याच्या माणसाची राहण्याची सोय दूसरीकडे करावी.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या कॉन्ट्रॅक्टरकडे त्यांचे काम द्या. त्या कॉन्ट्रॅक्टरने त्याच्या स्टाफच्या माणसांची सोय स्वतः करावी.

**जयंत पाटील :-**

त्याच्या स्टाफला राहण्यासाठी भाड्याने लागणारी जागा तो कॉन्ट्रॅक्टर कुठेही घेऊ शकतो. भाईंदरमध्ये भाड्याने बरेच फ्लॅट मिळतात, बरेच गोडाऊन मिळतात ती आपली जबाबदारी नाही.

**ध्रूवकिशोर पाटील :-**

पुणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका या ठिकाणी त्या कॉन्ट्रॅक्टरला त्या महापालिकेने स्वतःच्या डेपो त्यांना वापरायला दिलेला आहे. त्या ॲग्रीमेन्टचा सुद्धा क्लॉज सेम आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. अजिज शेख साहेबांचे असे म्हणणे आहे की, त्याची जबाबदारी त्यांनी घ्यायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, तुमचे म्हणणे १०० टक्के बरोबर आहे. परंतु, ही परिवहन सेवा आपल्या महानगरपालिकेचे एक अंग आहे. आपण त्याला सुद्धा सहकार्य केले पाहिजे. त्याप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका येथे महापालिकेने त्या कॉन्ट्रॅक्टरला स्वतःच्या डेपो वापरायला दिलेला आहे, त्याचप्रमाणे या कॉन्ट्रॅक्टरने सुद्धा जोपर्यंत आपल्याला डेपोची जागा मिळत नाही. तोपर्यंत फ्लायओव्हरच्या खाली १५ बाय १५ फुटाची केबीन मागितलेली आहे. ती लोक शासकीय दराच्या ठरावाप्रमाणे रेट द्यायला तयार आहेत.

**रतन पाटील :-**

शासकिय दर म्हणजे कोणते रेट?

**मा. सभापती :-**

शासकिय दर म्हणजे मार्केट रेट.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महानगरपालिका आणि प्रशासन जे रेट ठरवतील. त्या रेटप्रमाणे द्यायला तयार आहेत.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी शासकिय दराचा प्रश्न येत नाही.

**रतन पाटील :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाचा जो दर आहे तो दर ठरवा.

**मोहन पाटील :-**

ते बोलले की आपला बांधकाम विभाग जे रेट ठरवेल तो रेट असे ते बोलले आहेत. ते ठरावामध्ये लिहुन घेतलेले आहे.

**रतन पाटील :-**

याच्या आधी ठरावामध्ये लिहिलेले नव्हते. आता लिहुन घेतलेले आहे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी शासकिय दराचा प्रश्न येत नाही. हे दर महापालिकेपर्यंतच आहेत.

**मोहन पाटील :-**

बांधकाम विभाग जो दर ठरवेल तो दर

**रतन पाटील :-**

आम्हीसुद्धा तेच बोलतो. आम्ही काही वेगळे बोलत नाही. त्या पुलाखाली अजुन काही उद्योग चालतात. साहेब, त्या पुलाखाली काही लोकांनी तबेला थाटलेला आहे. त्या ठिकाणी ब-याचशा गाई-म्हशी आहेत आणि काही ठिकाणाचा गोडाऊन म्हणुन वापर केला जातो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा दर महापालिका नाही तर प्रशासन ठरवेल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय स्थायी समिती किंवा महासभेत घ्या.

**जयंत पाटील :-**

माझ्या मते हा धोरणात्मक निर्णय होईल. कारण जर महापालिका ती जागा त्यांना भाड्याने देत असेल तर तुम्ही धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हा विषय महासभेत घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, हा धोरणात्मक निर्णय नाही. हा फक्त टेम्पररी स्वरुपाचा विषय आहे.

**जयंत पाटील :-**

टेम्पररी आणि परमनन्टचा विषय येत नाही. त्यामुळे डायरेक्ट महासभेला जाऊ दे.

**मोहन पाटील :-**

त्याच्यामध्ये १० बाय १५ ची केबीन आहे. आपण त्या केबीनचे भाडे आकारायचे आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याला हे ठरविण्याचे अधिकार नाहीत. हा विषय महासभेत जाऊ द्या.

**मोहन पाटील :-**

त्याच्यावर बांधकाम विभाग अंमलबजावणी करेल.

**जयंत पाटील :-**

परंतु, आपण त्या जागेचे दर ठरवायचे नाहीत.

**दिपक खांबित :-**

स्थायी समिती दर ठरवेल स्थायी समितीला त्या पॉवर्स आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या पुलाखाली अजुन काही उद्योग चालतात. आपल्याला त्या संदर्भात भाडे मिळते का?

**मोहन पाटील :-**

त्या पुलाखाली गाई-म्हशी बांधतात अशी सन्मा. सदस्य रतन पाटील यांची तक्रार आहे. त्याच्यावर बांधकाम विभागाने अंमलबजावणी करावी.

**जयंत पाटील :-**

मा. अध्यक्ष महोदय, ही परिवहन सेवा आपलीच आहे. आपण या परिवहन सेवेवर बराच वेळ चर्चा केलेली आहे. ती सेवा चांगल्याप्रकारे चालु रहावी. उद्या ती परिवहन सेवा बंद पडली तर आपण बदनाम होणार आहोत. त्यांना किती महिन्यासाठी किंवा किती वर्षासाठी सोयी सुविधा पाहिजेत ते ठरवा. आणि योग्य त्या दराने त्यांना जागा द्या. नाही तरी ती जागा मोकळी पडलेली आहे. त्यामुळे जागा द्यायला हरकत नाही. ते दर कोणी, कसे ठरवायचे ते बघा.

**मोहन पाटील :-**

ते दर बांधकाम विभागाने ठरवायचे आहेत.

**प्रकरण क्र. १२४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम अंतर्गत भाईंदर (प.) उड्डाणपूलाखाली ड्रायव्हर, कर्मचारी व सामान ठेवण्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन देणे बाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. १३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवा दि. १५ सप्टेंबर २००५ पासुन सुरु झालेली आहे. सदर सेवेकरिता मे. महालक्ष्मणी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांच्यामार्फत बस पुरवठा करण्यात येत आहेत. सदर एजन्सीने भाईंदर (प.) उड्डाणपुलाजवळ बस उभ्या राहत असल्याने उड्डाणपुलाखाली बसेस उभ्या राहण्यासाठी व ड्रायव्हर, कर्मचारी तसेच आवश्यक सामान ठेवण्याकरिता रुम बांधण्यास जागेची मागणी केलेली आहे. सदर जागा नाममात्र भाडे तत्वावर मागीतलेली आहे. अशाप्रकारे भाडे ठरवून जागा देण्याकरिता मा. महासभेने, मा. स्थायी समितीस प्राधिकृत केलेले आहे. तरी मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांना महानगरपालिका प्रशासन ठरवेल त्या भाडेदराने तीन वर्ष मुदतीकरिता करारनामा करुन १५'.०'' x १५'.०'' एवढी जागा देण्यांस मान्यता देण्यंत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२५ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

महापौर चषक वर्षातुन किती भरतात? वर्षातुन महापौर चषक किती होतील?

**जयंत पाटील :-**

हे पत्र आलेले आहे. परंतु, या पत्राची टिपणी कुठे आहे?

**रतन पाटील :-**

ह्या विषयाची टिपणी दिलेली नाही.

**कैलासबेन जानी :-**

काय विषय चाललेला आहे ते माहिती पडत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

या विषयाची टिपणी कुठे आहे?

**रतन पाटील :-**

तुम्ही प्रथम सभेसाठी टिपणी घेऊन या.

**जयंत पाटील :-**

श्री. रणखांबसाहेब, तुम्ही इकडे हे पत्र कशाला आणले?

**कैलासबेन जानी :-**

ह्या टिपणीमध्ये कोणत्या लोकांना बोलावलेले आहे. वगैरेबाबत काहीही माहिती लिहिलेली नाही.

**प्रभात पाटील :-**

सुर्यकांत भोईर, मी एक प्रश्न विचारला की, महापौर चषक इथे भरवायचे तर एक सभापती चषक भरवू या.

**रतन पाटील :-**

आपण हा महापौर चषक वर्षभर ठेवणार नाही. सदर विषयाला खर्चाची किती तरतुद आहे?

**जयंत पाटील :-**

या महापौर चषकासाठी खर्चाची किती तरतुद आहे? आपण तो विषय घेतलेला नाही आणि जे पत्र आले त्याचा विषय घेतलेला नाही आणि जे पत्र आले त्याचा विषय घेण्याऐवजी वेंगळा विषय घेतलेला आहे.

**गजानन भोईर :-**

याच्यामध्ये खो-खो, कबड्डी वगैरेपैकी कुठला गेम आहे?

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामध्ये शहरातील किती लोक येणार आहेत?

**प्र. सचिव :-**

पोलिस डिपार्टमेन्टमधील लोक आहेत.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदरमधील एकही स्पर्धात्मक सन्मा. सदस्य किंवा कोणीही हा कार्यक्रम राबविलेला नाही. ठाणे संस्थेने हे या ठिकाणी राबविलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मग आपण हा खर्च का करावे?

**मोहन पाटील :-**

या चषकामध्ये ज्युडो कराटे हा गेम आहे.

**रतन पाटील :-**

आपण कराटेच्या संदर्भात खुप पिक्चर बघितलेले आहेत. कराटेचेसुद्धा बरेच प्रकार आहेत. त्याच्यामध्ये आपण हा एकच प्रकार घ्यायचा आहे का? मी कराटेचे प्रकार वाचुन दाखवतो. शेतोकाल कराटे, गोजीवरी कराटे, कोजिकाय कराटे, गुरोकाय कराटे, पोशिकिंग किकाय कराटे, शितोरी कराटे, ओडिरी कराटे, तायकोंडो कराटे. एवढे सगळे प्रकार कराटेमध्ये आहेत. एवढे सगळे प्रकार सोडुन तुम्ही हा एकच प्रकार घेतला? आपल्याकडे हा एकच कराटेचा प्रकार आलेला आहे का? या कराटेचा मिरा भाईंदर महानगरपालिकेला काय फायदा आहे? आपल्याला जर या कराटेच्या प्रशिक्षणासंबंधी स्पर्धा राबवायच्या असतील तर मिरा भाईंदर क्षेत्रात एकोणतीस शाळा आहेत. त्या एकोणतीस शाळांमध्ये कराटेचे प्रशिक्षण राबवा. आमचे विद्यार्थी या प्रशिक्षणासाठी तयार करा. तुम्ही हा नाहक खर्च कशाला करता? आमच्या शाळांमधील तसेच मिरा भाईंदरमधील इतर शाळांमधील विद्यार्थ्यांना या कराटेचे प्रशिक्षण देऊन हा खर्च तिथे करा. या कराटेच्या प्रशिक्षणाची किती तरतुद आहे ते सांगा.

**मोहन पाटील :-**

ही तायक्वांदो असोसिएशन ऑफ ठाणे जिल्हा ही जी संबंधित संस्था आहेत. ह्या असोसिएशनच्या सौ. अर्चना त्यागी या अध्यक्षा आहेत. त्या आय.पी.एस. आहेत. त्यांनीत्या दिवशी आपल्या मा. महापौरांबरोबर संपर्क साधला की मुंबईला अशी स्पर्धा दरवर्षी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय होते. अशा तऱ्हेची ही स्पर्धा आहे. या स्पर्धेचे आयोजक हे पोलिस डिपार्टमेन्टचे सर्व अधिकारी आहेत. त्यांनी सांगितले की अशी स्पर्धा म्हणजे पोलिस जे काही ऑर्गनाईज करतात. त्यांना एक प्रोत्साहन मिळेल. या विभागातील जे काही स्पर्धक असतील. त्यांनाही प्रोत्साहन देता येईल. आपण ही स्पर्धा या ठिकाणी भरवावी असे आपल्याला त्यांनी या ठिकाणी निवेदन दिलेले आहे. तुम्हाला त्या निवेदनाची झेरॉक्स कॉपी दिलेले आहे का? ते मला माहिती नाही. याचा सर्वसाधारण रु. ३ लाख ते रु. साडेतीन लाख खर्च आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मी खर्चाच्या संदर्भात बोलतो. याला किती खर्च लागेल ते मला सांगितलेले आहे ह्याचे अध्यक्ष श्री. जगदाळे आहेत आणि सेक्रेटरी श्री. ओम्बासे आहेत. तुम्ही अध्यक्षांना काहीतरी अर्ज दिलेला असेल.

**मोहन पाटील :-**

मी त्याचे लेटर त्यांना दिलेले आहेत. म्हणुन ते अध्यक्ष म्हणुन राहु दे.

**रतन पाटील :-**

साहेब, प्रेसिडन्ट आणि अध्यक्ष वेगळे आहेत का?

**मिलन पाटील :-**

प्रेसिडन्टला मराठीमध्ये अध्यक्ष बोलता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा महापौर चषकचा कार्यक्रम अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे.

**मोहन पाटील :-**

हा महापौर चषक कार्यक्रम एस.पी. यांच्या अध्यक्षतेखाली ऑर्गनाइझ होणार आहे.

**रतन पाटील :-**

आपण हा महापौर चषक ऑर्गनाइझ करतो हे बरोबर आहे. परंतु, याचा आपल्या महानगरपालिकेला काय फायदा आहे? आपण हा खर्च कशाला करीत आहोत? आपल्या शाळांमधील जे विद्यार्थी आहेत. त्यांना कराटेचे प्रशिक्षण देऊन तयार करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, या ठिकाणी स्पर्धेच्या खर्चाचा तपशील असे दिलेले आहे. परंतु, ह्याच्यापुढे काय आहे?

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी कल्याणचे कोणी उपायुक्त श्री. जगदाळे आहेत. मग तुम्ही हा महापौर चषकाचा कार्यक्रम कल्याणला का घेत नाही? हा महापौर चषकाचा कार्यक्रम कल्याण महानगरपालिकेमध्ये जाऊ दे.

**गजानन भोईर :-**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ही आपल्या महानगरपालिकेपेक्षा जुन्या आहेत. मग त्यांनी हा महापौर चषकाचा कार्यक्रम आयोजित करावा.

**मोहन पाटील :-**

हा महापौर चषक कार्यक्रम कल्याणला झालेला आहे.

**रतन पाटील :-**

माजी सभापती ह्यांच्या वाडार्त पैसे वाटले गेले पण आमच्या वाडार्त पैसे वाटले गेले नाही.

**सुग्रकांत भोईर :-**

ज्या ठिकाणी पाणी भरले गेले त्या लोकांना आजपर्यंत पैसे मिळाले नाही.

**एस. के. खान :-**

दोन दोन हजार रुपये तरी वाटले पाहिजे होते.

**मोहन पाटील :-**

दोन दोन हजाराने किती होईल हे तुम्हाला माहित आहे का? जवळ जवळ पंधरा हजार लोक पिडीत आहेत.

**प्रभात पाटील :-**

काही लोकांचे त्यात समाधान होईल.

**गजानन भोईर :-**

माजी सभापती साहेब, पंधरा हजार लोकांचे पैसेच आपण त्यांना देतो ना. जे पिडले आहेत त्यांना आपण आणखीन पिडवीत आहोत. आपण त्यांचेच पैसे त्यांना देत आहोत.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण याबाबत निश्चित धोरण घ्या. आम्ही तुमचा उदो उदो करु. खरोखरच आपली वाहवा करु की, हे जे कराटे प्रशिक्षण हे आमच्या विद्यार्थ्यांना जर शिकवले गेले तर खरोखरच आमही निश्चितच तुमचा सत्कार करु. मागे आपण कुस्ती भरवली होती, कोणाला ते कुस्ती शिकवायला आले होते,कोणाला तरी एकाला नगरसेवकापैकी कुस्ती शिकवली का? कोणालाच समतज नाही. आम्हीच फक्त येथे कुस्ती करतोय. सामान्य नागरिकाच्या कर भरणाकडून जमा होणारा पैसा अशा पद्धतीने खर्च करु नका. विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मुलांसाठी खर्च करावा.

**मा. सभापती :-**

आपल्या शहरामध्ये नविन काहीतरी चांगले होत आहे, ते होऊ द्या.

**रतन पाटील :-**

काय नविन, आपल्या शहरामध्ये एवढे विद्यार्थी आहेत का?

**मोहन पाटील :-**

प्रकरण क्र. १२५ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**प्रभात पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

ह्या स्पर्धेसाठी शिवसेनातर्फे मिरा भाईंदर महानगरपालिकेचा नाहक खर्च करण्यासाठी विरोध दर्शवित आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, या साडे तीन लाखमध्ये आपण शाळेची कौले बसवू.

**रतन पाटील :-**

साहेब, दोन लाख रुपये खर्च आहे.

**प्रकरण क्र. १२५ :-**

महापौर चषक राज्य स्तरीय तायक्वोंदो स्पर्धा दि. १४, १५, १६ ऑक्टोबर २००५ या कालावधीमध्ये आयोजन करणेबाबत.

**ठराव क्र. १३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने राज्यस्तरिय तायक्वोंदो महापौर चषक स्पर्धा दि. २८/१०/२००५ ते दि. ३०/१०/२००५ रोजी नगरभवन, भाईंदर (पश्चिम) येथे आयोजित केली असून सदर स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून २७ जिल्ह्याचे ५०० स्पर्धक सहभागी होणार आहेत. सदर स्पर्धेकरिता अंदाजे ३,५०,०००/- रुपये (साडे तीन लाख रुपये) खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेचे अग्रीम प्रदान करण्यास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. प्रभात पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२६ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, आरोग्याचा अवलोकनाचा विषय आहे. त्यात राजकुमार कांबळे ह्यांना विचारायचे आहे की, आपल्या येथे धुराच्या मशिनी किती आहेत, त्याचे आपण स्पष्टीकरण करा आणि किती मशीन आहेत, किती रिपोरिंगला दिलेल्या अहेत, कधी दिलेल्या आहेत त्याचा आपण आम्हाला खुलासा द्यावा.

**मा. सभापती :-**

संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमच्या प्रभागामध्ये डेंग्युची साथ आलेली आहे त्याच्यावर काही पर्याय नाही का? फॉगींग मशीन कुठे ठेवली आहे त्याचे ते त्यांना माहित नाही का? धुराच्या मशिन कुठे आहेत ते आपण विचारा ना.

**मा. सभापती :-**

चांगल्या व्यक्तीला बनवायला दिले आहे. ते लवकर रिपेर होणार आहे.

**रतन पाटील :-**

दोन महिने झाले आहेत.

**गजानन भोईर :-**

फॉगींग मशीनची किंमत काय आहे?

**राजकुमार कांबळे (एस. आय.) :-**

बारा हजार रुपये.

**गजानन भोईर :-**

एखाद्याला जर आपण साडे तीन लाख सहज देउ शकतो. तर पंधरा-वीस त्या मशीन घ्या. त्याला लाख, दिड लाख रुपये लागतील. त्याला फरक काय पडतो?

**मिलन पाटील :-**

ज्या मशीन पाच महिन्यापासून रिपेरिंगला दिल्या होत्या.

**मा. सभापती :-**

नविन मशीनचा प्रस्ताव केलेला आहे. आपण दहा मशीन मागवत आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या मशीन आपण कधी देणार आहात.

**प्रकरण क्र. १२६:-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धा ते उत्तन या विभागात डेंग्यू या आजाराचा संशयीत रुग्ण सापडला आहे. डेंग्यू ताप एडिस इजिप्सी या प्रकारातील डासांमुळे पसरतो. हे डास अगदी कमी प्रमाणात साठलेल्या पाण्यावर अंडी घालतात. नारळाची करवंटी, तुटलेले डबे, बाटल्या, फुलदान्या, घरात किंवा इमारतीचे कोणत्याही ठिकाणी साठलेले पाण्याचे अगदी लहान डबके या ठिकाणी ह्या डासांची उत्पत्ती होते.

आरोग्य विभागासाठी किटक नाशके खरेदीसाठी दैनिक नवशक्ती या वृत्तपत्रात जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद मिळून मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन, मे. श्रीराम ॲग्रो एजन्सी या निविदाकारांनी निवदा सादर केल्या आहेत. प्राप्त निविदांपैकी कमी दराच्या निविदा स्विकारण्यांस मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

| किटक नाशकाचे नांव | परिमाण | शिफारस केलेले दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| सोलफॅक इ.डब्ल्यु ५० | २५० लिटर | रु. १९००/- प्रती लिटर | रु. ४,७५,०००/- |
| डेल्टामेथ्रिन १.२५% यु.ल.व्ही. | ३०० लिटर | रु. १५४७/- प्रती लिटर | रु. ४,६४,१००/- |
| | | **एकुण** | **रु. ९,३९,१००/-** |

वरीलप्रमाणे किटक नाशके खरेदी कामी येणाऱ्या **रु. ९,३९,१००/-** खर्चास हि सभा मंजूरी देत आहे. सदरच्या प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुर्यकांत भोईर :-**

सर्व सन्मा. सदस्या, सन्मा सदस्य, मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी व मिरा भाईंदर महापगरपालिका कर्मचारी आपण सर्वांना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा.

**रतन पाटील :-**

आमच्यातर्फे ही सर्वांना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा.

**मा. सभापती :-**

आपण नेहमी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात आपल्या सर्वांच्या अशाच सहकार्याने पार पाडू ही सहकार्याची अपेक्षा करतो आणि सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्य, मिरा भाईंदर महानगरपालिका कमर्चारी, मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी आपणा सर्वांना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद. आजची ही सभा संपल्याचे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**